सुरेश भट : रंग ह्यांचा वेगळा... । योद्धा साहित्यिक : अण्णा भाऊ साठे
तळपती तलवार... : नारायण सुर्वे । साहित्यातील अंगार : अमर शेख
बा. सी. मर्ढेकर : नवकवितेचे जनक । ज्ञानपीठ विजेते : विंदा करंदीकर
साहित्यातील पारिजात : मंगेश पाडगावकर । वि. वा. शिरवाडकर - कुसुमाग्रज : मराठी-भाषा-वैभव
विदुषी : दुर्गा भागवत । ग्रेस : गूढ इथले संपत नाही...
नवकथा प्रणेते : गंगाधर गाडगीळ । विजय तेंडुलकर : समाजवास्तवाचे भाष्यकार
एक दुःखार्त झाड : दया पवार । मराठी साहित्यातला अढळ तारा : नामदेव ढसाळ
महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व : पु. ल. देशपांडे

## साहित्य-सरिता...

गेल्या ५०-६० वर्षांतील; विशेषकरून १९४० ते १९८०-९० पर्यंतच्या काळातील निवडक साहित्यिकांचा परिचय करून देणारी ही पुस्तकमालिका.

ह्या साहित्यिकांची ओळख करून देताना त्यावेळचा आपला मराठी समाज, १९४२ ची 'चले जाव' चळवळ, स्वातंत्र्यलढा, १९४७ चे भारताला मिळालेले स्वातंत्र्य, त्यानंतर संयुक्त महाराष्ट्र चळवळ, अशा ऐतिहासिक ठळक घटना आपल्यासमोर ओघाने येतात. तसेच मराठी साहित्यातील नवे प्रवाह; नवकविता, नवकथा, वैचारिक वाङ्मय, विनोदप्रधान साहित्य, वंचितांची अभिव्यक्ती असलेले साहित्य असे विविध प्रवाहदेखील आपल्याला ह्या पुस्तकांतून दिसतात.

परिचयात्मक अशी ही पुस्तके आहेत. त्यांच्या साहित्याची समीक्षा नाही किंवा केवळ त्या साहित्यिकांचे चरित्र नाही. त्यांच्या साहित्याचा हा परिचय आहे. तसेच ह्या लेखकांनी लिहिलेले साहित्यही संक्षिप्तपणे ओळख होण्यासाठी यामध्ये समाविष्ट केले आहे.

***सुरेश भटांची*** *प्रेमगीते, विरहगीते, राधागीते, ओजस्वीगीते- कविता अशा असंख्य पैलूंची अशी सुरेश भटांची सर्व रचना आहे. त्यामध्ये भाव-भावनांबरोबरच विचारही आहेत. तसेच त्यांच्या काही कविता तरल भाव-विभोर अशा भावनांनी चिंब भिजल्यासारख्या असत. भटांच्या कवितांचा रंग खरोखरच आगळा-वेगळा आहे...*

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

# सुरेश भट
## रंग ह्यांचा वेगळा...

माधव जोशी



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

साहित्य-सरिता

महाराष्ट्रातील प्रमुख निवडक साहित्यिकांचा परिचय

# सुरेश भट
## रंग ह्यांचा वेगळा...

**माधव जोशी**
सहलेखिका : कोमल दवणे, रूपाली शिंदे

साहित्य-सरिता
महाराष्ट्रातील प्रमुख निवडक साहित्यिकांचा परिचय

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

एन २६९--१

➢ **पुस्तकाचे नाव :** साहित्य-सरिता : महाराष्ट्रातील प्रमुख निवडक साहित्यिकांचा परिचय
सुरेश भट : रंग ह्यांचा वेगळा...

➢ **संपादक/लेखक :** माधव जोशी

➢ **प्रथमावृत्ती :** २०२६

➢ **आयएसबीएन :** ९७८-९३-९३५९९-७५-९

➢ **प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

➢ © **प्रकाशकाधीन :**

➢ **मुद्रक :**

व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
चर्नी रोड स्टेशनजवळ,
मुंबई ४०० ००४.

➢ **किंमत :** रुपये ७०.००

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# निवेदन

नमस्कार,

प्रमुख पंधरा निवडक साहित्यिकांची ओळख पंधरा पुस्तकांद्वारे करण्यात आली आहे.

या पंधराही साहित्यिकांमुळे; कवी, कथाकार, कादंबरीकारांमुळे, त्यांच्या साहित्यामुळे मराठी साहित्य-सरितेच्या प्रवाहाला वेगळे वळण प्राप्त झाले आहे. ह्या अर्थाने ह्या पंधरा साहित्यिकांची निवड ही प्रातिनिधिक स्वरूपाची आहे तशीच ती महत्त्वाची ठरते.

ह्या पंधरा साहित्यिकांचा साहित्यिक काळ ढोबळ मानाने स्वातंत्र्यपूर्व काळापासून; १९४०च्या आसपास ते १९८५ पर्यंतचा हा ४०-५० वर्षांचा कालखंड आहे. ह्या काळामध्ये मराठी समाजाच्या विश्वात अनेक उलथापालथी झाल्या. आर्थिक, सामाजिक, राजकीय स्थित्यंतरे वेगाने घडत गेली. ह्या सर्व बाह्यपरिस्थितीचे प्रतिबिंब ह्या पंधराही साहित्यिकांच्या साहित्यामध्ये आपल्याला आढळून येते. शाहीर अमर शेख आणि अण्णाभाऊ साठे यांनी त्यावेळच्या वंचित समाजाचे विशेषकरून कामगारवर्गाचे वास्तव व भेदक चित्रण केले. तसेच ह्या कामगारवर्गाच्या, मध्यमवर्गाच्या बदलत्या जाणिवा गंगाधर गाडगीळ व बा. सी. मर्ढेकर यांच्या कृतीतून आपल्याला आढळून येतील. १९६०साली महाराष्ट्र राज्याचा उदय झाला त्याच्या आसपासच्या काळामध्ये मराठी भाषेचा अभिमान बाळगावा याचा जयजयकार कुसुमाग्रजांच्या प्रेरणादायी कृतीतून आढळतो. ‘मराठीच्या दुधाची साय’ खाणारे सुरेश भट यांनी आपल्या काव्यातून मराठी भाषेचा अभिमान बाळगण्यास वाचकाला उद्युक्त केले. महाराष्ट्राचा वैचारिक वारसा आपल्याला दुर्गाबाईंच्या साहित्यातून आढळतो तसेच मराठी भाषेचे लालित्य व सौंदर्य मंगेश पाडगावकर यांच्या कृतीतून आपल्याला दिसते. कामगारवर्गाचे चित्रण डाव्या विचारांनी व्यक्त होणारे साहित्य

विंदा करंदीकरांच्या काव्यातून आढळते. तसेच पंचावन्न ते साठसत्तर या काळातील गिरणगावातील भयावह चित्रण नारायण सुर्वे करताना आढळतात. मराठी भाषेतून गूढता व्यक्त करताना कवी ग्रेस आपल्या काव्याने वेगळीच उंची गाठतात. याच काळातील शहरी मध्यमवर्गीय माणसाचे, मराठी कुटुंबाचे भेदक चित्रण विजय तेंडुलकर आपल्या विविध नाटकांद्वारे करतात. पु. ल. देशपांडे यांचे साहित्य याच काळात बहरत होते आणि विनोदाची डूब असणारे त्यांचे साहित्य जनमानसावर संमोहिनी करून गेले. याच काळातील वंचितांच्या जाणिवा तीव्रपणे व्यक्त होऊ लागल्या, याचे प्रतिनिधित्व दया पवार आणि नामदेव ढसाळ हे करतात.

या निवडक पंधरा साहित्यिकांनी मराठी साहित्य-सरिता प्रवाहित ठेवत एकूण साहित्यविश्वाला अनमोल अशी देणगी दिली आहे. ह्या निवडक साहित्यिकांच्या साहित्यामुळे मराठी साहित्य विविध अंगांनी बहरले-फुलले. अभिजात अशी साहित्यपरंपरा त्यांच्या साहित्यामुळे अधिक सशक्तपणे प्रवाहित होत राहिली आहे.

ही पंधरा पुस्तके म्हणजे या साहित्यिकांची समीक्षा नव्हे तसेच त्यांचे चरित्रही नाही. त्यांच्या साहित्यातून त्यांची ओळख व्हावी आणि त्यांच्या साहित्याचा अभ्यास करावा, त्यांचे संपूर्ण साहित्य वाचावे ही प्रेरणा मिळावी या उद्देशाने सदर पुस्तके लिहिली गेली आहेत. मराठीच्या अभ्यासकापासून ते मराठी साहित्य वाचून आनंद घेणाऱ्या वाचकापर्यंत सर्वांना ही पुस्तके उपयुक्त ठरतील.

डॉ. सदानंद मोरे
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

संवेदनशील कविमित्र शरदमणी मराठे यांस...

# मनोगत

'रंग माझा वेगळा' असे सांगणारे सुरेश भट खरेच तसे होते. चंद्राची शीतलता आणि सूर्याची दाहकता, दोन्ही त्यांच्या काव्यात दिसून येते. मराठी माणसाला ते माहीत आहेत ते त्यांच्या गीतांमुळे-गाण्यांमुळे. पूर्वी ६०च्या दशकात आकाशवाणीवरून सकाळी मंगलप्रभात कार्यक्रमात ''चल उठ रे मुकुंदा... झाली पहाट झाली...'' हे गीत हमखास प्रसारित होई. रेडिओ असलेल्या प्रत्येक घरातील ''मुकुंद'' यांना खरोखर जाग येई आणि ते ते आपापला दिवस सुरू करत. सुरेश भटांच्या कवितांनी-गीतांनी रसिकांचे कान तृप्त तर केलेच, परंतु सांस्कृतिक-साहित्यिकदृष्ट्या भावसमृद्धही केले. त्यांच्या आई-वडिलांच्या संगीताच्या आवडीमुळे त्यांच्या घरात संगीतांचे वातावरण होते आणि म्हणूनच की काय त्यांच्या कविता ह्या गाणे म्हणून जन्माला आल्या. स्वतः भट हे तबला, ढोलकी वाजवत. त्यामुळे 'ताल' आणि 'लय' याबद्दल ते सजग होते. त्यांच्या काव्यांना संगीतकार अप्रतिम अशा चाली देऊ शकले. कारण त्या काव्यातच 'ताल' त्यांना दिसत असत.

अशा सुरेश भटांसारख्या साहित्यिकांची ओळख तीसुद्धा थोडक्यात व्हावी असा प्रस्ताव घेऊन मी साहित्य संस्कृती मंडळाकडे गेलो. ह्या लेखनकामात रत्ना मगरे, रूपाली शिंदे आणि कोमल दवणे यांचे मोलाचे साहाय्य झाले. प्रा. नितीन आरेकर आणि प्रा. अभिजित देशपांडे ह्यांनी महत्त्वाचे मार्गदर्शन केले. दिनेश वाडेकर यांनी मुद्रिते तपासली, ऑलरीचचे अतुल जोशी ह्यांनी सुरेख अक्षरजुळणी आणि मुखपृष्ठ व पृष्ठमांडणी केली; या सर्वांचे आभार.

साहित्य संस्कृती मंडळाचे तत्कालीन अध्यक्ष श्री. बाबा भांड, सचिव मीनाक्षी पाटील आणि मंडळाचे सदस्य यांचा मी आभारी आहे. हे पुस्तक सिद्ध होण्यासाठी ज्यांनी सर्व प्रकारचे सहकार्य केले त्यांचे मनापासून

आभार !

व्युत्पन्न प्रतिभा लाभलेले सुरेश भट स्वतःच्या आगळ्यावेगळ्या शैलीने जनमानसात प्रेमाचे स्थान मिळवलेले सुरेश भट. आपल्या काव्यांनी श्रेष्ठ संगीत दिग्दर्शकांना भुरळ घालणारे सुरेश भट. मराठी माणसाला ताठ मानेने समाजात फिरण्यासाठी लागणारे आणि ते देणारे सुरेश भट. मनस्वी आयुष्य जगणारे, परिणामांची पर्वा न करणारे सुरेश भट. कुठल्याच एका रंगात ज्यांना आपल्याला रंगवता येणार नाही असे सुरेश भट. अशा विविध रंगांनी सजलेले व धजलेले सुरेश भट.

या कवी विषयी थोडक्यात परिचय करून देण्याचा इथे प्रयत्न केला आहे. कविता, लेख, मनोगते ज्या पुस्तकात प्रकाशित झाल्या त्यातले काही उतारे, काही कविता इथे घेतल्या आहेत. मराठीतील काही श्रेष्ठ साहित्यिकांचा थोडक्यात परिचय करून देण्याच्या उद्दिष्टाने केलेला हा अल्पसा परिचय आहे. ही समीक्षाही नाही आणि रसग्रहणही नाही. हा केवळ अल्पसा परिचय आहे.

ज्या प्रकाशकांनी त्यांची पुस्तके प्रकाशित केली आणि त्यातील काही भाग इथे घेतले आहेत, त्या त्या प्रकाशकांचे मनःपूर्वक आभार !

❖❖❖

- संदर्भासाठी आणि लेखकाच्या साहित्याचा परिचय होण्यासाठी घेतलेले उतारे व वाक्ये त्यांच्या मूळ मजकूर बरहुकूम राखण्याचा प्रयत्न केला आहे.

# प्रास्ताविक

असे म्हटले जाते की, मराठी भाषेची महती ज्ञानेश्वरांनी अधोरेखित केली. त्याकाळी आध्यात्मिक ज्ञान केवळ संस्कृत भाषेतूनच प्रामुख्याने उपलब्ध असताना ज्ञानेश्वरांनी भगवद्गीता मराठीतून आणली आणि माझी भाषा ही कौतुकाची आहे असे सांगितले त्याचबरोबर 'अमृताशी पैजा लावणारी ही भाषा आहे' असेही सांगितले. गेल्या हजारो वर्षांपासून प्रचलित असलेली मराठी भाषा इतिहासाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर अनेक वळणे घेताना आपण पाहतो आहोत.

कुसुमाग्रजांनी आज मराठी भाषेची कशी बिकट अवस्था झाली आहे ते सांगितले. परंतु सुरेश भटांनी मराठी भाषा आपण बोलतो आहोत म्हणून आपली मातृभाषा मराठी आहे म्हणून आपण धन्य झालो आहोत असे ठामपणे म्हटले. ही 'धन्य' भावना मराठी माणसाच्या मनाची आहे. आजच्या संगणकाच्या (कम्प्युटर) काळात ही 'धन्य' भावना प्रत्येक मराठी माणसाची असलीच पाहीजे असे निश्चितपणे म्हणावेसे वाटते. ही कविता 'रूपगंधा' या त्यांच्या पहिल्या काव्यसंग्रहात समाविष्ट केली आहे.-

*'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी*
*लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी*
*जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी*
*धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी...'*

ही कविता साठएक वर्षांपूर्वीची आहे. त्याच सुमारास मराठी भाषकांचा स्वतंत्र प्रांत १९६१ साली निर्माण झाला होता. या कवितेतून व्यक्त झालेल्या भाव-भावनांचे, विचारांचे महत्त्व आजही तितकेच आहे हे प्रकर्षाने जाणवते. ह्या कवितासंग्रहात... ह्या ओळी नव्हत्या. या ओळी आजही तितक्याच महत्त्वाच्या आहेत. आजच्या तरुण वाचकांनी ह्याचा अवश्य विचार करावा.–

*‘पाहुणे जरी असंख्य पोसते मराठी*
*आपुल्या घरात हाल सोसते मराठी...’*

भावनांनी चिंब भिजल्यासारख्या ह्या कविता एकीकडे आपल्याला जाणवत असल्या तरी त्याच्यातील तेज उफाळून येणारे आहे...

*‘मराठ्या उचल तुझी तलवार*
*एकीची उचल तुझी तलवार*
*शपथ तुला आईच्या दुधाची*
*घेऊ नको माघार, मराठ्या...*
*शपथ तुला शिवछत्रपतींची*
*चळचळ कापत अवनी सारी*
*काय विसरली दिल्ली तुझिया*
*तलवारीची धार? मराठ्या...’*

त्यांच्या रचना ह्या गझला, साधी कविता अशा आहेत. ‘मंगलाष्टके’सुद्धा त्यांनी रचली आहेत. ह्या मंगलाष्टकांमधील कल्पनांची झेप बघण्यासारखी आहे. लग्नानंतर कन्या तिच्या नवऱ्या घरी जाते हा संदर्भ घेऊन त्यांनी या मंगलाष्टकात म्हटलंय...

*‘कोणाला आपुलीच लेक नसते प्राणाहुनी लाडकी?*
*देता माता निरोप बाप रडतो, माया बने बोलकी*
*मातेचा महिमा अघात, तरीही माया पित्याची घरी...*
*ताटातूट अशी कुणास बघावे, कुर्यात सदा मंगलम्!...’*

‘गझल’ या काव्यप्रकाराबरोबरच त्यांनी ‘हझल’ हा गझलेसारखाच प्रकार आपल्या काव्यांतून हाताळला. हा ‘हझल’ प्रकार तितकासा लोकप्रिय झाला नाही कारण अन्य कविमंडळींनी ‘गझल’ लिहिल्या परंतु ‘हझल’ प्रकार फार हाताळला गेला नाही. ‘हझल’ मधील सर्व शेर हे विनोदीच असतात-असावेत. तसे नसले तर ती ‘हझल’ राहणार नाही.

भट यांनी पाडगावकरांवर किंवा एकूणच दाढी वाढविणाऱ्या कवींवर लिहिलेली ‘हझल’ पुढीलप्रमाणे–

*‘केवढी काव्यातही जादू करी दाढी!*
*वाढवी आता म्हणे वागीश्वरी दाढी!*

*त्या तिथे झाली कुमारी कोंबडी माता!*
*ह्या इथे ही चापते अंडाकरी दाढी!*

सुरेश भट राजकारण्यांवरही भाष्य करत हे भाष्य तिखट असे...
‘*येतात मुख्यमंत्री! जातात मुख्यमंत्री!*
*मिळतात सर्व अंती मसणात मुख्यमंत्री!*
*पाहू चला ‘मराठी अवतार’ मोगलांचे,*
*हल्ली म्हणे टग्यांना म्हणतात मुख्यमंत्री!*
*गर्दी नको, खिसेही आपापले तपासा;*
*गेले इथून केव्हा इतक्यात मुख्यमंत्री?...*’

‘एल्गार’ आपल्या संग्रहात त्यांनी राजकारण्यांना थेट कुत्रेच म्हटले आहे.-
‘*एकमेकांना कसे हे चावती कुत्रे*
*हाडकांसाठी कसे हे भांडती कुत्रे*
*हालती या शेपट्याही नेम्या वेळी*
*हे जरी संतापलेले वाटती कुत्रे*’

सुरेश भटांनी ‘राधागीते’ ही रचली आहेत. प्रतिभाशाली संगीतकार हृदयनाथ मंगेशकरांनी ‘आज गोकुळात रंग खेळतो हरी...’, ‘चिंधी बांधते द्रौपदी हरीच्या बोटाला...’ अशा भटांच्या अप्रतिम अशा रचनांना तितक्याच समर्थपणे चाली लावल्या आहेत.

भटांची प्रेमगीते, विरहगीते, राधागीते, ओजस्वीगीते- कविता अशा असंख्य पैलूंची अशी सुरेश भटांची सर्व रचना आहे. त्यामध्ये भाव-भावनांबरोबरच विचारही आहेत. सुरेश भट हे मनस्वी कवी होते. ह्या मनस्वी मनातूनच त्यांच्या कविता फुलल्या आहेत. त्या समजून घेण्यासाठी वाचकाला त्या कवितेतील कवीची मनस्थिती-भावस्थिती समजून घेतली तर त्यांच्या सगळ्या रचनांचे ‘आकळणे’ घडू शकते.

‘मलमली तारुण्य माझे...’, ‘सुन्या सुन्या मैफलीत माझ्या...’, तसेच ‘पूर्तता माझ्या व्यथेची...’ भिन्न स्वरूपाच्या भावना व्यक्त करणारी त्यांची ४०-५० वर्षांपूर्वीची गीते आजही मराठी गाण्यांच्या कुठल्याही कार्यक्रमात

हमखासपणे गायली जातात आणि अजूनही त्या गाण्यांना तसाच भरभरून टाळ्यांचा प्रतिसाद मिळतो, कधी कधी 'वन्स मोअर' सुद्धा. अशी शब्दांची ताकद त्यांच्या कवितांमध्ये आहे. आणि त्याच सुरेश भटांचे ५५-६० वर्षांपूर्वीचे गीत-कविता, त्याला अलीकडे मिळालेल्या संगीतसाजामुळे पुन्हा एकदा सगळ्या मराठी जनांच्या हृदयात स्थानापन्न झाली. ती कविता म्हणजे 'लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी... जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी....' या शब्दांमुळे 'आपण मराठी भाषक आहोत', 'आपल्या मराठी समाजाच्या चराचरातून मराठी आहे' त्याचा प्रत्यय येतो. तसेच आजच्या पिढीलाही याची जाण आणि याचे भान या गीतामुळे प्राप्त होते. असे गीत लिहिणारे सुरेश भट खरोखरच धन्य आहेत.

काही काही वेळा ते दुःखार्त असत आणि ही आर्तता त्यांच्या काव्यातून झिरपत असे, तर काही वेळा ते ओजस्वी, अभिमानी असत. त्यावेळच्या त्यांच्या भावभावना त्यांच्या गझलेमधून प्रकट होत असत. तसेच त्यांच्या काही कविता तरल भाव-विभोर अशा भावनांनी चिंब भिजल्यासारख्या असत.

भटांच्या कवितांचा रंग खरोखरच आगळा-वेगळा आहे...

❖❖❖

# परिचय



'सुरेश भट' या पाच अक्षरांमध्येच गीताचे आणि गझलचे स्वर आढळतात. सुरेश भट हे 'गझलसम्राट' होते. रसिक म्हणत, 'यांनी आम्हाला गीत आणि गझल देऊन श्रीमंत केले.' अशा या सुरेश भटांचा जन्म १५ एप्रिल १९३२ रोजी झाला. रंगनाथ रामचंद्र भट हे सुरेश भटांचे आजोबा. आजोबांच्या निधनानंतर तीस वर्षांनी भट जन्माला आले. त्यामुळे घरात सर्व आनंदात होते. भट यांचे वडील श्रीधरपंत व्यवसायाने डॉक्टर होते. आई शांताबाई यांना कवितेची आवड होती. मीना, सुनंदा आणि दिलीप ही सुरेश भटांची तीन भावंडे. २१ मे १९६४ रोजी सुरेश भट आणि कोकणस्थ पुष्पा मेहेंदळे यांचा विवाह झाला. तेव्हा सुरेश भट ३० वर्षांचे होते तर पुष्पा या २६ वर्षांच्या होत्या. भटांना ७ एप्रिल १९६५ रोजी मुलगी झाली. तिचे नाव त्यांनी विशाखा (गौरी) ठेवले. नंतर २० एप्रिल १९६६ला त्यांना मुलगा झाला. त्याचे नाव 'हर्षवर्धन' ठेवले. हर्षवर्धननंतर चार वर्षांनी ८ ऑक्टोबर १९७० रोजी 'चित्तरंजन' जन्माला आला.

अडीच-तीन वर्षांचे असताना भटांना पोलिओ झाला आणि भट

*रसिक म्हणत, 'यांनी आम्हांला गीत आणि गझल देऊन श्रीमंत केले'.*

यांचा उजवा पाय लुळा पडला. मुंबईतील कात्रक नावाच्या डॉक्टरकडे त्यांच्यावर उपचार झाले. त्यानंतर ते स्वतःच्या पायावर उभे राहून लंगडत का होईना चालू लागले.

शांताबाई भट यांनी आपल्या मुलांवर चांगले संस्कार केले. त्यांना कवितेची आवड असल्याने त्यांनी सुरेश भट यांच्याकडून व्याकरण व वृत्ते पाठ करून घेत त्यांना कवितेची गोडी लावली; शांताबाई यांनी महिलाप्रधान दोन नाटके लिहिली आहेत. श्रीधरपंत यांचे सुरेश भटांवर खूप प्रेम होते. ते सुरेशला 'प्रिन्स ऑफ वेल्स' असे म्हणत. श्रीधरपंत डॉक्टर असल्याने त्यांनी सुरेश भटांच्या अपंगत्वावर अधिक अधिक माहिती मिळवत उपचार केले. भट यांची आई नास्तिक होती तर वडील आस्तिक होते. भट यांच्या आईने अखेर शेवटचा श्वास घेत असताना 'कुमार गंधर्वांची भैरवी ऐकतच' २३ जानेवारी १९८७ मध्ये शेवटचा श्वास सोडला.

भट अमरावतीतील न्यू हायस्कूलमध्ये शिकत असतानाच पुणे येथील समर्थ विद्यालयात शिक्षण घ्यायला गेले. परंतु तेथे आजारी पडल्याने त्यांना पुन्हा अमरावतीत मणिभाई गुजराथी हायस्कूलमध्ये यावे लागले. अमरावतीच्या न्यू हायस्कूलमध्येच वयाच्या बाराव्या वर्षी त्यांनी १९४४ मध्ये पहिली कविता आपल्या 'वर्गशिक्षकांची आरती' लिहिली. त्या कवितेच्या दोन ओळी पुढीलप्रमाणे-

*चंद्रमा न अजुनी कसा उगवी अंबरी?*
*वदते निज मनी रजनी घाबरी*

सुरेश भट पुढे अनेक कविता लिहू लागले. त्यांच्या कवितेत सुरुवातीला असे संस्कृतप्रचुर शब्द येत -

*केसरी पंजरात!*
*गर्जना भीषणा*
*दचकवी भिस्त मना*
*आज निघत भाव शांत*
*केसरी पंजरात*

◆ ***शांताबाई यांना कवितेची आवड असल्याने त्यांनी सुरेश भट यांच्याकडून व्याकरण व वृत्ते पाठ करून घेताना त्यांना कवितेची गोडी लावली; तसेच त्यांच्याकडून वृत्ते तोंडपाठ करून घेतली.*** ◆

पण पुढे ते आपल्या शिष्यांना शिकवताना संस्कृतप्रचुर मराठीत लिहू नका असे सांगत अन् आपल्या चुका आठवत स्वतःला हसत.

भटांचे पुढील शिक्षण अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयात झाले. के. ज. पुरोहित ऊर्फ शांताराम हे सुरेश भटांचे शिक्षक होते. भट भूगोल विषयामध्ये बी.ए. फायनलला अनुत्तीर्ण झाले होते. भट यांनी महाविद्यालयातील पहिल्या वर्षाला ना. कृ. दिवाणजी यांच्या स्वर्गवासानंतर त्यांच्यावर एक कविता लिहिली. तसेच तिसऱ्या वर्षीही त्यांच्यावर कविता लिहिली. ती अशी-


*आसवांवाचुनी काय आपुल्या हाती*
*क्षणभरात झाली देहाची हो माती*
*लागली न मरणा तुझी मुळी चाहूल*
*दरवळे गंध ना तोच गळाले फूल*
*तेवती विझली अवचित जीवनज्योती*
*आसवांवाचूनी काय आपुल्या हाती?*

या कवितेतीह काहीसे अपुरेपण भटांच्या लक्षात आल्यामुळे भट ते प्रांजळपणे, नम्रपणे सांगत.

सुरेश भट यांनी शेजारी राहणाऱ्या झुंबरलाल यांच्या विहिरीत काही कविता टाकल्या होत्या. त्यांना ज्या-ज्या कविता आठवत होत्या त्यातील काही कविता त्यांनी महाविद्यालयाच्या मासिकांमध्ये लिहिल्या होत्या.

सुरेश भट यांचा जास्तीत जास्त वेळ मित्रांमध्ये जात होता. डॉ. राम शेवाळकर यांच्याशी त्यांची भेट महाविद्यालय संपतासंपता थोडी विचित्रपणेच झाली. महाविद्यालयात असताना एका कार्यक्रमात भट ज्या खुर्चीत बसणार होते ती खुर्ची शेवाळकरांनी खेचून घेतली. सुरेश भट पडतापडता वाचले. ते शेवाळकरांना म्हणाले, ''आपल्याकडून ही अपेक्षा नव्हती.'' तेवढ्यात शेवाळकर म्हणाले, ''होतो कधी कधी अपेक्षाभंग.''

सुरेश भटांना हजरजबाबी बोलण्याची सवय होती. ते म्हणाले, ''शीर्षभंग होणार नाही याची काळजी घ्या.'' एका स्नेहसंमेलनाच्या वक्तृत्व स्पर्धेत भट यांनी सहभाग घेतला होता. तेथे शेवाळकरही होते. शेवाळकरांचे वक्तृत्व खूप छान होते. त्यांनी आपले मुद्दे व्यवस्थितरीत्या मांडले. नंतर भट यांचा नंबर आला. भटांनी चिठ्ठी उचलली तर त्यात 'पुनर्जन्म' हा विषय होता. भट यांचा पुनर्जन्मावर विश्वास नव्हता. ते व्याख्यानाला सुरुवात करताच म्हणाले, ''अहाहा! किती छान होईल; तुमच्यासमोर अव्यंग सुरेश भट उभा राहील.'' सुरेश भटांचे हे वाक्य ऐकून शेवाळकरांच्या काळजात झोंबले. शेवाळकर हे वक्तृत्व स्पर्धेत जिंकल्याने भटांनी त्यांचे अभिनंदन केले. पण शेवाळकरांनी पुढे नमूद केले की, शेवाळकर जरी त्या स्पर्धेत जिंकले असले तरी भटांपुढे सपशेल हरले होते. नंतर शेवाळकर आणि सुरेश भट यांच्यात खूप चांगली मैत्री झाली. सुरेश भटांनी महाविद्यालयातदेखील भाषण केले. भट यांचे वक्तृत्व खूप प्रभावी होते.




१९५० मध्ये भट यांनी काव्यलेखनाला सुरुवात केली. १९६१ मध्ये सुरेश भटांच्या पहिल्या 'रूपगंधा' ह्या कवितासंग्रहाला राज्य पुरस्कार मिळाला होता. 'रूपगंधा' या संग्रहामुळे ते प्रसिद्ध झाले.

दशरथ पुजारी यांनी सुरेश भटांचे 'चल, ऊठ रे मुकुंदा' हे पहिले गीत रेकॉर्ड केले. 'गीत तुझे मी आई गाईन' हे रेकॉर्ड झालेले भटांचे पहिले गीत आहे. अमर शेख ज्या-ज्या ठिकाणी जात त्या ठिकाणीच हे गीत लोकांना माहिती होते. त्यामुळे पुजारी यांचेच पहिले रेकॉर्ड गीत मानले जाते.

सुरेश भट यांनी बी.ए. झाल्यानंतर पत्रकारिता केली. तरुण भारत,

◆ *त्यांच्या कवितेत सुरुवातीला संस्कृतप्रचुर शब्द येत, पण पुढे ते आपल्या शिष्यांना शिकवताना संस्कृतप्रचुर मराठीत लिहू नका असे सांगत अन् आपल्या चुका आठवत स्वतःला हसत.* ◆


लोकसत्ता, मराठा आणि हिंदी वृत्तपत्र युगधर्म इ. वृत्तपत्रांचे सुरेश भट वार्ताहर होते. इंदौरला त्यांनी 'नई दुनिया' या वृत्तपत्रात काम केले. परंतु ही नोकरी थोड्या काळासाठी असल्याने त्यांनी जकात नाक्यावर कारकुनाचेही काम केले. तसेच त्यांनी सीताराम लाड यांच्यामुळे थोडा काळ आकाशवाणीत काम केले. भट हे 'महासागर'चे कार्यकारी संपादकही झाले होते. साप्ताहिक 'बहुमत', हिंदुस्थान, डंका आणि आझाद इ. वृत्तपत्रांचे ते संपादक होते. तसेच त्यांनी 'जागृत विदर्भ' नावाचे वृत्तपत्र काढले होते. भट यांनी पुढे गद्यलेखनही केले. त्यांनी विविध वृत्तपत्रांमधून सदरं चालविली. त्यांचे सदर मोठ्या प्रमाणात गाजले. भट यांनी सदर चालवताना वृत्तपत्र मोठे आहे की छोटे याकडे लक्ष दिले नाही. गद्यलेखनापूर्वी भटांना त्यांच्या आईने एक नाटक लिहायला सांगितल्यावरून त्यांनी महिला मंडळासाठी 'काकूची समाजसेवा' आणि 'वधू-परीक्षा' ही नाटके (प्रहसने) लिहिली होती.

भटांच्या खाण्याच्या आवडीनिवडी बाबत बरेच बोलले जाते. त्यांना फिरण्याची व चित्रपट पाहण्याची आवड नव्हती. भट हे भालाफेक करीत असत. तसेच ते व्यायामही करत असायचे. सुरेश भट – ज्यांना मराठी दुनिया 'दादा' या नावाने ओळखत होती, ते खऱ्या अर्थाने कवितेतील दादाच होते. भट यांचा विशेषतः गझलेचा अभ्यास खूप चांगला होता. त्यांनी उर्दूतही गझला लिहिल्या आहेत. भट यांना किती सहजरीत्या गझल सुचते हे त्यांनी एका कवितेत सांगितले आहे-

*गे कविते सखये तुझा लागला छंद*
*विसरलो जगा मी करपाशी तव धुंद।*
*जाहलो तिरस्कृत गळा लागली तात*
*पर्वा न मला मी आपुल्याच झोकात।*
*जन म्हणती बावळा वाया गेला पोर*

*पाही न रात बे रात वेगळा नूर।*
*हिंडतो सारखा जणू नसे घरदार*
*मी इकडे तुझिया स्वप्नातच गे चूर।*
*पूर्णिमा रोज तुझ्या गगनात*
*नाहून टाकते मज अमृतधारात।*
*मग हृदय नाचते होउनिया बेभान*
*अन् सहजच निघते कंठातुन मधुतान।*

सुरेश भट लग्नानंतर नागपुरात राहायला आले. १९७४ मध्ये मौज प्रकाशनाने प्रकाशित केलेला 'रंग माझा वेगळा' हा दुसरा काव्यसंग्रह आला. त्यात लता मंगेशकर आणि महाराष्ट्रभूषण पु. ल. देशपांडे यांच्या प्रस्तावना होत्या.




सुरेश भट यांना शालेय जीवनातच आईने संगीताची गोडी लावली होती. त्या स्वतः हार्मोनिअम वाजवत. सुरेश भट मैदानी खेळ खेळू शकत नसल्याने त्यांच्यासाठी बाजाची पेटी आणली होती. तसेच वडिलांनाही संगीताची आवड होती. त्यांनी भटांना एच.एम.व्ही.चा एक ग्रामोफोन आणून दिला होता. मुलाची आवड संगीतात असल्याने श्रीधरपंत त्याच्यासाठी आठवड्यातून एक तरी रेकॉर्ड विकत आणत. संगीताच्या आवडीमुळे भट शाळेच्या बँडपथकापर्यंत पोहचले. भट यांना शिक्षण देण्यासाठी प्रल्हादबुवा घरी येत असत. भट आजारी असतानाही तासन्तास बासरी वाजवत. ते हाती मिळेल ते वाद्य वाजवायला शिकले. गुलाबराव 'गानसोपान' व भातखंडेकृत 'संगीत खंड' असे अनेक ग्रंथ भटांनी त्या काळात वाचले होते. त्यांनी गानसोपानाची पारायणेदेखील केली होती. भट यांना संगीताची आवड इतकी होती की, त्यांनी दुबईवरून

*१९५० मध्ये भट यांनी काव्यलेखनाला सुरुवात केली. १९६१ मध्ये सुरेश भटांच्या पहिल्या 'रूपगंधा' ह्या कवितासंग्रहाला राज्य पुरस्कार मिळाला होता. 'रूपगंधा' या संग्रहामुळे ते प्रसिद्ध झाले.*

मोठा डेक व पेटारे, कॅसेट मागवल्या होत्या.


कवीचे शब्द व संगीतकाराचे स्वर या कार्यक्रमात हृदयनाथ मंगेशकर यांनी सुरेश भटांची प्रशंसा केली. भट गीत गात असताना हृदयनाथ पेटीवर त्यांना साथ देत होते. गाणे संपताच टाळ्यांचा कडकडाट झाला. तेव्हा हृदयनाथ म्हणाले, ''भटसाहेब इतक्या चांगल्या आवाजात, तालात, सुरात गातात हे माहीत असते तर मीच त्यांना नेहमी साथसंगत केली असती.'' तेव्हा भटांनी त्यांना एक नवीन कविता ऐकवली. त्यावर हृदयनाथ म्हणाले, ''तू गाऊ नकोस, मला चाल सुचत नाही.'' ओ. पी. नय्यर यांनाही 'चल अकेला' या गाण्याची चाल लावता आली




नाही. तसेच हिंदीतील गीतकार कवी प्रदीप यांच्या बाबतीतही असे घडायचे. भटांचे 'गीत गंगेच्या तटावर, ये तुझी घेऊन घागर' हे गीत संगीतबद्ध झाले नाही. भट यांचे संगीतज्ञान प्रदीप निफाडकर यांनी अनुभवले आहे. प्रत्येक जण गझल हा प्रकार न समजून भावगीतासारख्या चाली लावायचा. त्यामुळे भट यांना अतिशय राग येई. ते म्हणतात, 'गझल हा शब्दप्रधान गायकीचा प्रकार आहे. तो नीट समजून घ्या. मग गा.'

१९८३ मध्ये भट यांचा ‘एल्गार’ हा तिसरा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. एल्गार या काव्यसंग्रहातील त्यांच्या गझला अत्यंत उत्कृष्ट अजोड आहेत. या काव्यसंग्रहाला सोलापूरचा प्रतिष्ठित दमाणी पुरस्कार व उर्दू अकादमीचा पुरस्कार मिळाला. एल्गार या काव्यसंग्रहाने सांस्कृतिक जगात खळबळ माजवली. त्याच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. एल्गार या संग्रहाने तरुणांना वेड लावले...

भट स्वतः कविता सादर करीत असत. १९८० मध्ये त्यांनी प्रथम ‘रंग माझा वेगळा’ या नावाने कार्यक्रम सुरू केला. तसेच नंतर १९८३ मध्ये त्यांनी ‘एल्गार’ नावाचा कार्यक्रम सुरू केला. भटांच्या मार्गदर्शनाखाली अनेक कवींच्या निवडक गझलांचे संपादन झाले. १९९० मध्ये ‘काफला’ हा संग्रह त्यांनी संपादित केला. त्यांना संपादनात डॉ. अविनाश सांगोलेकर यांनी मदत केली. १९९२ मध्ये ‘पत्रे सुरेश भटांची’ हे पुस्तक श्रीराम पचिन्द्रे यांनी संपादित केले. १९९७ मध्ये ज्येष्ठ कवयित्री शिरीष पै यांनी ‘सुरेश भट यांची निवडक कविता’संग्रह प्रकाशित केला. हा संग्रह त्यांच्या कवितेचे प्रातिनिधिक दर्शन घडवतो.



◆ *गझल या काव्यप्रकाराचा सुरेश भट यांनी अत्यंत खोलात जाऊन अभ्यास केला आहे. त्यांनी हा जो बारकाईने अभ्यास केला ते समजण्यासाठी, तसेच गझलेचे मर्म जाणण्यासाठी 'रंग माझा वेगळा' या त्यांच्या दुसऱ्या कवितासंग्रहाचा अभ्यास करावा लागतो.* ◆

११ एप्रिल १९९४ मध्ये सुरेश भट यांचा 'झंझावात' हा चौथा काव्यसंग्रह. आशा भोसले यांच्या हस्ते 'झंझावात' प्रकाशित झाला. २४ जुलै २००२ मध्ये सुरेश भट यांचा 'सप्तरंग' हा पाचवा काव्यसंग्रह आला.

भट यांची पुणे, मुंबई, कोल्हापूर, सोलापूर, कामेरी, नागपूर, इंदूर, दिल्ली, यवतमाळ आणि चंद्रपूर अशी भ्रमंती चालू होती. पण पुणे व नागपूर या ठिकाणीच त्यांनी जास्तीतजास्त मुक्काम केला. भट यांनी १९८० नंतरचे पूर्ण आयुष्य गझलेसाठी दिले. त्यांनी शिष्य घडवले. गझल लेखनास अनेक कवींना भाग पाडले. तसेच त्यांनी अनेक कार्यक्रमही केले. गप्पा मारणे हा त्यांचा आवडता विषय होता. टेलिफोन बिल कितीही आले तरी ते गप्पा मारत. गुणगुणणे, गझल लिहिणे आणि गप्पा मारणे या गोष्टी ते आवर्जून आणि आवडीने करत. परिस्थितीला सामोरे जाताना कधीच ते कच खात नसत. मात्र हर्षवर्धन या दुसऱ्या मुलाचे अपघातात निधन झाल्याने ते खूप खचले. १४ मार्च २००३ मध्ये सुरेश भट यांचे निधन झाले.

❖❖❖

गझल या काव्यप्रकाराचा सुरेश भट यांनी अत्यंत खोलात जाऊन अभ्यास केला आहे. त्यांनी हा जो बारकाईने अभ्यास केला ते समजण्यासाठी, तसेच गझलेचे मर्म जाणण्यासाठी 'रंग माझा वेगळा' या त्यांच्या दुसऱ्या कवितासंग्रहाचा अभ्यास करावा लागतो. 'गझलेची बाराखडी' या शीर्षकाचा एक स्वतंत्र लेख त्यांनी या काव्यसंग्रहाला जोडला आहे. कारण गझलेचा पाठपुरावा कोणत्या दिशेने आपण करावा; तसेच कवींनी, तरुणांनी गझल रचताना कोणते नियम पाळण्याची गरज आहे हे त्या लेखात भटांनी स्पष्ट केले आहे. हे त्यांचे महत्त्वाचे कार्य आहे.

गझलेमध्ये शेवटपर्यंत एकच वृत्त वापरले पाहिजे हा महत्त्वाचा नियम भटांनी सांगितला आहे. गझल लिहिताना यमक, अंत्ययमक या संकल्पना खूप महत्त्वाच्या ठरतात. एकाच वृत्तातील एकच यमक म्हणजेच काफिया व अंत्ययमक म्हणजे रदीफ असलेल्या प्रत्येक दोन-दोन ओळींच्या किमान पाच किंवा त्याहून अधिक कवितांच्या बांधणीला 'गझल' असे म्हणतात. गझलमधील या प्रत्येक दोन ओळींच्या कवितेला 'शेर' म्हणतात. गझलेमधील प्रत्येक शेर हा स्वतंत्र असतो. म्हणजेच गझलेमधील प्रत्येक शेर हा त्याच्या जागी एक संपूर्ण अभिव्यक्ती असलेली स्वतंत्र कविताच असते. तिची एक 'थीम' असते आणि म्हणूनच ती उलगडत जाते. पण गझल उलगडत नसते. कारण एकाच गझलेत विविध विषय हाताळले जाऊ शकतात. प्रत्येक शेराचा आशय स्वतंत्र असू शकतो. सुरेश भट म्हणतात की, 'एकच संवेदना, एकच भाव किंवा एकच मूड असलेले सर्व शेर बाहेर वेगळे काढून त्यांचे चिंतन केले तर मागचा पुढचा कोणताही संदर्भ किंवा संबंध नसूनही तो शेर म्हणजे एक संपूर्ण अभिव्यक्ती असलेली वेगळी कविताच असल्याचे आढळून येते.'

गझलेच्या फॉर्ममध्ये उलगडत जाणारी सलग कविता लिहिली जाऊ शकते. पण ती 'गझल' नव्हे! जिला ते 'नज्म' असे म्हणतात. म्हणून गझलचे खरे गमक हेच आहे की, प्रत्येक सुटा शेरसुद्धा स्वतंत्र कविताच असते... संबंधित गझलेचे वृत्त (बहर), यमक (काफिया) आणि अंत्ययमक (रदीफ) असल्यास अंत्ययमक या घटकामुळे गझलेचा आकृतिबंध निश्चित होतो. या आकृतिबंधालाच 'जमीन' असे म्हणतात. उदा.

***सुरेश भट म्हणतात की, 'एकच संवेदना, एकच भाव किंवा एकच मूड असलेले सर्व शेर बाहेर वेगळे काढून त्यांचे चिंतन केले तर मागचा पुढचा कोणताही संदर्भ किंवा संबंध नसूनही तो शेर म्हणजे एक संपूर्ण अभिव्यक्ती असलेली वेगळी कविताच असल्याचे आढळून येते.'***

*ही न मंजूर वाटचाल मला*
*दे भविष्या तुझी मशाल मला ।*
*संत समजून काल मी गेलो*
*भेटला शेवटी दलाल मला ।*
*मी कधीचा उभाच फिर्यादी*
*वाकुल्या दाखवी निकाल मला!*


भटांच्या मते 'गझले'च्या पहिल्या शेरातच, तिचा आकृतिबंध-तिची 'जमीन' स्पष्ट होते.' कारण पहिल्या शेरात गझलेचे वृत्त, यमक आणि अंत्ययमक स्पष्ट होते. गझल शेवटपर्यंत एकाच वृत्तात चालत असली तरी तिच्या फक्त पहिल्या शेराच्या दोन्ही ओळींत यमक आणि अंत्ययमक येते. नंतर येणाऱ्या प्रत्येक शेराच्या दुसऱ्या ओळीत यमक आणि त्यानंतर अंत्ययमक येते. वरील गझलमध्ये 'मला' हे अंत्ययमक आहे; तर वाट-चाल, म-शाल, द-लाल, नि-काल या शब्दांमधल्या 'आल' या उच्चारातून यमक निर्माण झाले आहे. याच स्वरचिन्हाला 'अलामत' असे म्हणतात. सुरेश भटांच्या मते गझलमधील प्रत्येक शेर हा सहज कळावा आणि ऐकणाऱ्याच्या थेट हृदयात शिरावा अशी त्यातील शब्दांची मांडणी असावी. सोपेपणा हे यशस्वी शेराचे रहस्य होय. शेरात जे सांगायचे आहे त्याची प्रस्तावना पहिली ओळ असते तर दुसरी ओळ म्हणजे पहिल्या ओळीतल्या प्रस्तावनेचा समारोप असतो. भट म्हणतात- हे जर नीट साधले तर शेर 'कामयाब' होतो. ही दुसरी ओळ लिहिणेच अधिक महत्त्वाचे, जबाबदारीचे आणि अवघड काम असते. गझलेविषयी ते एक महत्त्वाची गोष्ट सांगतात, ''नुसत्या रचना कौशल्यानेच यशस्वी गझल लिहिता येत नसते. गझलेचे नुसते तंत्र समजले आणि ते वृत्त (बहर),

यमक (काफिया) आणि अंत्ययमक (रदीफ) इ. मंडळींची मर्जी राखून तंतोतंत अमलात आणले व तरीही अखेर प्रभावीपणे काहीही सांगता आले नाही तर तो शेर अक्षरशः कोसळतो. शेरात जे सांगायचे असते ते आधी सर्वांत महत्त्वाचे असते आणि तेही पर्यायी शब्द सापडणार नाहीत इतक्या कमीत कमी शब्दांत सांगायचे असते.''

★ ★ ★

## काव्यविषयक दृष्टिकोण

आपल्या संपूर्ण आयुष्यात महाराष्ट्रासाठी आणि मराठी मायबोलीसाठी आपण सामान्य जनतेपर्यंत, त्यांच्या मनापर्यंत पूर्णपणे रुजू होणारी गझल लिहीत आलो या गोष्टीचा सुरेश भट यांना अभिमान तसेच आनंद वाटतो. १९५५ पासून त्यांनी गझल लिहायला सुरुवात केली.




भटांच्या मते, जी ऐकल्यानंतर मनात कायमची या ना त्या रूपाने शिल्लक राहते तीच अस्सल कविता!

सुरेश भटांचा कोणत्याही काव्यप्रकाराला विरोध नाही. त्यांच्या मते, 'कधी-कधी साहित्याबाबतही लिहायला हवे किंवा लिहावेच लागते. कारण त्यात स्वतःचं भलं नव्हे, तर आजच्या व उद्याच्या येणाऱ्या पिढीसाठी आदर्श ठेवावा लागतो. त्यामुळे आपणास हा 'वाईटपणा' पत्करावाच लागतो.'

'सुरेश भट ह्यांची निवडक कविता' या शिरीष पै यांच्या पुस्तकात भटांच्या सर्व गझलांचा तसेच काव्यसंग्रहाचा समावेश केला आहे. अनेक विद्वान साहित्यिकांनी भटांवर

***'मरण आल्यास माझी चिता ताऱ्यांच्या मांडवाखाली माझ्या जिवलगांनीच पेटवावी, ◆ समाधी दूर रानात मस्त फुलांच्या आसवानेच बांधावी, ◆ तसेच माझी चौकशी फक्त धुळीने करावी आणि राख झाल्यास प्रेयसीने माझी गीते स्मरावीत;'***

टीकास्त्र सोडण्यास सुरुवात केली. त्यांच्या विरोधकांनी 'त्यांनी मराठी कवींच्या एका संपूर्ण पिढीला उद्ध्वस्त केले आहे', असा आरोप त्यांच्यावर केला गेला. पण भट म्हणतात की, 'मी हा अपराध किंवा चूक केली आहे किंवा नाही हे सर्व काळच ठरवील.' (खरेच काळाने ठरविले की ते अपराधी नाहीत.) भट म्हणतात, ''मी कुणाकुणाशी या गोष्टीवरून वाद घालीत बसू. माझ्याकडे तेवढी शक्ती नाही आणि वेळही नाही.'' त्यांना अजून खूप काही लिहायचे होते. ते म्हणतात, ''आजपर्यंत जे काय लिहायचे होते ते मी संपूर्ण लिहू शकलो नाही. त्यामुळे त्या गोष्टीचे दुःख आहे. मला अजून लिहायचे आहे हे सांगताना ते म्हणतात-

*मला सांगायचे होते साऱ्यांना सारे काही,*
*पण सारे सांगायला आयुष्यच उरले कोठे?*

मी नेमका कोण आहे? या प्रश्नाचा विचार त्यांनी कधी केला नाही. कारण ''मी नसेन तेव्हाच त्या प्रश्नाचे खरे उत्तर मला कळेल'' असे भट म्हणतात. 'कवीला समीक्षक नव्हे तर सामान्य जनताच अमर बनवते' हे त्यांचे विचार होते. सुरेश भटांच्या लेखणीत फार वेगळेपण होते. त्यामुळे ते म्हणतात, ''शरीर नष्ट झाल्यावर तर प्रत्यक्ष कवीला स्वतःच्या सुखदुःखाशी काहीही देणे-घेणे नसते, पण कवीचे शब्द येणाऱ्या पिढ्यांशी नाते जुळवण्याचा प्रयत्न करीत असतात. काहीन्‌काही बोलत असतात. कवीचे अनमोल शब्द म्हणजे येणाऱ्या प्रत्येक पिढीचा सुवर्णमय असा ठेवा असतो. कवी हे त्यांच्या कवितेत उलगडून सांगतात. हे जीवन सुंदर, स्वच्छ करण्यासाठी कवींचे शब्द लढत असतात, झुंजत असतात, कवी खऱ्या अर्थाने कधीही पराभूत होत नसतो. कारण त्याला जिवंत माणसाचे हृदय लाभलेले असते. या युद्धात लौकिक अर्थाने अनेकदा पराभव होत असले तरी हेच पराभव माणसाला आणि कवीला अजिंक्य बनवतात.''

## सुरेश भटांच्या गझलेविषयी

सुरेश भटांनी इतक्या उत्कृष्ट गझला लिहिल्या की, महाराष्ट्राच्या जनतेने त्यांना हृदयात महत्त्वाचे स्थान देऊन स्वतःमध्ये सामावून घेतले. त्यांच्या गझलांना संपूर्ण महाराष्ट्र प्रभावित झाला होता. तरुण कवी त्यांच्या गझलांचा अभ्यास करू लागले व स्वतः गझलनिर्मिती करण्यात मग्न होऊन जात. ते एक श्रेष्ठ तसेच प्रतिभावंत आणि महान कवी होते हे निर्विवाद सत्यच आहे, पण मराठी भूमीत त्यांनी कवितेच्या इतिहासात आपल्या उत्तुंग प्रतिभेने गझलनिर्मिती करून एक नवीन व अजरामर इतिहास निर्माण केला. त्यांच्या गझलेमध्ये प्रत्येक विषयाचा समावेश झालेला दिसतो. म्हणूनच त्यांच्या अशा अनेक गझलांमधून स्फूर्ती घेऊन नवनवीन तरुणांनी, कवींनी गझलनिर्मितीसाठी एक पाऊल पुढे टाकले.


सुरेश भट यांनी फारसी गझलाच्या धर्तीवर मराठी गझल लिहिण्याचे फार मोठे आव्हान स्वतःवर छातीठोकपणे स्वीकारले होते. त्यांची प्रकृती ही मूळ फारसी गझलच्या तुलनेत मराठी गझलेच्या निर्मितीसाठी अगदी योग्य, अनुकूल अशीच होती. त्यांनी फारसी गझलांचा अभ्यास केला; या गझलांना मराठी मातीचे रंग, गंध, रूप देण्यात त्यांना इतके अफाट यश मिळाले की, आज मराठी गझलेच्या क्षेत्रात त्यांचा हात धरील अशी दुसऱ्या कोणाचीही गझल आढळत नाही. मराठी गझलेच्या क्षेत्रात सुरेश भट हेच अनभिषिक्त सम्राट आहेत.

## गझल प्रवास

'रूपगंधा' हा भटांचा पहिला कवितासंग्रह असून १९६१ साली तो प्रथम प्रसिद्ध झाला. १९९१ साली त्याची दुसरी आवृत्ती प्रकाशित झाली. 'रूपगंधा'मधील 'निर्धार' आणि 'स्मरण' या दोन गझला प्रामुख्याने समजल्या जाव्यात. सुरेश भटांच्या गझलेमध्ये आपणास समाज आणि व्यक्ती यांच्यातील सतत चालू असलेले संघर्ष प्रामुख्याने दिसून येतात. 'निर्धार' मध्ये ज्वलंत त्वेष, तसेच लढवय्याचा झुंजार आवेश दिसतो. त्यातून सुरेश भट यांची दुःखितांविषयीची कळकळीची स्थिती, करुणा लक्षात येते. पुढे प्रकट झालेल्या त्यांच्या गझलांची वैशिष्ट्ये या एकाच गझलेमध्ये प्रारंभीच दिसतात. दांभिकता, स्वार्थ यांच्याशी सतत त्यांचे

◆ ***सुरेश भटांच्या मते गझलमधील प्रत्येक शेर हा सहज कळावा आणि ऐकणाऱ्याच्या थेट हृदयात शिरावा अशी त्यातील शब्दांची मांडणी असावी. सोपेपणा हे यशस्वी शेराचे रहस्य होय.*** ◆

भांडण चाललेले असते तर, दीन-दुःखी पीडितांसाठी त्यांच्या डोळ्यांत आपणास नेहमीच अश्रू असलेले दिसतात ते त्यांच्या गझलेमधूनच! त्यांनी या गझलेमध्ये आपणास 'भविष्याचा प्रवासी', 'क्रुद्ध विश्वाने दिलेली ललकारी', 'लोकांच्या आर्त वेदनांचा झंकार' आणि 'अंतरीचा निर्धार' असे म्हटले आहे. आपले गीत ही आपल्या हातातली धारदार 'तलवार' आहे असे भटांनी म्हटले आहे.




*'लोक हे साधेसुधे कोट्यावधी*
*'सर्वस्व' माझे'*


या ओळीतून जगाविषयीचे प्रेम, ममत्व आपणास दिसून येते. 'त्यांच्या खांद्याला खांदा लावून मी पुढे जाणार आहे' असे उद्गार त्यांनी पराकोटीच्या 'निर्धारा'नेच काढले आहेत. त्यांची 'मरण' ही गझल मृत्यूलाही स्वप्नाच्या पातळीवर नेणारी अत्यंत साधी, सरळ पण कल्पनारम्य अशी गझल मानली जाते. माझ्या मृत्यूतच माझ्या दुःखाचा शेवट व्हावा. एरवी ती दुःखे संपणार नाहीत असे करुण उद्गार कवी काढतो.

*'पूर्तता माझ्या व्यथेची माझिया मृत्यूत व्हावी*
*जीवनापासून माझ्या ह्या मला मुक्ती मिळावी!'*

भट हे इतके उत्तम गझलकार किंवा गीतकार आहेत की, त्यांनी मृत्युविषयीही रमणीय अशा कल्पना केल्या आहेत. 'मरण आल्यास माझी

चिता ताऱ्यांच्या मांडवाखाली माझ्या जिवलगांनीच पेटवावी, समाधी दूर रानात मस्त फुलांच्या आसवानेच बांधावी, तसेच माझी चौकशी फक्त धुळीने करावी आणि राख झाल्यास प्रेयसीने माझी गीते स्मरावीत;' अशी कल्पना त्यांनी मांडली आहे. हे मृत्युविषयीचे त्यांचे स्वप्न आहे. ही एक मनोज्ञ अशी कविकल्पना आहे. सुरेश भटांचे आपल्या कवितेवर म्हणजेच गझलेवर इतके प्रेम आहे की ते म्हणतात, ''आपल्या मरणोत्तर का होईना, निदान आपल्या जिवलगांना आपली कविता तरी त्यांनी आठवावी.''

या गझला काव्यनिर्मितीच्या दृष्टीने अतिशय उत्कृष्ट असल्या तरी प्रकृती, भाषा आणि काव्यशैली यांच्या दृष्टीने त्या भावकवितेला मिळते-जुळते करून घेणाऱ्या आहेत. म्हणजेच भावकवितेच्या जवळच्या आहेत.




सरलता व सहजता यातून दिसून येते. या गझलांमध्ये स्वतःला व भावनांना आवर घालणारा संयम दिसून येतो.

'रंग माझा वेगळा' हा त्यांचा दुसरा कवितासंग्रह १९७० साली प्रसिद्ध झाला. त्यालाही अफाट लोकप्रियता लाभली. त्या संग्रहाच्या साहजिकच एकामागून एक अशा पाच आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या. १९८१ साली दुसरी, १९८२ साली तिसरी, १९८७ साली चौथी आणि १९९२ साली पाचवी आवृत्ती प्रसिद्ध झाली. या कवितासंग्रहाला सुप्रसिद्ध साहित्यिक पु. ल. देशपांडे ह्यांची प्रस्तावना आणि गानसम्राज्ञी लता मंगेशकर ह्यांचा पुरस्कार लाभला आहे. 'रंग माझा वेगळा' मधील गझलांकडे नीट लक्ष देऊन वाचले, अभ्यासले तर आपल्या असे लक्षात येते. आपल्या आयुष्याविषयी भट हे उघडपणे मनमोकळेपणाने, स्पष्टपणे बोलू लागले

**◆ *शेरात जे सांगायचे असते ते आधी सर्वांत महत्त्वाचे असते आणि तेही पर्यायी शब्द सापडणार नाहीत इतक्या कमीत कमी शब्दांत सांगायचे असते.* ◆**

आहेत व ते आपल्या गझलांमधून स्पष्ट होत आहे. विशेषतः आपली वंचना, पराभव, तीव्र निराशा यांविषयी कवीने या गझलांमध्ये उल्लेख केलेला दिसतो. 'दिवंगताचे गीत'', 'एक साधा प्रश्न माझा', 'जगत मी आलो असा', 'तसा मी राहिलो नाही', 'रंग माझा वेगळा', 'कौल मागत राहिलो'. 'गोळा-बेरीज', 'व्यवहार' या विविध विषयांना वाहिलेल्या गझल आणि 'तंद्री', 'दिवस हे जाती कसे' आणि 'तरुण आहे रात्र अजुनी' या प्रेमविषयाला वाहिलेल्या गझला उत्कृष्ट दर्जाच्या आहेत. कवी प्रत्यक्ष घटनांबद्दल काहीच बोलत नाही; पण ज्या समाजात राहतो त्या समाजाविषयीचे प्रश्न, समस्या, समाजाचे चित्र तो स्पष्टपणे, परखडपणे व आंतरिक पोटतिडकीने सांगतो.

आपल्या उद्ध्वस्त आयुष्याबद्दल बोलताना 'दिवंगताचे गीत' मध्ये कवी स्वतःला 'जिवंत कलेवर' म्हणतात-

*'जिवंत माझ्या कलेवराला अजून आयुष्य हाक मारी*
*कशास एका भिकारड्याला पुकारतो हा दुजा भिकारी?'*

स्वतःला तर त्यांनी 'दिवंगत' म्हणून संबोधले आहे. आपण केलेल्या चुकांविषयीची खंत त्यांना जाळते. 'व्यवहार' मधील त्यांचा वैताग इतका पराकोटीला गेला आहे की ते स्वतःवर चिडून म्हणतात-

*मी हा भिकारडा अन् माझी भिकार दुःखे*
*त्यांचे हुशार अश्रू आधीच गाजलेले!*
*माझ्या शिव्या भुकेची उष्टी कशास चर्चा?*
*जे घालतात भिक्षा तेही उभे भुकेले!*

सुरेश भट यांनी हळूहळू गझलांमध्ये प्रतीकांची सूचक भाषा वापरण्यास सुरुवात केली. शिवाय विविध प्रकारची विशेषणे देऊन त्यांनी त्यांच्या गझला आणखीच उठावदार व बहारदार केल्या. 'चालू दे वक्षात माझ्या वादळांचे येरझारे' या शब्दांतून त्यांच्या काळजातल्या तगमगीचे स्वरूप डोळ्यांसमोर येते. 'लाघवी फुलांची लोचनं', 'जिवंत कलेवर',

'दुभंगलेल्या उरात', 'बंडखोर गीते', 'अब्रूदार पापे', 'शिळ्या भुकेची', 'हुशार अश्रू' या विशेषणांमुळे त्यांची वर्णने एकदमच शब्दांपलीकडचा आशय बोलून जातात. गझलमध्ये ते कमालीचे नाट्य भरतात. ठासून नाट्य उभे करण्याची कला भटांच्या गझलांमध्ये दिसून येते. 'तंद्री' मध्ये ऐक्याची भावना तर 'दिवस हे जाती कसे' मध्ये वियोगातील तळमळ दिसून येते.

भटांचा तिसरा कवितासंग्रह 'एल्गार' १९८३ साली प्रसिध्द झाला. 'एल्गार' मधील गझलांचा अभ्यास करताना आपल्या लक्षात येते की, 'गझल' कशा प्रकारे लिहावी, याचे सांकेतिक चिन्ह तसेच त्यांच्या प्रतिभेला जाणवले होते ते नियम त्यांनी कसून पाळले. म्हणजेच गझल कशी लिहावी असा जर प्रश्न आपल्यासमोर येत असेल तर 'एल्गार'मध्ये जशी गझल आहे तशाच नियमाने ती रचावी/लिहावी, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. आपल्या मनात भावनांचा जो समुद्र उठतो तसेच ज्या-ज्या समस्या उद्‌भवतात अशा विविध प्रकारच्या दुःखांची मांडणी त्यांनी या कवितासंग्रहातील गझलांमध्ये केलेली दिसून येते. इतक्या देखण्या गझल क्वचितच मराठीत लिहिल्या गेलेल्या असाव्यात. सुरेश भटांनी 'महाराष्ट्राला दुःखाची कविता' अर्पण केली असेही म्हटले जाते. त्यांच्या कविता म्हणजे दुःखाची पूजाच होय. असे म्हटले जाते की, त्यांच्या दुःखाची तीव्रता त्यांच्या गझलांमध्ये प्रतिबिंबित होताना दिसते. त्यामुळेच लोकांना त्या गझला अधिक प्रिय व जवळच्या वाटल्या असतील. त्यांनी प्रेम, सौंदर्य, तारुण्य, यश इत्यादी विषयांत हात घातला आहे. त्यांनी 'दुःख' याही विषयाला स्वतःपासून दूर ठेवले नाही. त्यांच्या गझलनिर्मितीच्या मुळाशी 'दुःख'च दुःख आहे. दुःखाचे अनेकविध उल्लेख त्यांच्या गझलांमध्ये आढळून येतात. उदाहरणार्थ... 'मला आजन्म दुःखांनी गराडा घातला होता' (दाखला), 'कवटाळूनी बसले मला दाही दिशांचे हुंदके' (तोरण), 'आसवात रस्ते बुडून गेले' (तोरण), 'का जन्म घेतला मी? का दुःख भोगले?' (नाते), तसेच 'पुसू कुणाला कुठे राख राहिली माझी' (पाहिले वळून मला) या त्यांच्या दुःख विषयावरील मनाला भेदून जाणाऱ्या अशा गझला आहेत.

*वार झेलायास केली मी खुली छाती जरी*

◆ ***आपल्या संपूर्ण आयुष्यात महाराष्ट्रासाठी आणि मराठी मायबोलीसाठी आपण सामान्य जनतेपर्यंत, त्यांच्या मनापर्यंत पूर्णपणे रुजू होणारी गझल लिहीत आलो या गोष्टीचा सुरेश भट यांना अभिमान तसेच आनंद वाटतो.*** ◆

*नेमके पाठीस माझ्या चावणारे चावले!* (पाठ)

गांजलेला माणूस वेदना असह्य झाल्यावर मनातून आर्ततेने उद्गार काढतो; पण दुःखाचा डोंगर इतका वाढत जातो की, संपूर्ण जगच काळवंडून गेल्यासारखे, माणुसकी हरवल्यासारखे दिसते आणि सगळेच आपल्या पाठीवर वार करणारे वाटू लागतात; असा भाव त्यांच्या गझलांमधून दिसून येतो. याशिवाय 'एल्गार' मध्ये प्रेमविषयक कविता लिहून मराठी काव्यसृष्टीला त्यांनी उत्कृष्ट अशी 'प्रेमगीते' दिली. 'केव्हा तरी पहाटे' आणि 'सुन्या सुन्या मैफलीत माझ्या' या दोन्ही गझला वियोगाची कहाणी, दुःखाची अतीव कळ आपणास सांगून जातात. वियोगही मधुर व मृदूच आहे, असे दिसून येते. वानगीदाखल पुढील ओळी सांगता येतील -

*'अजुनी सुगंध येई दुलईस मोगऱ्याचा...*
*गजरा कसा फुलांचा विसरून रात्र गेली?'(केव्हा तरी पहाटे)*
*'सख्या तुला भेटतील माझे तुझ्या घरी सूर ओळखीचे*
*उभा तुझ्या अंगणी स्वरांचा अबोल हा पारिजात आहे!'* (सुन्या-सुन्या मैफलीत).

त्यांच्या या कवितासंग्रहाने त्यांच्या गझलेचे रूप, आकार, अभिव्यक्ती, शैली पूर्णपणे निश्चित केली. तिसऱ्या कवितासंग्रहाची दुसरी आवृत्ती १९८७ साली प्रसिद्ध झाली.

'झंझावात' (१९९४) या त्यांच्या चौथ्या कवितासंग्रहात त्यांनी गझलांच्या अंगचे महत्त्व, वैभव आणि समृद्धी पूर्णपणे विकसित केलेली दिसते. 'झंझावात'मधील त्यांची एक-एक गझल म्हणजे कवीचे आयुष्य आणि आजचा समाज यांची बोलकी चित्रे, तसेच हृदयाचा ठाव घेणारी वास्तवदर्शी समाजचित्रे त्यांनी या गझलांतून दाखवली आहेत.

'झंझावात' 'डकार', 'प्रवासी', 'व्यासपीठ', 'अनामत', 'सावकाश', 'नशा', 'पराभव', 'निवेदन', 'अहवाल', 'उशीर', 'जुने पत्र', 'थेंब', 'रक्त', 'कोण जाणे', 'दंगा', 'आलाप', 'काटकाट', 'दाणे', 'आता', 'बडबड', 'नाव', 'ताबा', 'खडू', 'कहाणी', 'सजा', 'साहित्य संमेलन', 'आशाताईस' या गझला प्रमुख मानल्या जातात. 'झंझावात' मधल्या गझलांमधून भटांनी मानवी जीवनाविषयीचे मुक्त चिंतन केले आहे. 'अनामत' या गझलेमध्ये तर विलक्षण आत्मप्रकाश आहे. त्याचे मूळ




कारण त्यांची भाषा हे होय. त्यांची भाषा ही त्यांच्या हृदयाची बोली आहे. ते म्हणतात- ''मी सच्चेपणाने जगत आलो आहे, मी आक्रमक असून माझा विरोध भोंदूपणाला आहे. प्रेम करीत तसेच जपून-जपून शाब्दिक चर्चा करीत मी जगतो.'' पुढे ते म्हणतात, ''मी आकर्षक नसेन पण मी पडलेला-झडलेला नाही. मी येणाऱ्या भविष्याने वर्तमान काळाशी ठेवलेली अनामत आहे.'' 'सावकाश' या गझलेतून त्यांच्या मनातील एक वेगळीच खंत, तसेच दुःख आपणास दिसून येते. ते म्हणतात, ''मी अशा जगात जगत आलो की, जेथे मला नेहमीच दुःख व जखमाच जाणवल्या, तरी मी त्यांना विरोध केला नाही. उलट मी दुःखालाच दार उघडं करून दिलं. मी चुकलो असेन कधी तरी; पण माझे अश्रू कुणाला दिसू दिले नाहीत'' आणि शेवटी ते म्हणतात की, ''मी दुःख, अश्रू दिसू दिले नाहीत कुणाला, पण नंतर 'सावकाश' रडलो.'' यातून आपणास त्यांनी गझलेला दिलेल्या शीर्षकाचा अर्थ सूचित होतो.

'निवेदन' या गझलमधून भट सांगतात की, ''मी नीट वागत नाही मंजूर, मी सहनशील नाही हे मंजूर, पण माझं सोसणंही तुम्ही पाहा,

◆ *भटांच्या मते, जी ऐकल्यानंतर मनात कायमची या ना त्या रूपाने शिल्लक राहते तीच अस्सल कविता!* ◆

मी वेडा नाही, पण मी नुसताच रडत बसलो नाही.'' शेवटी ते अत्यंत आर्ततेने म्हणतात, ''कुणाच्या कृपेने जगत नाही मी, माझे शब्द ही काही मला कुणी घातलेली भीक नाही.'' इतक्या साध्या, सरळ व सोप्या भाषेत भटांनी त्यांच्या मनाची व्यथा 'निवेदन' मध्ये मांडली आहे.

**गझल चळवळ**

प्रसिद्ध साहित्यिक विजय तेंडुलकर पुण्यात वसंतराव सराफ यांच्या 'वसुधा' मासिकाचे संपादक म्हणून काम करत होते. तेव्हा एकदा सुरेश भट यांचा पहाडी आवाज तेंडुलकरांच्या कानावर पडला. न राहवून त्यांनी जागेवरून उठून त्या गृहस्थाला विचारले, ''या इतक्या सुंदर कविता कुणाच्या आहेत हो?'' भटांनी आपल्या देहाकडे बोट दाखवत उत्तर दिले, ''या देहाला सुरेश भट म्हणतात.'' तेंडुलकर व भट यांच्यामध्ये गप्पा उफाळून आल्या. पुढे त्यांच्यात मैत्री झाली. ती मैत्री इतकी झाली की, तेंडुलकरांच्या मुली भटकाकांच्या अंगाखांद्यावर मोठ्या झाल्या. त्यांच्या मुलींना 'भट काका' हे फार प्रिय होते.

अमरावतीहून भट पुण्याला आपल्या वडिलांसोबत भांडण करून छायाचित्रकार भट या काकांकडे राहायला आले. पण त्यांच्यासोबत-देखील त्यांचे पटले नाही. गझलसम्राट सुरेश भट व पुणे यांचे नाते फारच वेगळ्या प्रकारचे होते. त्यांची सासुरवाडी पुण्याचीच होती, तसेच महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या 'गझल चळवळीचे केंद्र' पुण्यातच फोफावले. पुण्यातील कवींची ओळख भट यांना करून देण्याचे श्रेय निश्चितच अनिल कांबळे यांना जाते. १९८० साली पुण्यात भरलेल्या मैफलीमध्ये भट यांनी पुणेकरांची मने जिंकली! तसेच त्यांची या मैफलीतील मुलाखत आकाशवाणीवर घेण्यात आली. पुण्याला भट यांनी 'गझलेची राजधानी' असे म्हटले आहे. पुण्याने सुरेश भटांची साथ कधीच सोडली नाही. कार्यक्रम असो वा शिष्यवर्ग असो; सर्वच बाबतीत भटांना नेहमीच सुंदर सुचले आहे. मग ती कुठलीही कविता असो. पुण्याबद्दल त्यांना प्रेम असले

तरी पुण्यातील सारेच काही चांगले असे म्हणणे त्यांना आवडत नसे. तसे त्यांनी लोकमतच्या ‘सारासार’ या लेखात लिहिले आहे.

सुरेश भटांची गझल चळवळ इतकी पसरली होती की, गझलवर ‘महाराष्ट्र साहित्य परिषदे’ने १९८६ मध्ये खास दिवाळी अंकच काढला! अशा प्रकारच्या एकाच काव्यप्रकारावर संपूर्ण अंक काढणे हे पहिल्यांदाच झाले असेल. त्या अंकामध्ये भटांची प्रदीर्घ मुलाखतही होती.

१९८३ च्या अंबेजोगाईच्या संमेलनाला भटांच्या मधू जामकर या चाहत्या मित्राने आग्रहाने अंबेजोगाईच्या संमेलनाला निमंत्रित कवी म्हणून बोलवले. पुढे गडचिरोलीच्या विदर्भ साहित्य संघाच्या संमेलनाचे अध्यक्षपद भट यांना मिळाले. २६ डिसेंबर १९८६ रोजी हे संमेलन झाले. सुरेश भट यांना १९९२ मध्ये कोल्हापूर येथील अखिल भारतीय साहित्य संमेलनात निमंत्रित करण्यात आले होते. त्यांची तब्येत ठीक नसतानाही त्या संमेलनात त्यांनी दोन गझला सादर केल्या. लोकांना त्या आवडल्याही; पण इतर साहित्यिकांनी ‘भट फ्लॉप गेला’ अशी अफवा पसरवली. भट यांच्या कविता जादू करणाऱ्या असल्यामुळे ‘जळणारे’ साहित्यिक वाढणे हे साहजिकच होते. भटांना जाणीवपूर्वक संमेलनाला न बोलवण्यात अनेक कवी आघाडीवर होते.

‘नव्यांची अक्षर चळवळ’ या मासिकात अवधूत हर्डीकर यांचा एक लेख १९९३ मध्ये आला होता. ६६व्या साहित्य संमेलनानिमित्त तो अंक होता. हर्डीकर यांनी मसापच्या कविसंमेलनात भट यांना मुद्दामहून कसे प्रथमच कवितावाचनासाठी पाचारण केले याची नोंद केली आहे. ते म्हणतात, ‘‘मुळात त्या संमेलनात भट यांचे नाव घालण्याचा आग्रह श्रोत्यांचा. मग त्यांना घेतले. पण त्यांचे नाव शेवटी टाकले तर त्यांच्याकडे आपसूक मोठेपणा जातो व त्यांच्या कवितेचा परिणाम राहील यामुळे मुद्दामहून भटांना पहिलेच टाकले. आता ते टाळतानाही वर ‘काव्य वाचनाचा पहिला मान आम्ही या विदर्भ कवीला दिलेला आहे’ ही मखलाशीपण झाली! पण शेवटी व्हायचे तेच झाले! भटांच्या दोन कवितांचा श्रोत्यांवर इतका परिणाम झाला की, पुढे आलेल्या एकाही कवीची कविता लोकांच्या कानातच शिरत नव्हती.’’

भट जे गद्यलेखन करीत असत ते त्यांना वाचून दाखवण्यात फार

◆ *गझला काव्यनिमिर्तीच्या दृष्टीने अतिशय उत्कृष्ट असल्या तरी प्रकृती, भाषा आणि काव्यशैली यांच्या दृष्टीने त्या भावकवितेला मिळते-जुळते करून घेणाऱ्या आहेत. म्हणजेच भावकवितेच्या जवळच्या आहेत.* ◆

आनंद होत असे. एकदा त्यांनी पुण्यामध्ये कुणी तरी 'गाणार' या नावाच्या गृहस्थावर लेख लिहिला होता. त्यातील ''तरी मी गवईना सांगत होतो हा 'गाणार' म्हणजे तुम्हांला झालेला हार्निया आहे. वेळीच कापा. कारण हा गाणार, जाणार तिथे खाणार.'' हे एक वाक्य.

सुरेश भट हे गझलेच्या विचारात इतके तल्लीन असायचे की, त्यांना कसलेही भान राहत नसे. कोण आले काय आणि गेले काय! भट हे एकदा लिहायला बसले की, ते जगाचाच नाही तर स्वतःच्या भुकेचाही विचार करीत नसत. त्यांच्या गझलेची सुरुवात पुण्यापासून झाली. त्यांचा गझलेच्या प्रवासाची सुरुवात विविध साहित्य संमेलनांपासून झाली तर शेवट पत्रांमधून झाला. या प्रवासाच्या किंवा चळवळीच्या मध्यभागी असलेले महत्त्वाचे घटक म्हणजे 'मसाप'चे भरलेले कविसंमेलन, दूरदर्शनवरील कार्यक्रम, गझलेची बाराखडी तसेच इस्लाह हे आहेत.

## राजकारणावरील भटांचे मत

२ डिसेंबर १९९४ साली भट यांनी राजकारणावर आधारित एक लेख लिहिला. त्या लेखात त्यांनी प्रखरपणे त्यांचे राजकारणाबाबतचे मत स्पष्ट केले. त्यात ते म्हणतात, ''मला खरोखरच राजकारणात रस नाही. मी जीवनावर प्रेम करणारा, जीवनरसाचा एकेक थेंब चवीने चाखणारा इसम आहे. पण जेव्हा देशाचे धिंडवडे निघतात, महाराष्ट्राचे अस्तित्वच संपुष्टात, धोक्यात येण्याची शक्यता निर्माण होते, तेव्हा मी अत्यंत उत्तम कवी म्हणून गप्प बसावे काय?'' पुढे असेही म्हणतात, ''कवी हा सौंदर्य व प्रेमाचा पुजारी असतो. पण आमच्या जगण्याच्या ह्या उकिरड्यावर आपण नुसती कविता चघळत बसायचे काय?''

संपूर्ण मानवजातीच्या हितासाठी लढण्याचा ठेकाच भटांनी घेतला होता. त्यामुळे त्यांनी कुणालाही त्यांच्या लेखणीतून सोडले नाही. मग

ते बाबा आमटे असोत की विनोबा भावे असोत. त्यावेळी पंतप्रधान इंदिरा गांधी होत्या. त्यांनी पवनारच्या आश्रमाला भेट दिली नव्हती. त्यामुळे विनोबा भावे यांचा त्या गोष्टीवरून रुसवा वाढला. २५ एप्रिल १९८२ ला भटांनी भावे यांच्यावर असा लेख लिहिला ज्यात त्यांनी भावेंना झापले होते. सामान्य जनतेच्या कोणत्याही प्रश्नावर हा राष्ट्रसंत पंतप्रधानांना भेटतो तेव्हा बोलत नाही; पण गाई कापण्याविरुद्ध बोलतो याचा संताप त्यांनी त्या लेखात व्यक्त केला होता. गाय हा पशू आहे हे सावरकरीय तत्त्वज्ञान तर त्यांनी त्यात सांगितलेच; पण त्याचबरोबर मेघदूतापासून मल्लीनाथाच्या टोकापर्यंतची उदाहरणे देत त्यांनी, गाई-बैलांपेक्षा माणसे कधीही महत्त्वाची आहेत, याचा पुनरुच्चार केला आहे. भोंदूपणाने वागणाऱ्यांचा त्यांना राग येत असे. मग तो कोणीही का असेना, मोठा वा लहान! भट यांनी कधीच कोणत्याही पक्षाची बाजू घेतली नाही. 'लोकप्रभा'च्या २ डिसेंबर १९९४ च्या अंकात ते म्हणतात, ''मी महाराष्ट्राचे लबाड मुख्यमंत्री शरद पवार यांच्यासारखा महात्मा जोतिबा फुले व परम पूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांचा पानपरागसारखा उपयोग करणारा माणूस नाही... मुंबईचा साधा पाव-भाजीवालासुद्धा मुख्यमंत्री शरद पवार ह्यांच्यापेक्षा जास्त सन्माननीय व सुखी आहे. कै. रामदास नायक ह्यांच्या विधवा पत्नीचा तळतळाट आणि शाप सौ. प्रतिभा पवार ह्यांना बाधल्याशिवाय राहणार नाही.'' 'पुढारी' या वृत्तपत्राच्या 'बहार' या पुरवणीत सन २२ जुलै १९९६ रोजी लिहिलेल्या एका लेखात तर ते शरद पवार यांना सांगतात, ''शरद पवार ज्याला बहुजनसमाज म्हणतात, तो म्हणजे ग्रामीण पार्श्वभूमी असलेल्या 'श्रीमंत धनदांडग्या शोषक जमीनदारांचा व उन्मत्त गुंडांचा आहे!' 'आता हे पडेल नाटक बंद करा' असेच शीर्षक लिहिलेला हा त्यांचा लेख आहे.

सुरेश भट सत्यप्रिय होते. माणूस जवळचा असो वा दूरचा, तो चुकीचे वागल्यास भटांची लेखणी प्रखरपणे, धारदारपणे चालत असे. म्हणूनच की काय त्यांनी शरद पवार, बाबा आमटे, विनोबा भावे तसेच लतादीदींसारख्या नामांकित व्यक्तींवरही टीका करण्याचे धाडस दाखवले. एवढेच नाही तर, बाळासाहेबांनी ज्यावेळी 'गर्व से कहो हम हिंदू है' ही घोषणा करताच भट त्यांच्यावर अक्षरशः तुटून पडले होते. हिंदू शब्दाचा

◆ *संपूर्ण मानवजातीच्या हितासाठी लढण्याचा ठेकाच भटांनी घेतला होता. त्यामुळे त्यांनी कुणालाही त्यांच्या लेखणीतून सोडले नाही. मग ते बाबा आमटे असोत की विनोबा भावे असोत.* ◆

योग्य अर्थ सांगताना त्यांनी हफीज शिराजी या फार्सीतील कवींचा एक शेर उदाहरणासहित दिला.

'सनद' नावाच्या पाक्षिकात २० जुलै १९८९ साली भट यांनी वेदांपासूनचे पुरावे देत उपनिषदे, गीता, ब्रह्मसूत्रे, शंकराचार्यांसह सर्व आचार्यांच्या भाष्यांमध्ये कुठेही हिंदू शब्द नव्हता हे सांगितले. ज्ञानेश्वरीतही हिंदू शब्द नाहीच; पण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्यकाळात रचलेल्या ७२ शब्दकोशांपैकी एकाही शब्दकोशात हिंदू शब्द नाही हे सप्रमाण सिद्ध केले होते. बाळासाहेबांची त्यांनी मुलाखत घेतली व त्यावर एक लेख लिहिला. ''आता मी स्वतः स्मगलिंग व आंतरराष्ट्रीय बाजारात गर्द विक्री सुरू करीन!'' अशा शीर्षकाची ती मुलाखत!

पुढे १९९८ मध्ये भट यांची एक मैफल 'एल्गार' नावाने पुण्यात होणार होती. या मैफिलीत बाळासाहेबांनी उपस्थित राहावे अशी मनस्वी इच्छा भट यांची होती. पण त्यापूर्वीच मुंबईत झालेल्या एका मैफलीत गीत-संगीताचा एक पारिजातकच जणू बहरून आला होता. 'तुम्ही, आशा भोसले ही सर्व पद्यातील माणसे आहात आणि मी गद्यातला. माझं मैदान निराळं आहे. तरीसुद्धा तुम्ही अलीकडे काही वर्षांपासून माझ्यावर प्रेम करू लागला आहात. तेही एक आश्चर्यच आहे. जणू दोन ठिणग्याच एकत्र आल्या. 'उषःकाल होता होता' यासारखी ज्वलंत काव्ये तुमच्याकडून महाराष्ट्राला हवी आहेत. अखंड महाराष्ट्रासाठी तुमची लेखणी परजत राहू द्या. त्यासाठी शिवरायांच्या चरणी तुम्हांला उदंड आयुष्य व उत्तम आरोग्य लाभो ही प्रार्थना करतो आणि पुन्हा एकवार 'एल्गार' ला शुभेच्छा देतो.' असा त्या पत्रातील मजकूर वाचल्यावर कळते की, बाळासाहेबही भटांविषयी आदर बाळगून होते. म्हणून तर ते त्यांना ठिणगीची उपमा देत होते.

भटांना राजकारणाचा तिटकारा नव्हता. कारण तसे जर असते, तर ते निवडणुकीला उभे राहिले नसते. तसेच त्यांचे राजकीय चौरसातील मित्रमंडळही नसते. ते जरी खासदारकीच्या निवडणुकीत हरले होते तरी कवी म्हणून ते कायमच जिंकले! त्यांना राजकीय व्यक्तींबद्दल द्वेष नव्हता. गिरीश गांधी, सुरेशदादा जैन, सुशीलकुमार शिंदे, अरुण मेहता, अरुण गुजराथी, उल्हासदादा पवार इत्यादींशी त्यांची मैत्री होती. गिरीश गांधींनी तर त्यांना वेळोवेळी मदत केली. त्यांच्या पश्चात् त्यांच्या मुलाला चित्तरंजनला नोकरी मिळेपर्यंत गांधींनी सहकार्य केले होते.

सुरेश भट हे कायम मागासवर्गीयांच्या बाजूने लिहीत असत असे म्हणणेही चुकीचे ठरेल. त्याचा पुरावा म्हणजे ‘समुद्र अंतरातला’ हा ११ एप्रिल १९८२ रोजीचा भट यांचा लेख. ‘बनचुके दलित नेते आणि श्रीमंत दलित यांच्याविरुद्ध ते दंड थोपटून असत. तत्कालीन मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले यांनी विदर्भ सिलेक्शन बोर्डावर बाळकृष्ण वासनिक जे नागपूरचे दलित नेते होते त्यांच्या पत्नीची अध्यक्ष म्हणून नेमणूक केली. त्यावेळी भट यांनी त्यांच्यावर लेखणी परजली. ही नेमणूक करताना मुख्यमंत्री बाबासाहेब यांनी असे समर्थन केले होते की, ‘वासनिक यांनी आंतरजातीय विवाह करून एक धाडसाचे कार्य केले आहे, म्हणून त्यांच्या पत्नीला हे पद दिले जात आहे.’ भट यांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठवलीच पण त्यांनी, ‘वासनिक जर मागासवर्गीय आहेत तर त्यांचा जो काही ठाऊक होऊ शकणारा बँक अकाऊंट आहे तो मागासवर्गीय आहे. नागपूरच्या एल.ए.डी. कॉलेजजवळचा त्यांचा बंगलाही मागासवर्गीयच आहे, तसेच त्यांची मोटार, बुलढाण्याला होऊ घातलेले सिनेमा थिएटरही मागासवर्गीयच आहे’ अशा शब्दांत खिल्ली उडवली होती.

## भट आणि त्यांचे समकालीन साहित्यिक

### अनिल

आ. रा. देशपांडे ऊर्फ अनिल हे नागपूरमधील एक मोठे कवी होत. ‘ललित’ मासिकाच्या जानेवारी १९७० च्या सुमारास च्या अंकातील एक आठवण. त्या मासिकात ‘सर्वसाक्षी’ या टोपणनावाने कुणी तरी लिहीत होते. त्याने ‘पुसद’ येथे झालेल्या विदर्भ साहित्य संघाच्या रौप्यमहोत्सवी

◆ ***दुःखी, विवश आणि हताश लोकांना जगण्याची खरी प्रेरणा देण्याचे कार्य कविता करते. माणसांना अंधारात शब्दांचा प्रकाश देणे, हे कवींचे काम आहे. कारण माणसांशिवाय कवी व कवितेला अर्थच नसतो.*** ◆

संमेलनाचा वृत्तान्त दिला होता. तो वृत्तान्त असा की, मंगळवार २९ रोजी संमेलनाची सांगता माहूर यात्रेने झाली. तीन खास मोटारी व जीपने सर्व साहित्यिक माहूरला गेले. यात्रा संपल्यानंतर जीपच्या ट्रिप्सना म्हणजेच फेऱ्यांना बराच वेळ लागत होता. कवी अनिल यांनी तो सार्थकी लावला. दत्तात्रेयांचे स्थान असलेल्या शिखराच्या टेकडीच्या पायथ्याशी कविवर्य अनिल यांनी सुरेश भट यांना विनंतीवजा आदेश दिला. ''कविता ऐकवा.'' भटांनी त्यांना कविता ऐकवल्यानंतर ते म्हणाले, ''तुम्ही काव्याचा आत्मा पकडून ठेवला आहे. दिल्लीला आलात तर दिल्लीकर तुम्हांला डोक्यावर घेऊन नाचतील.'' इतकं कौतुक करून अनिल थांबले नाहीत तर पुढे ते म्हणाले, ''हेच खरे कविसंमेलन झाले.'' त्या वेळी संमेलनाचे अध्यक्ष वामनराव चोरघडे हे होते.

**माधव ज्युलिअन**

असे म्हणतात की, १२व्या शतकात संत नामदेव यांनी पहिली गझल लिहिली. तर १९व्या शतकात अमृतराय यांनी दुसरी गझल लिहिली. त्यानंतर अनेक साहित्यकारांनी गझल हाताळण्याचा प्रयत्न केला. पण ते सर्व गझलकार म्हणून मानण्यात आले नाहीत. मंगेश पाडगावकर यांनीही गझल हा विषय हाताळला. पण त्यांना तो फारसा जमला नाही.

माधव ज्युलिअन व सुरेश भट हे मराठीतील दोन ठळक गझलकार मानले जातात. २१ जानेवारी १८९४ मध्ये माधव ज्युलिअन यांचा जन्म झाला, आणि १९३९ मध्ये ज्युलिअन यांचे निधन झाले. तेव्हा भट ७ वर्षांचे होते. त्यामुळे भटांबद्दल ज्युलिअनांचे मत समजू शकणे शक्यच नव्हते. पण भटांनी माधव ज्युलिअनांविषयी ठिकठिकाणी मते व्यक्त केलीत. 'गझलसारखा विदेशी काव्यप्रकार मराठी कवितेच्या प्रकृतीशी मूलतः

विसंवादी असून तिला मानवणारा नाही' असा आक्षेप माधव ज्युलिअन यांच्या काळात घेतला होता. 'ज्युलिअन यांचा 'गज्जलांजली' हा संग्रह म्हणून वाचण्याच्या लायकीचे पुस्तक नाही' असे जरी भटांनी म्हटले असले तरी चार वर्षांनी त्यांनी 'काफला' पुस्तक मात्र माधव ज्युलिअन यांना अर्पण केले आहे! तसेच प्रस्तावनेत ते असे मान्य करतात की, 'विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात माधवरावांच्या विशेष प्रयत्नामुळे गझल प्रकार मराठी कवींमध्ये अधिक प्रिय झाला.'

सुरेश भटांना गद्यप्रांतातही त्यांच्यावरील फार्सी-संस्कृत प्रभाव आणि शब्दसंकरता यांमुळे आली होती. भट 'जन्मजात' कवी होते.

सुरेश भट व माधव ज्युलिअन यांच्यात खूप साम्यस्थळे आहेत. भट आणि माधवराव यांच्यातील काही साम्यस्थळे म्हणजे दोघांच्या मराठी विषयाच्या कविता प्रसिद्ध आहेत.

भट म्हणतात-

*लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी*
*जाहलो खरेच धन्य, ऐकतो मराठी*

दोघांनी उर्दू काव्यप्रकार गझल आणतानाच त्यात हम्द आणि 'न' आत (प्रार्थनागीत) या उर्दू काव्यप्रकारांनाही स्पर्श केला आहे. माधवराव म्हणतात-

*ये राज्य कोणा, कोणा फकीरी*
*ये दास्य कोणा, कोणा अमीरी*
*कोणी शिरून्दर, कोणी कलन्दर*
*अल्मुल्कु लिल्लाह! अल्लाहु अकबर!*

तर भट म्हणतात-

*तू आमुचा सखा अन् तू एकटाच वाली!*
*इरयाक नस्तईन!*
*तू आमुचा निवारा! तू आमुची खुशाली!*
*इरयाक नस्तईन!*

किंवा

*उजाड वैराण वाळवंटी खळाळणार झरा मुहम्मद।*
*जगातला दीनदुःखितांचा अखेरचा आसरा मुहम्मद!*

◆ *त्यांची 'मरण' ही गझल मृत्यूलाही स्वप्नाच्या पातळीवर नेणारी अत्यंत साधी, सरळ पण कल्पनारम्य अशी गझल मानली जाते. माझ्या मृत्यूतच माझ्या दुःखाचा शेवट व्हावा. एरवी ती दुःखे संपणार नाहीत असे करुण उद्‍गार कवी काढतो.* ◆

सुरेश भट आणि माधव ज्युलिअन या दोन्ही कवींनी बहुतांश सर्वच काव्य प्रकार हाताळले असले तरी दोघे गझलेसाठीच प्रसिद्ध आहेत.

**कवी कुसुमाग्रज**

भट यांना ७ एप्रिल १९६५ ला कन्यारत्न झाले. तिच्या नामकरणावरून चर्चा होत असताना कोणते नाव ठेवावे असा प्रश्न निर्माण झाला. तेव्हा भट यांना त्यांचाच आवडता काव्यसंग्रह 'विशाखा' आठवला आणि तिचे नाव त्यांनी 'विशाखा' ठेवले. विशाखाचा अर्थ काय असे कुणाला विचारले तर सर्वजण; 'ते एका नक्षत्राचे नाव आहे,' असे सांगतात. पण भटांच्या नुसार शाखा म्हणजे फांदी. फांदी ही लांब दूरवर पसरत जाते व तिला आणखीन फांद्या फुटतात, त्या म्हणजे विशाखा. तसेच विशाखा हे राधेच्या एका मैत्रिणीचेदेखील नाव होते.

कवी कुसुमाग्रज हे सुरेश भटांचे आवडते कवी होते. पण कालांतराने ते नावडते होत गेले. एका मुलाखतीत त्यांना 'कुसुमाग्रज आवडतात का?' असे विचारता ते म्हणाले होते, ''पूर्वीचे.'' मग आवडते कुसुमाग्रज नावडते का झाले? याचे कारण असे सांगण्यात येते की, तो काळ आणीबाणीचा होता. आणीबाणीच्या काळात भटांचे विचार बदलत गेले. कुसुमाग्रजांनी त्या आणीबाणीचे केलेले समर्थन भट यांना रुचले नाही. पुढे भट यांनी कुसुमाग्रज यांना 'मराठी साहित्यातील सत्यसाईबाबा' अशी उपमा देऊन एक घणाघाती, कठोर शब्दांत लेख लिहिला.

**मधुकर केचे**

मधुकर केचे हे भटांचे महाविद्यालयीन काळातील मित्र होते. पण केचे हे सतत भटांच्या विरोधात असत. असे असले तरी भटांच्या संयमित प्रगतीने पुढे केचे हे आश्चर्यचकित झालेच, पण तितकेच हळवेदेखील

झाले. केचे यांना या गोष्टीचा फार आनंद होता की, आपल्याला चांगली नोकरी, चांगली बायको मिळाली पण भट मात्र स्थिर झाले नाहीत. 'सुरेश, तू आता संपलास!' असे म्हणणारे केचे हेच त्यामानाने लवकर संपले. भटांना जेव्हा 'तू संपलास.' असे ते म्हणाले, तेव्हा भटांनी त्यांना छान उत्तर दिले. ते असे की, ''अजून फैसला व्हायचा आहे.''

लतादीदींची गाणी सर्वत्र वाजू-गाजू लागली. त्यांना विविध पुरस्कार मिळू लागले, ओठा-ओठांवर भटांच्या ओळी कोरल्या जाऊ लागल्या आणि म्हणूनच नाइलाजाने केचे यांना 'हा माझा मित्र' असे म्हणावे लागत असे! यावरून भट यांना 'संपले' असे म्हणणाऱ्यांची काय अवस्था झाली ती कळते.

**नारायण सुर्वे**

अनाथ, शोषित, मजदूर अशा दुर्बल वर्गासाठी नारायण सुर्वे हे सतत लिहीत असत. समाजातील या घटकांची बाजू मांडणारे लिखाण ते करीत. त्यांच्या लिखाणाचा विषयच समाजातील प्रश्न, समस्या असत. भटही तेच करीत.

भटांना कार्ल मार्क्स आवडे तसाच सुर्वेंनादेखील आवडे. पण भटांना मार्क्ससोबतच भांडवलदारांची बाजू घेणारे पंडित नेहरूही आवडत. सुर्वे मुंबईसारख्या महानगरीत वाढले. त्यातल्या त्यात मजूर लोकांमध्ये वाढले, उर्दू शायरी त्याच वर्गाच्या दिशेने जात असल्याने सुर्वे यांची उर्दूशी, तसेच गझलेशी जवळीक होती.

कालांतराने सुर्वे हे परभणी संमेलनाचे अध्यक्ष झाले, त्या संमेलनापूर्वीच मुंबईमध्ये दंगे झाले होते. सुर्वे हे मुळातच समाजातील विविध विषयांवर लिखाण करणारे होते. पण या दंग्यांबद्दल सुर्वेंनी काहीच लिहिले नाही; भटांना त्यांची ही गोष्ट खटकली. तसेच नामांतरावरही त्यांनी काही लिहिले नाही म्हणून भट खवळले.

**विठ्ठल वाघ**

विठ्ठल वाघ हे एक अफलातून व्यक्तिमत्त्वाचे कवी. 'काळ्या मातीत मातीत माझी तिफन चालते' हे त्यांचे गाजलेले गीत (कविता). अकोल्यात

◆ *गांजलेला माणूस वेदना असह्य झाल्यावर मनातून आर्ततेने उद्गार काढतो; पण दुःखाचा डोंगर इतका वाढत जातो की, संपूर्ण जगच काळवंडून गेल्यासारखे, माणुसकी हरवल्यासारखे दिसते आणि सगळेच आपल्या पाठीवर वार करणारे वाटू लागतात; असा भाव त्यांच्या गझलांमधून दिसून येतो.* ◆

हयात गेलेले विठ्ठल वाघ हे काही काळ पुण्यात राहिले होते. भट यांच्या निधनानंतर श्री. वाघ म्हणाले होते - 'ज्ञानेश्वर कवी की तत्त्वज्ञ या संभ्रमाची उकल होऊ नये हा प्रकार पुढे फक्त भटांच्या संदर्भात संभवलेला आहे.' भटांचा उल्लेख करताना वाघ नेहमी म्हणत की, 'बापाचे मुलाशी कधी पटले का? भट आम्हा कवींचा बापच!' ''आम्ही ती स्मशाने, ज्यांना प्रेतही न वाली,'' ''बोल रे हळू, उठेल चांदण्यावरी तरंग'' अशा कल्पना रचणारा बापमाणूसच असू शकतो असे वाघ यांचे म्हणणे होते. २८ जून १९६७ रोजी भट यांनी लिहिलेले 'आम्ही ती स्मशाने...' हे गीत पुढे 'सिंहासन' या चित्रपटात आले. या गीताचे प्रथम शीर्षक 'स्वातंत्र्य' असे होते.

**राम शेवाळकर**

'वक्ता दशसहस्रेषु' म्हणून प्रचलित व सर्वत्र प्रसिद्ध असे राम शेवाळकर हे साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष होते. शेवाळकर व भट यांची महाविद्यालयापासून मैत्री होती. शेवाळकर जेव्हा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले तेव्हा सुरेश भट प्रकृती बरी नसतानाही त्यांचे अभिनंदन करण्यासाठी हार व पेढे घेऊन गेले होते. आपला मित्र अध्यक्ष झाल्यामुळे आता आपण त्याच्याविरोधात लिखाण करायचे नाही असे भट यांनी ठरवले होते. पण त्यांचा तो 'पण' मोडीत निघाला. कारण पुण्यातील एका समारंभात शेवाळकर यांनी ''सुरांचे सामर्थ्य शब्दांपेक्षा श्रेष्ठ असते. शब्दांनी सुरांच्या आगमनासाठी पायघड्या घालायचे काम करायचे असते'' असे उद्गार काढले. भटांना त्यांच्या या उद्गाराचा संताप अनावर झाला. त्यांनी २३ सप्टेंबर १९९४ रोजी 'लोकप्रभा'त

एक लेख लिहिला व आपला संताप व्यक्त केला. त्यांचे म्हणणे होते, ‘शेवाळकर चांगले बोलतात म्हणून त्यांनी काहीही बोलावे का? सूर व शब्दांमध्ये भांडणे का लावावीत? शब्दांच्या मिठीत स्वर व स्वरांच्या मिठीत शब्द हे अनुभवण्याचे काम आहे. अनुभवावाचून पांडित्य व्यर्थ असते.

संत तुकाराम यांनी तर शब्दाला ‘जिवाचे जीवन’ म्हटले आहे. दोन्ही तुल्यबळ आहेत.’ हे सांगतानाचा त्यांचा खरा राग वेगळाच होता. ज्यांची हयात शब्दांवर गेली त्या रामभाऊंनी ही भांडणे का लावावीत हा होता. पण ‘शब्द व सूर तुल्यबळ आहेत’ हे सांगता सांगताच शेवटी भटांनी मात्र, ‘गायक बदलतात, सूर बदलतात, शब्द जसेच्या तसे राहतात. तुलसी, मीरा, सूरदास, कबीर, ज्ञानेश्वर, संत तुकाराम इत्यादी अमर कवींचे शब्द आजही जसेच्या तसे टवटवीत, अम्लान आहेत. शब्द कधीच म्हातारे होत नसतात’ हे आवर्जून सांगितले.

**मंगेश पाडगावकर**

मंगेश पाडगावकर भट यांच्यापेक्षा वयाने मोठे होते. त्यांनी कवितांचे सर्व प्रकार हाताळण्याचा प्रयत्न केला. गझलचा जमाना आल्यावर गझलादेखील लिहिण्याचा प्रयत्न केला. १९८१ च्या दरम्यान त्यांचा ‘गझल’ नावाचा संग्रहही आला. त्यातील एका गझलेचा मतला पुढीलप्रमाणे-

*दुःख ज्याने सोसले तो का सुखाला भाळतो?*
*तू मला सांभाळ आता मी तुला सांभाळतो.*

मंगेश पाडगावकर मुळातच प्रतिभावंत असे कवी असल्याने त्यांनी लिहिलेल्या अनेक ओळी गझलच्या अंगाने जाणाऱ्या आहेत.

मंगेश पाडगावकरांनी ‘हमरदीफ’ गझल लिहिली, पण ती भटांना काही केल्या आवडलीच नाही.

*डोळ्यावरून माझ्या उतरून रात्र गेली*
*वचने मला दिलेली विसरून रात्र गेली!*

१९८३ मध्ये एल्गार हा बहुचर्चित गझलसंग्रह सुरेश भट यांचा! त्यात ‘केव्हा तरी पहाटे’ ही गझल. या गझलेमध्ये व पुढे ‘झंझावात’ मधील गझल या दोघांमध्येही यमक-अंत्ययमकाची गझल दिसून येते.

> ◆ ***१९८० साली पुण्यात भरलेल्या मैफलीमध्ये भट यांनी पुणेकऱ्यांची मने जिंकली! तसेच त्यांची या मैफलीतील मुलाखत आकाशवाणीवर घेण्यात आली.*** ◆

*अजूनी सुगंध येई दुलईस मोगऱ्याचा*
*गजरा कसा फुलांचा विसरून रात्र गेली!*

दोन्ही संग्रह जे वाचतील त्यांना येथे दोन्ही गझलांमधील शेवट हा द्विपदीने, शेराने झालेला आहे असे वाटेल. भट हे शब्दांबाबत चोखंदळ होते. त्यांनी केलेला बदल हा योग्यच वाटतो. खोलीपेक्षा दुलईला सुगंध येणे हे काही वेगळेच सुचवतो.

कविवर्य मंगेश पाडगावकर आणि सुरेश भट यांच्या 'काव्यवाङ्मयाचा तौलनिक अभ्यास' या विषयावर 'चंद्रपूर' जिल्ह्यातील बल्लारपूर येथील प्रा. विजय मारोतराव सोरते यांनी पीएच.डी. केली आहे. त्यात सोरते यांनी काढलेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे -

१) पाडगावकर यांच्या गझलमध्ये अधिकतर माणसातील माणूसपणाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. तर भट यांच्या गझलचा मुख्य विषय प्रेम व शृंगार आहे.

२) भटांच्या कवितेतील निसर्ग त्यांच्या प्रीतीभावनेच्या अनुषंगाने आलेला आहे.

३) भट यांनी गीत हा प्रकार केवळ प्रयोग म्हणून हाताळला आहे.

४) सुरेश भट यांनी बालकवितेची निर्मिती केली नाही असे म्हटले तरी चालेल.

भट यांच्या गझलांचा विषय प्रेम व शृंगार कुठे आहे? तर प्रदीप निफाडकर यांच्या मते, भटांच्या प्रेमावरच्या गझला फार कमी आहेत, उलट सामाजिकच गझला जास्त आहेत.

भट यांनी गीत हा प्रकार केवळ प्रयोग म्हणून हाताळला म्हणणे हे भटांवर अन्यायकारकच आहे. कारण त्यांची गीते जास्त लोकप्रिय आहेत. त्यांनी गीतेच प्रथम लिहिली, नंतर ते गझलेकडे वळले. सुरेश भट बालकविता व व्यंगात्मक चांगले लिहू शकत होते. 'सप्तरंग' वाचल्यास स्पष्ट होईल की, भट यांनी बालकविताही चांगल्या लिहिल्या असत्या;

पण गझल काव्यप्रकार रुजवायचा या नादात त्यांनी गीते, व्यंगात्मकता, बालकाव्य यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. प्रतिभावंत कोणताही प्रकार सहजपणे हाताळू शकतात. पण भट यांनी गझलवर पूर्णपणे लक्ष केंद्रित केले म्हणूनच तो प्रकार रुजू शकला याची जाणीव बाळगणे गरजेचे आहे. भट मुळात माणूस शोधत नव्हते तर ते अवतीभोवती असलेल्या माणसांच्या व्यथांचे मूळ शोधत होते, त्यांचे दुःख अनुभवत होते. त्या दुःखांना, व्यथांना कारण असलेल्या समस्यांवर भट यांनी 'एल्गार' मधून थेट हल्लाबोल केला आहे.

**ग्रेस**

भट यांचे समकालीन आणि नागपुरात वास्तव्य असलेले आणखी एक मोठे कवी होते. ते म्हणजे 'ग्रेस'. म्हणजेच माणिक गोडघाटे. भटांच्या चाहत्यांचे असे म्हणणे होते की, भट व ग्रेस यांच्यात दुरावा होता. पण ग्रेस यांना विचारले असता ते म्हणाले, ''अहो, मी भट यांची कविता दहा वर्षे अत्यंत प्रेमाने शिकवली हो.'' एवढेच नाही तर 'चंद्रमाधवीच्या प्रदेशात' हिंडणाऱ्या ग्रेस 'माणसांच्या मध्यरात्री हिंडणारा सूर्य' असलेल्या भटांविषयी ते नेमके काय मत व्यक्त करतात ते फार महत्त्वाचे आहे. भटांच्या निधनानंतर ग्रेस म्हणाले होते-

''आधुनिक मराठी कवितेत कविवर्य सुरेश भट यांचे योगदान खरेच मोठे आहे. तो वादाचा मुद्दा नाही. पण त्यांनी आपल्या भावनात्मक कवितेला आपल्या व्यक्तिमत्त्वाची जी अनन्यसाधारण जोड दिली, तशी कुणीच मराठीत गझललेखन करणाऱ्या कवीने दिलेली नाही. त्यामुळे आधुनिक मराठी कवितेतील गझल, भटांच्या काळात आणि भटानंतर कुणीही लिहिली तरी गझल या शब्दाचा प्रयोग करताक्षणीच कविवर्य सुरेश भट यांची नाममुद्रा मुक्रर झालेली दिसते. सामाजिक अंगाने आपल्या प्रेयसीच्या मनाशी हितगुज करण्यात, सामाजिक दुःखाचा कानमंत्र आपल्या प्रेयसीच्या कानात इतक्या हळुवारपणे गुणगुणणारा दुसरा कवी नाही. किंबहुना, सामाजिक कविता आपल्या प्रेयसीच्या हातात हात घालून आधुनिक काळात दुसऱ्या कुठल्याही कवीने लिहिलेली नाही. 'सोबती' कवितेतील जे निःसंगपण आहे, भणंगपणा मी म्हणत नाही,

◆ ***‘गायक बदलतात, सूर बदलतात, शब्द जसेच्या तसे राहतात. तुलसी, मीरा, सूरदास, कबीर, ज्ञानेश्वर, संत तुकाराम इत्यादी अमर कवींचे शब्द आजही जसेच्या तसे टवटवीत, अम्लान आहेत. शब्द कधीच म्हातारे होत नसतात’*** ◆

निःसंगपण आहे, ते मला भयंकर मोलाचे वाटते. ‘सोबती काही जिवाचे मात्र यावे न्यावयाला, तारकांच्या मांडवाखाली चिता माझी जळावी;’ इतिहासातल्या सर्व स्मशानभूमींना याचा हेवा वाटेल असे आगळेवेगळे स्मशान भटांनी आपल्या मृत्युसाठी मुक्रर केले. ती चिता सतीचे व्रत धारण केलेल्या एका गझलकाराची असल्यामुळे ती चिता त्याच्या गझल नावाच्या सतीला उजळूनच टाकणार. ती कधीही विझणार नाही.’’

ग्रेस ज्या कवितेबद्दल बोलले ती कविता महेंद्र कपूर यांनी गायली होती. हृदयनाथ मंगेशकर यांनी भट यांचे पहिले संगीतबद्ध केलेले ते गीत होते -

*पूर्तता माझ्या व्यथेची माझिया मृत्यूत व्हावी*
*जीवनापासून माझ्या ह्या मला मुक्ती मिळावी।*

*वेदनेला अंत नाही अन् कुणाला खंत नाही*
*गांजणाऱ्या वासनांची बंधने सारी तुटावी।*

*संपली माझी प्रतीक्षा, गोठली माझी अपेक्षा*
*कापलेले पंख माझे... लोचने आता मिटावी।*
*सोबती काही जिवाचे मात्र यावे न्यावयाला*
*तारकांच्या मांडवाखाली चिता माझी जळावी।*

*दूर रानातील माझी पाहुनी साधी समाधी...*
*आसवे साऱ्या फुलांची रोज खाली ओघळावी।*

*कोण मी आहे? मला ठाऊक नाही नाव माझे!*
*शेवटी माझ्या धुळीने चौकशी माझी करावी।*

*हे रिते अस्तित्व माझे शोध शून्यातील वेडा-*
*माझिया मागेच माझी सर्व ही ओझी रहावी!*

*काय सांगावे तुला मी? काय मी बोलू तुझ्याशी?*
*राख मी झाल्यावरी गीते तुला माझी स्मरावी!*
*(रूपगंधा संग्रहातील 'स्मरण'; पान ८०)*

**बा. भ. बोरकर**

'आनंदयात्री कवी' असे ज्यांना म्हणायचे ते म्हणजेच बा. भ. बोरकर. भट यांच्या गझलेबद्दल त्यांना आदर तसेच प्रेमदेखील होते. ते व्यक्त करताना म्हणतात- ''गझल या काव्यप्रकाराचा आवाकाच मोठा आहे. अध्यात्मापासून प्रेमापर्यंत आणि युद्धापासून शांततेपर्यंत कोणत्याही विषयाचे तिला वावडे नाही. हे विषय लीलया हाताळण्याचे कसब कवीच्या स्वतःच्या उंचीतून येते. या समाजाशी असलेल्या बांधिलकीतून ही उंची त्याला प्राप्त होते. सुरेश भट यांचा आवाका असा मोठा आहे. 'मल्मली तारुण्यापासून' 'आयुष्याच्या मशाली' करण्याच्या आवाहनापर्यंतची झेप त्यांच्या प्रतिभेला सहजपणे घेता येते.'' भटांच्या गझलेची ही उंची त्या कवीलाही कळली होती.

**पु. ल. देशपांडे**

महाराष्ट्रातील वाचकवर्गाचे किंवा रसिकांचे 'आवडते व्यक्तिमत्त्व' म्हणजेच पु. ल. देशपांडे! पु. ल. देशपांडे ऊर्फ भाईंनी व 'आहे मनोहर तरी' असे लिहिणाऱ्या पत्नी सुनीताबाई यांनी भट यांच्यावर अतोनात प्रेम केले. भाईंच्या उपस्थितीत भट यांच्या कवितांचे किती तरी कार्यक्रम झाले. एका कार्यक्रमाला भाईंनी जे निवेदन केले ते त्यांच्या 'गाठोडं' नावाच्या पुस्तकात 'गीत गंगेच्या तटावर' प्रसिद्ध आहे. भाईंनी केलेले निवेदन हे उत्कृष्ट होते. त्यामध्ये त्यांनी भटांबद्दल फारच अप्रतिम शब्द वापरलेले

◆ *भट हे मुळात माणूस शोधत नव्हते तर ते अवतीभोवती असलेल्या माणसांच्या व्यथांचे मूळ शोधत होते, त्यांचे दुःख अनुभवत होते. त्या दुःखांना, व्यथांना कारण असलेल्या समस्यांवर थेट हल्लाबोल भट यांनी 'एल्गार'मधून स्पष्ट केला आहे.* ◆

दिसून येतात. ते म्हणाले, ''मी सुरेश भटांचा उल्लेख अमरावतीचे कवी' असा केला, कारण चांगला कवी हा भूगोलाच्या नकाशात न सापडणाऱ्या एका अमरावतीचाच असतो.'' पुढे ते म्हणाले, ''सूर हरवलेल्या आजच्या मराठी कवितेला अत्यंत सामर्थ्यानं सूर शोधून देणारा सुरेश भट हा आजचा एकमेव नवकवी आहे. त्यांनी आपली सुरेश आणि भट ही दोन्ही नावं सार्थ केली! मित्र हो, दुर्दैवानं आम्ही 'भटा'चा संबंध सोवळ्या भांड्याशी जुळवला आहे. भट्ट म्हणजे वीर! शूर! सुरेशनं कवितेला सूर दिला आणि भावनांच्या शौर्याचं, सामर्थ्याचं दर्शन घडवलं. इथे वेदना रडत आली नाही, वेदना ज्वाला होऊन आली. 'रूपगंधा' ह्या त्यांच्या कवितासंग्रहानं कवितेचं सुंदर रूप आणि सुरांचा गंध ह्यांचा नवा साक्षात्कार घडवला.''

*रे तुला बाहूत माझ्या रूपगंधा जाग यावी*
*मी तुला जागे करावे, तू मला बिलगून जावे*

असे भटांनी म्हटल्यावर साक्षात् मराठी रसिक जागा झाला आणि आमच्या ह्या जवान कवीला अष्टांगांनी बिलगून गेला. त्या रूपगंधा कवितेचा हा आविष्कार :

*मल्मली तारुण्य माझे तू पहाटे पांघरावे*
*मोकळ्या केसात माझ्या तू जिवाला गुंतवावे।*
*तापल्या माझ्या तनूची तार झंकारून यावी*
*रेशमी संगीत स्पर्शाने पुन्हा तू पेटवावे ।*

या दोन ओळींत सुरेश भटांनी जणू काही साऱ्या कलानिर्मितीचेच रहस्य सांगून टाकले आहे. तार ताणल्याशिवाय ती सूर निर्माण करू शकत नाही. सुरेश भटांची काव्यनिर्मिती ही कुठल्या तरी खोल वेदनेचा साक्षात्कार घडवत असते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे त्यांनी एका तीव्र

वेदनेला नुसता मातीचा गोळा होऊन पडू न देता 'मग' ही वेदनेची सुंदर मूर्ती घडवलेली कविता होय. पु.ल. म्हणतात, ''डोळे उघडे ठेवून जगणारे फारच थोडे असतात. बहुधा मिटल्या डोळ्यांनी किंवा डोळ्यांवर कातडं ओढून जगणाऱ्यांची संख्या मोठी. तशी पापण्यांची झाकणं उघडी असतात, त्यांना रंगही दिसतात पण अंतरंग दिसत नसतं. ते कवीला दिसतं. 'क्ष' किरणासारखी ही किरणं जीवन उत्कट करतात, तसेच वेदनेच्याही मूर्ती घडवतात. आणि मग- 'मग' ह्याच नावाची कवितामूर्ती प्रकट होते.'' 'मग'ह्या कवितेतील भटांच्या सुंदर ओळी-

*मग माझा जीव तुझ्या वाटेवर वणवणेल*
*अन् माझी हाक तुझ्या अंतरात हुरहुरेल!*

पुढे भाई म्हणतात, ''सुरेश भटांचं 'गझल' ह्या वृत्तावर फार प्रेम आहे. साहजिकच आहे. कारण 'गझल' हे केवळ वृत्त नाही. ती एक 'वृत्ती' आहे. साऱ्या जीवनाकडे पाहण्याची ती एक वृत्ती आहे. मराठीत यापूर्वीही गझल लिहिली गेली. पण चार उर्दू शब्द पेरले म्हणजे गझल होत नाही. हे म्हणजे केवळ कल्ले आणि दाढी वाढवून शिवाजी होण्यापैकी आहे किंवा पंचा नेसून गांधी होण्यासारखं म्हणा हवं तर! सुरेश भटांची 'गझल' ही त्यांच्या कलंदर भाववृत्तीतून आली आहे. ही कलंदर वृत्ती जीवनाला लाथाडणाऱ्याची नाही, तर साऱ्या जीवनाला कवटाळू पाहणाऱ्या कलावंताची आहे. नुसतंच इश्क, मोहब्बत, शराब, शमा ह्यांना मराठीत घुसवणं म्हणजे गझल नव्हे.''

सुरेश भटांच्या गझलात तर ही परिभाषाच नसते. 'मी असा दाही दिशांना, वारियाने विखुरलेला' असं जेव्हा सुरेश भट म्हणतात, तेव्हा 'अवघी गुते खाण्या आली' म्हणणाऱ्या किंवा 'अणुरणिया थोकडा तुका आकाशाएवढा' म्हणणाऱ्या तुकारामासारखे ते जीवनाच्या अलौकिकाचे उपासक होतात.'

पुढे भटांबद्दल भाई म्हणतात, ''मित्रहो, हे निवेदन करताना मला सारखी भीती वाटते आहे, ती रसभंगाची! सुरेश भटांच्या कविताच इतक्या बोलक्या आहेत की, त्यांच्यावर भाष्य करण्याची आवश्यकताच नाही', पण संध्या करताना हात जोडून नमस्कार केला, तरी तोंडात 'केशवाय नमः' असं म्हणायचं असतं किंवा फुलं अर्पण करताना 'पुष्पं

◆ *''आधुनिक मराठी कवितेत कविवर्य सुरेश भट यांचे योगदान खरेच मोठे आहे. तो वादाचा मुद्दा नाही. पण त्यांनी आपल्या भावनात्मक कवितेला जी आपल्या व्यक्तिमत्त्वाची अनन्यसाधारण जोड दिली, तशी कुणीच मराठीत गझललेखन करणाऱ्या कवीने दिलेली नाही.''* ◆

समर्पयामी' असं म्हणायचं असतं, तसं सुरेश भटांचं गाणं अर्पण करताना 'गीत अर्पयामी' असं म्हणायला हवं.''

माणसाच्या मनाला कैफ चढल्याशिवाय त्याला गझल लिहिताही येणार नाही आणि तसल्या कैफाची ओढ असलेला रसिक असल्याशिवाय त्या कैफाचा आनंदही घेता येणार नाही. लोकविलक्षण 'कैफ' हा तर सुरेश भटांच्या साऱ्या निर्मितीचा स्थायिभाव आहे. या कैफाची तऱ्हा कुठली, ते त्यांच्याच शब्दांत दिसतं. ते ''आपुल्या कैफात मी'' या कवितेत पुढीलप्रमाणे-

*माझिया पायावरी, आकाशगंगा लोळते*
*चेहरा माझा कधी, आभाळ हे कुरवाळते*
*झोकही जाताच माझा, विश्व होई घाबरे*
*झिंगलो मी, पुण्यही; पायात माझ्या झिंगते*
*आपुल्या कैफात मी...*

**सुधीर फडके**

सुधीर फडके हे महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध, युगकर्ते संगीतकार तसेच गायकही होते. सुरेश भटांचे हे गीत आजही लष्करात गायले जाते. सुधीर फडके यांनी या गीताला संगीत दिले. ते गीत असे-

*मर्द आम्ही मराठे खरे! दुष्मनाला भरे कापरे!*
*देश रक्षवाया, धर्म तारावया, कोण झुंजात मागे सरे?*

*वादळापरी आम्ही पुढेच चालतो*
*'जय शिवाजी' गर्जुनी रणात झुंजतो!*

*मरहटा कधी न संगरातूनी हटे*
*मारुनी दहास एक मरहटा कटे!*

*सिंधू ओलांडुनी धावतो संगिनी, पाय आता न*
*मागे सरे! मर्द आम्ही...*
*''व्हा पुढे!' आम्हा धनाजी, बाजी सांगती,*
*''वीर हो उठा!' कडाडतात नौबती!*
*विजयघोष दुमदुमे पुन्हा दिगंतरी*
*पूर्वजांपरी आम्ही अजिंक्य संगरी!*
*घेऊ शत्रूवरी झेप वाघापरी, मृत्यू आम्हापुढे घाबरे! मर्द आम्ही...*
*भारता आम्ही तुलाच देव मानतो*
*हाच 'महाराष्ट्र धर्म' एक जाणतो!*
*राखतो महान आमुची परंपरा,*
*रक्त शिंपुनी पवित्र ठेवतो धरा!*
*ह्याच मातीवरी प्राण गेला जरी, आमुची वीरगाथा उरे! मर्द आम्ही...*

तसेच त्यांनी कारगील युद्धानंतर लिहिलेली कविताही पाहा-

*बेईमान दुश्मनास चारण्या खडे!*
*चालले जवान मर्द उत्तरेकडे*

*एक साथ हिंदवीर चालती*
*मायभू, तुझ्या दुधास जागुनी!*
*दुश्मनास ठेचण्या पिटाळण्या*
*चालले पुढेपुढेच पेटुनी!*
*सारखा पुढेच पाय संगरी पडे!*
*चालले जवानमर्द उत्तरेकडे!*
*जात धर्मही कुणा न आठवे,*
*भेदभाव संकटात संपला!*
*काय खायचा पुन्हापुन्हा दगा!*
*हा अखेरचा असेल फैसला!*
*भोगतील आपुलेच कर्म पाकडे!*

***‘सोबती काही जिवाचे मात्र यावे न्यावयाला,***
***तारकांच्या मांडवाखाली चिता माझी जळावी;’***
***इतिहासातल्या सर्व स्मशानभूमींना याचा हेवा***
***वाटेल असे आगळेवेगळे स्मशान भटांनी***
***आपल्या मृत्युसाठी मुक्रर केले.***

*चालले जवानमर्द उत्तरेकडे!*

*एक एक प्राणपुष्प वाहिनी*
*पूजितो आम्ही पवित्र ही धरी!*
*आज आठवे आम्हास आमुची*
*मारुनी मरायची परंपरा!*
*आमुचे करील कोण काय वाकडे?*
*चालले जवानमर्द उत्तरेकडे!*
*राहिले जुने हिशोब घ्यायचे!*
*का खुन्यांसही क्षमा करायची?*
*व्यर्थ का शहीद रक्त सांडती?*
*का चिताचिता पुन्हा विझायची?*
*आज काय का आमुचे कुणाविना अडे?*
*चालले जवानमर्द उत्तरेकडे!*

*हा असा कसा बरे जिहादही*
*जो पुकारतात ही जनावरे?*
*या रणात ‘बातचीत’ कोठली?*
*धर्मयुद्ध फक्त आमुचे खरे!*
*पर्वतापल्याड ‘तो’ खुनी कुठे दडे?*
*चालले जवानमर्द उत्तरेकडे!*

*येथल्या कुशीकुशीत जन्मते*
*बालके शहीद कालियापरी!*

*संपले जवानही न येथले*
*कैक वाढती इथे घरोघरी*
*मृत्यूलाच काळजीत कोसळे रडे!*
*चालले जवानमर्द उत्तरेकडे*

हे गीत २० जून १९९९ रोजी 'लोकमत'च्या नागपूर आवृत्तीत प्रसिद्ध झाले. पण ते गीत कुणाला फारसे माहीत नाही.

**आचार्य अत्रे**

आचार्य अत्रे ह्यांचे सुरेश भटांवर प्रेम होते. भट यांची एक कविता आचार्य अत्रे यांच्या 'मराठा' दैनिकात पहिल्या अंकात, पहिल्याच पानावर प्रसिद्ध झाली. ती पुढीलप्रमाणे-

*मराठ्या उचल तुझी तलवार*
*एकीची उचल तुझी तलवार*
*शपथ तुला आईच्या दुधाची*
*घेऊ नको माघार, मराठ्या...*

*शपथ तुला शिवछत्रपतींची*
*चळचळ कापत अवनी सारी*
*काय विसरली दिल्ली तुझिया*
*तलवारीची धार? मराठ्या...*

*दाहीदिशांना तुडवित होत्या*
*तुझ्याच घोड्यांच्या रे टापा*
*अवघा भारत पहात होता*
*गड्या तुझा वाघासम छापा*
*तुझी जात मर्दाची मर्दा*
*कर शेवटचा वार, मराठ्या...*

*आता दाखव तराजूस तू*
*अपुल्या तलवारीचे पाणी*
*सांग विकत का घेतील तुजला*

◆ ***सूर हरवलेल्या आजच्या मराठी कवितेला अत्यंत सामर्थ्यानं सूर शोधून देणारा सुरेश भट हा आजचा एकमेव नवकवी आहे.*** ◆

*बनियाच्या थैलीतील नाणी*
*भीक कशाला, घे हक्काने*
*तुझेच तू भांडार, मराठ्या...*

*कमनशिबाने तुझे पुढारी*
*बाजीराव पळपुटे निघाले*
*नव्याच बाळाजीपंताने*
*निशाण चोरांचे फडकवले*
*अशा पिसाळा उडवाया कर*
*ऐक्याचा निर्धार, मराठ्या...*

*स्वर्गामधल्या पुण्यात्म्यांचे*
*तुजवर मर्दा खिळले डोळे*
*आणिक टपून बसले दुश्मन*
*तुझे पुरे करण्या वाटोळे*
*जिंकलास तर अखिल विश्व तव*
*करील जयजयकार, मराठ्या...*

भटांनी काळानुसार राजकारणातील बदलांप्रमाणे वरील कवितेमध्येदेखील बदल केले आहेत.

❖❖❖

# भटांनी हाताळलेले इतर काव्यप्रकार

सुरेश भट यांनी गझल, हझल, मंगलाष्टक, लावणी, अभंग, अंगाईगीत तसेच इतरही काव्य प्रकार हाताळले. एवढ्यात ते थांबले नाही तर देशप्रेमावर त्यांनी स्फूर्तिगीतेही लिहिली. ती फार महत्त्वाची आहेत. सुरेश भट यांनी कवितांचे असे जवळजवळ सर्वच प्रकार हाताळले आहेत. त्यांच्या आईने त्यांच्याकडून वृत्ते पाठ करून घेतली होती. अनेक वृत्ते त्यांनी सुंदररीतीने वापरली आहेत. उदा. 'मल्मली तारुण्य' सारखी रचना तर 'भोगले जे दुःख' ही देवप्रिया वृत्तातील कविता, तसेच हिंदीतील विधाता, उर्दूतील रमल अशी सर्व वृत्ते त्यांनी अचूकरीत्या वापरली आहेत.

**मंगलाष्टके**

अगदी जवळच्या असणाऱ्यांना किंवा अगदी आग्रह करणाऱ्यांना भटांनी 'मंगलाष्टक' लिहून दिली. त्यातली एक ओळ पुढीलप्रमाणे-

*व्हावे लग्न तुझे म्हणून गधडे, जोडेकी झिजवले*

वास्तविक पाहता मंगलाष्टके लिहिणे फार अवघड असते, कारण ती शार्दूलविक्रीडित वृत्तात लिहावी लागतात.

शार्दूल म्हणजे सिंह. त्याच्या चालण्यासारखे हे वृत्त. हे रुबाबदार तर आहेच, पण तितकेच कठीणही आहे. यामुळे ते लिहिणेही कठीण आहे. पण भट यांचा वृत्तांचा अभ्यास खूप खोलवर असल्याने त्यांना कोणतीही अडचण येत नाही. 'मंगलाष्टके' हा पैसे मिळवण्याचा उद्योग नव्हता, पण काही कवी मंगलाष्टके पैशांसाठी लिहीत असत. सुरेश भट तसे न करता अगदी फारच आग्रह करणाऱ्यांसाठी मंगलाष्टके लिहीत असत. वैद्य-चेंडके विवाहात त्यांनी लिहिलेले एक मंगलाष्टक आहे. त्यात बाकीच्या कल्पना ठीक आहेत; पण एक कल्पना अशी वापरली आहे की, याआधी ती कोणत्याच मंगलाष्टकात वापरली गेली नाही-

*कोणाला आपुलीच लेक नसते प्राणाहुनी लाडकी?*
*देता माता निरोप बाप रडतो, माया बने बोलकी*
*मातेचा महिमा अघात, तरीही माया पित्याची घरी...*
*ताटातूट अशी कुणास बघावे, कुर्यात सदा मंगलम्!*

या मंगलाष्टकात शेवटी भट म्हणतात,

***गझल, हझल, मंगलाष्टक, लावणी, अभंग, अंगाईगीत तसेच इतरही काव्य प्रकार हाताळले. एवढ्यात ते थांबले नाही तर देशप्रेमावर त्यांनी स्फूर्तिगीतेही लिहिली. ती फार महत्त्वाची आहेत. सुरेश भट यांनी कवितांचे असे जवळजवळ सर्वच प्रकार हाताळले आहेत.***

*आले ते गणगोत! मित्र जमले! आले किती सोयरे!*
*वाटे मंगलकार्य हे बघुनिया झाले किती हे बरे!*

म्हणजेच आपण लग्नात जमलेले अक्षताच आहोत ही भटांची उत्तम कल्पना! अशीच एक कल्पना एका मंगलाष्टकात आली आहे. पण तिला मंगलाष्टक न म्हणता ते 'सेहरा' म्हणतात. 'सेहरा' म्हणजे उर्दूतील मंगलाष्टकासारखा पण गझलेच्या अंगाने जाणारा प्रकार आहे.

*कशी गुलाबी पहाट झाली, सुनीतच्या जीवनात पूर्वा*
*पहाट झाली जरी तरीही सुनीतची चांदरात पूर्वा*

त्यातील एक हटकेबाज कल्पना पुढीलप्रमाणे-

*नभातल्या तारका मिळाल्या मुलीस त्या अक्षताप्रमाणे*
*उगीच का लाडकी असे ही जवाहराच्या घरात पूर्वा!*

ही कल्पना पूर्वा नावाच्या एका मुलीला त्यांनी 'सेहरा' लिहून देताना केली आहे, हे स्पष्टच आहे.

- तारकांच्या अक्षता ही कल्पनाच किती भन्नाट आहे! विशेष म्हणजे या सेहऱ्याला मक्ताही होता. 'मक्ता' म्हणजे शेरात कवीने स्वतःचे नाव घातलेले असते. उदा. तुका म्हणे, नामा म्हणे, कहे कबीर.

*खरेखुरे ते कुबेर ज्यांना मिळे खरे प्रेम माणसाचे*
*'सुरेश' साधीसुधीच राहू सदैव ही माणसात पूर्वा!*

१३ नोव्हेंबर १९८५ रोजी भटांनी हा सेहरा लिहिला होता. तसेच त्यांनी एका शेरात आडनावही आणले आहे ती गझल पुढीलप्रमाणे-

*जीव माझा मला संकटासारखा*
*मी तरीही जगे लोचटासारखा*
*ते कधी हे 'असे' वा कधी ते 'तसे'*

*हा जसाच्या तसा मी भटासारखा*

सुरेश भट यांनी शारदादेवीवर चार कडव्यांची, वीस ओळींची लांबलचक आरतीही लिहिली. त्याच्या दोन ओळी -

*तुला भारती आरती गावयाला कुणी चेतवी भाव निरांजन*
*छुनुन छुन-छुनुन छुन कलेची पदे वाजवती तुझ्या-मंदिरी पैंजण!*

## लावणी

भटांनी लावणी हा देखील काव्यप्रकार हाताळला. भटांच्या 'रसवंतीचा मुजरा' या पुस्तकात, तसेच त्यांच्या हयातीत प्रसिद्ध झालेल्या 'सप्तरंग' याही संग्रहात लावणी दिसून येते.

*पाहिले का कोणी माझ्या मनमोहनाला*
*पाहिले का सांगा कोणी माझ्या पाहुण्याला?*
*कशी लागे आपोआप*
*आज ढोलकीला धाप*
*किती बाई समजावू माझ्या घुंगराला?*

## मायभूमी

भटांचे अधिकाधिक जीवन हे अमरावतीत व नागपुरात गेल्यामुळे विदर्भावर म्हणजेच वऱ्हाडावर त्यांचे प्रेम होते. म्हणूनच बहिणाबाईंच्या शैलीने जाणाऱ्या कविता ते लिहितात. विदर्भावरील (वऱ्हाड) प्रेम व्यक्त करताना ते म्हणतात, 'माझ्या वऱ्हाड देशात सोने पिकते वावरी, त्याची कराया राखण होई कुबेर सोकारी'. तसेच त्यांचे देशावरही तेवढेच प्रेम होते. हे प्रेम ते 'गे मायभू तुझे मी फेडीन पांग सारे' अशा शब्दांत व्यक्त करतात.

भटांचे मित्र अरविंद ढवळे यांना एका गीताचा फक्त मुखडा ऐकविला. पण त्यांच्या मित्राने, ''सुरेश, हे गीत कधी पूर्ण करणार?'' असे विचारले. नेहमीच्या शैलीत भटांनी उत्तर दिले, ''देखेंगे, करेंगे आरामसे'' ढवळे म्हणाले, ''ते काही नाही. तू आज रात्रीच लिही. तुला कोंडतोच.'' ढवळेंनी ही कृती केलीही आणि मग काय, कविराजांनी पहाटे पाचलाच ढवळेंच्या शयनगृहाचे दार ठोठावले आणि म्हणाले, 'ऐका हे गीत'. ते

◆ ***सुरेश भटांची काव्यनिमिर्ती ही कुठल्या तरी खोल वेदनेचा साक्षात्कार घडवत असते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे त्यांनी एका तीव्र वेदनेला नुसता मातीचा गोळा होऊन पडू न देता 'मग' ही वेदनेची सुंदर मूर्ती घडवलेली कविता होय.*** ◆

गीत पुढीलप्रमाणे-

*जय जन्मभू! जय पुण्यभू! जय स्वर्गभू खुदायिनी!*
*जय धर्मभू! जय कर्मभू! जय वीरभू जयशालिनी!*

*उधळून प्राणांची फुले महाराष्ट्र तुज मुजरा करी!*
*पाहून तनमनधन तुला पंजाब चरणांना धरी,*
*गाई यशोगीते तुझी वंगीय अमृतवैखरी,*
*गंगेचिया लाटांतूनी उठती तुझे नामध्वनी!*

*गुजरातच्या नेत्री तुझी धावून येती आसवे,*
*बघ, हृदय आंध्राचे जळे जननी, तुझ्या हृदयासवे,*
*रक्तास राजस्थानच्या तुजहून दूर न राहवे,*
*तामीळनाडाच्या उरी आला उमाळा दाटुनी!*

*कर्नाटक, केरळ, ओरिसा सारेच छावे जागती*
*आसामच्या गिरीकंदरी वणवे मनाचे हिंडती,*
*काश्मीरच्या छातीतूनी जखमा तुझ्या बघ वाहती!*
*जय कोटिजनगणमानिनी! जय सकलमानस मोहिनी!*
*एकेक इथला कण म्हणे जय जय सचेत महानता*
*हे गगनमंडल गुंजते, जय एकता! जय एकता!*
*उसळून सागर गर्जती जय भारतीय स्वातंत्र्यता!*
*अंधारल्या जगतामध्ये झळके तुझी सौदामिनी!*

***गझलमध्ये एखादा शेर विनोदी असू शकतो. जर पूर्णच विनोदी शेर असेल तर ती हझल होय. ◆ हझलमध्ये पूर्ण विनोदीच शेर असणे आवश्यक नाही ◆ तर ती वक्रोक्तीपूर्ण व व्यवस्थेवर मार्मिक टिप्पणी केली तर ती हझल होय.***

*तू सुप्तसूर कंठातला, तू श्वास माझा एकला,*
*तू स्पंदने हृदयातली, तू रक्तिमा रक्तातला*
*नाही बरे माझा-तुझा आई, जिव्हाळा संपला!*
*साध्यासुध्या शब्दांत ह्या तू ओतिली मंदाकिनी!*

**हझल**

दोन-दोन ओळींच्या शेरांची एक रचना म्हणजे गझल होय. कमीत कमी पाच शेर तसेच जास्तीत जास्त कितीही शेर येणे म्हणजे गझल होय. गझल ही प्रेमावर तर कधी सामाजिक जाणिवेवर आधारित असते तर काही वेळा वैयक्तिक सुखदुःखावर अवलंबून असते. गझलेत दोन यमके असतात तर कधी एक यमकही असते. गझलमध्ये एखादा शेर विनोदी असू शकतो. जर पूर्णच विनोदी शेर असेल तर ती हझल होय. हझलमध्ये पूर्ण विनोदीच शेर असणे आवश्यक नाही तर ती वक्रोक्तीपूर्ण व व्यवस्थेवर मार्मिक टिपणी केली तर ती हझल होय. उर्दूमध्ये हा प्रकार खूपच लोकप्रिय आहे. उर्दूमधील अकबर इलाबादी हे शेर लिहिणारे उस्ताद शायर होते. 'हंगामा क्यू है बर्पा, थोडीसी जो पी ली है' या गझलेमुळे अकबर इलाहाबादी यांना मराठी माणसं ओळखू लागली. भट यांनी ज्याप्रमाणे नेमकेपणाने गझल हा प्रकार प्रथम आणला त्याचप्रमाणे भट यांनी हझल हा प्रकारही मराठीत प्रथम आणला. आणि त्यांच्या हझलही मोठ्या प्रमाणात मराठीत गाजल्या. त्यातील काही वानगीदाखल -

◆ ***सुरेश भट हे तसे न करता त्यांच्या गळी पडणारे म्हणजेच अगदी आग्रह करणाऱ्यांसाठी मंगलाष्टके लिहीत असत.*** ◆

**दाढी**

भट यांनी पाडगावकरांवर किंवा एकूणच दाढी वाढविणाऱ्या कवींवर लिहिलेली हझल पुढीलप्रमाणे-

*केवढी काव्यातही जादू करी दाढी!*
*वाढवी आता म्हणे वागीश्वरी दाढी!*

*त्या तिथे झाली कुमारी कोंबडी माता!*
*ह्या इथे ही चापते अंडाकरी दाढी!*

*उठ जागा हो! तिला जाऊ नको देऊ!*
*कापते आहे तुझी कोणीतरी दाढी!*

*ह्या कवींना... कोडग्यांना काय सांगावे?*
*लाजण्याला लाजते ही लाजरी दाढी!*

*शोधली जेव्हा तिच्या केसात मी 'क्रांती'*
*केवढी संतापली माझ्यावरी दाढी!*

*याचसाठी ठेवली दाढी न रामाने!*
*रावणाची ओढते मंदोदरी दाढी!*
*हालती माझ्यापुढे या शेकडो दाढ्या!*
*ही खरी की ती खरी की ती खरी दाढी?*

*ऐनवेळा बोलली संतापुनी राधा*
*बोचते मेल्या तुझी ही श्रीहरी दाढी!...*

✶ ✶ ✶

◆ *लोकविलक्षण 'कैफ' हा तर सुरेश भटांच्या सार्‍या निर्मितीचा स्थायिभाव आहे.* ◆

**मुख्यमंत्री**

*येतात मुख्यमंत्री! जातात मुख्यमंत्री!*
*मिळतात सर्व अंती मसणात मुख्यमंत्री!*

*पाहू चला 'मराठी अवतार' मोगलांचे,*
*हल्ली म्हणे टग्यांना म्हणतात मुख्यमंत्री!*

*गर्दी नको, खिसेही आपापले तपासा;*
*गेले इथून केव्हा इतक्यात मुख्यमंत्री?*

*जेव्हा 'समान संधी' त्यांना मिळेल तेव्हा...*
*होतील सात एका हप्त्यात मुख्यमंत्री!*

*नाही मनात शांती! नाही कुठे विसावा!*
*जगल्याविनाच आता जगतात मुख्यमंत्री!*

*सांगू नये कुणीही कोणास 'पथ्यपाणी'*
*जे काय खायचे ते खातात मुख्यमंत्री!*

*हा 'प्लेग' ही नवा अन् लस टोचणेच आले,*
*करतात वायद्याची बरसात मुख्यमंत्री!*

*जे आमदार त्यांना समजू नका 'शिपाई'*
*रांगेमधील तेही 'अज्ञात' मुख्यमंत्री!...*

(सप्तरंग- पान ३३)

'मुख्यमंत्री' ही हझल भटांनी ४ ऑक्टोबर १९९४ रोजी लिहिली.

◆ ***भटांना कोणत्याही प्रकारचा 'वाद' आवडत नसे. समाजवाद्यांवर त्यांनी खूप हल्ला चढवला होता. त्यांनी 'आंबेडकरवादी', 'फुलेवादी' यांनादेखील सोडले नाही. त्यांच्या मते हे कोणीही 'वादी' फक्त 'मी' वादी असतात.*** ◆

**आम्ही समाजवादी**

भटांना कोणत्याही प्रकारचा 'वाद' आवडत नसे. समाजवाद्यांवर त्यांनी खूप हल्ला चढवला होता. त्यांनी 'आंबेडकरवादी', 'फुलेवादी' यांनादेखील सोडले नाही. त्यांच्या मते हे कोणीही 'वादी' फक्त 'मी' वादी असतात. १९८६ मध्ये डॉ. अक्षयकुमार काळे यांनी महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या दिवाळी अंकासाठी घेतलेल्या मुलाखतीत; 'आपल्याला कोणते सामाजिक तत्त्वज्ञान जवळचे वाटते?' असे विचारल्यावर क्षणाचाही विलंब न लावता भट म्हणाले की, 'समाजवाद्यांचे'.

सुरेश भटांची ही हझल 'सप्तरंग'च्या पान ३७ वर प्रसिद्ध झाली आहे.

*आम्ही समाजवादी! आम्ही समाजवादी!*
*लागू नये भल्यांनी अमुच्या कधीच नादी!*

*आम्ही मधून होतो 'सर्वोदयी' महात्मे...*
*'आतील' चीज न्यारी, बाहेर मात्र खादी!*

*इतरांपरी आम्हीही खातो जरी नको ते,*
*अमुच्या समर्थनांची आहे तयार यादी!*
*अमुचा महंत 'लालू'! चालूमधील चालू!*
*शतरंज भामटा अन् आम्ही मुजोर प्यादी!*

*आम्ही पवित्र पापी! आम्ही उदात्त भोंदू!*
*न्यायालयात होतो आम्हीच फक्त वादी!...*

***सुरेशनं कवितेला सूर दिला आणि भावनांच्या शौर्याचं, ◆ सामर्थ्याचं दर्शन घडवलं. इथे वेदना रडत आली नाही, ◆ वेदना ज्वाला होऊन आली.***

पण ७ जानेवारी १९९८ ला या हझलेतही आणखी दोन शेर लिहिले गेले.

*बारामतीस आहे अमुचा खरा तबेला*
*करतो तिथेच आम्ही चाटून स्वच्छ लादी!*

*आम्हा अमेरिकेचे माहेर, धैर्य देई*
*त्यांना पसंत अमुची ही 'शारदीय' शादी*

✶ ✶ ✶

**पाच वर्षांनी**

*भेटती सारे पुढारी पाच वर्षांनी!*
*जाहली वेश्या कुमारी पाच वर्षांनी!*

*ते जरी घेती प्रतिज्ञा ब्रह्मचर्याची,*
*का नराची होय नारी पाच वर्षांनी?*

*जे मिळाले दुःख त्याचे राहिले देणे...*
*ती पुन्हा फेडू उधारी पाच वर्षांनी...!...*

*हा 'समाजा'चा तमाशा! खेळ जातींचा!*
*खेळती सारे मदारी पाच वर्षांनी!*
*भाकरीचा प्रश्न आता राहिला नाही,*
*लोक हो, घेऊ न्याहरी पाच वर्षांनी!...*

ही हझल ४ फेब्रुवारी १९९४ ला लिहिली होती. त्यात आणखी दोन शेर होते-

*जाहले लाचार आता कालचे डाकू*
*ते पुन्हा आले भिकारी पाच वर्षांनी*

◆ ***राजकीय व्यवस्थेबद्दलची ही खंत भटांना पूर्वीपासूनची होती. या राजकारण्यांना थेटपणे 'कुत्रे म्हणण्याचे धाडस भटच करू शकतात. 'एल्गार' संग्रहातील त्यांची 'कुत्रे' ही हझल राजकारण्यांवर लिहिली गेली.*** ◆

*हा कसा त्यांचा सडाया लागला 'पंजा'*
*ही पुन्हा आली बिमारी पाच वर्षांनी!*

या हझलेवरून आपल्या लक्षात येते की, राजकीय व्यवस्थेबद्दलची ही खंत भटांना पूर्वीपासूनची होती. या राजकारण्यांना थेटपणे 'कुत्रे म्हणण्याचे धाडस भटच करू शकतात. 'एल्गार' संग्रहातील त्यांची 'कुत्रे' ही हझल राजकारण्यांवर लहीली गेली.

**कुत्रे**

*एकमेकांना कसे हे चावती कुत्रे*
*हाडकांसाठी कसे हे भांडती कुत्रे*

*हालती या शेपट्याही नेम्या वेळी*
*हे जरी संतापलेले वाटती कुत्रे*

*जन्मले कुत्रे कधी का गर्जण्यासाठी!*
*लोकहो, ऐका जरा हे भुंकती कुत्रे!*
*का करावी माणसांनी एवढी चिंता*
*एकमेकांना जरी हे फाडती कुत्रे*
*हा जुना कुत्रा असो की तो नवा कुत्रा*
*शेवटी कुत्र्याप्रमाणे वागती कुत्रे!...*
(एल्गार - पान ८३)

समाजातील वाईट तसेच वेगवेगळ्या प्रवृत्तींवर भट यांनी ही हझल लिहिली आहे. ही हझल 'लोकमत'च्या नागपूर आवृत्तीत होळीच्या दिवशी प्रसिद्ध झाली. यात त्यांनी कुणा एका व्यक्तीला केंद्रित केले नाही तर त्यात संघवाले (अर्धचड्डी), मद्यपी साहित्यिक, लबाड संत ह्या सर्वांवर लिहिले होते. त्या हझलेचे महत्त्व यासाठी आहे की, ही त्यांची शेवटची रचना आहे. आम्ही 'रसवंतीचा मुजरा' या संग्रहात ती पान ८४ वर दिलेली आहे. पण भटसाहेबांनी जाण्यापूर्वी ती 'लोकमत'ला दिली होती. ती लोकमतने त्यांच्या मृत्युनंतर चार दिवसांनी धुळवडीला म्हणजेच १८ मार्च २००३ ला पहिल्या पानावर छापली होती. त्यात भटांनी, आपल्या देशाला आधार राहिलाच नाही व सर्व पक्ष एकच झाल्याची खंत तीव्रपणे व्यक्त केली आहे. खरे पाहता सर्वच कवी आशावादी असतात; पण भट यांनी या सगळ्या पक्षांचे चेहरे जवळून न्याहाळले होते. जे जे त्यांना दिसले, ते सर्व त्यांनी या हझलेमध्ये मांडले होते. ते म्हणतात-

*आज होळीला कशाला हिंडशी बेकार पांडू?*
*जो तुला भेटेल नेता त्यास जोडे मार पांडू!*

*दूर नाही राहिलेली राजसत्तेची लढाई*
*एरवी, होतास बाबा तू कुणाला प्यार पांडू?*

*वीज कोठे? आढळेना आपल्या राज्यात 'पाणी'*
*राहिला हा घोषणांचा तेवढा अंधार पांडू!*

*संपला आता जमाना दुश्मनी टाळावयाचा*
*आपुल्या भीतीवरी तू मार आता धार पांडू!...*
*जाण तू आता नवे हे अर्थ शब्दांचे नव्याने*
*हीच आहे देशसेवा हा न भ्रष्टाचार पांडू!...*

*शेवटी सारेच झाले पक्ष एका लायकीचे*
*आपुल्या ह्या भारताला कोणता आधार पांडू?*

◆ ***''सुरेश भट यांचा आवाका असा मोठा आहे. मल्मली तारुण्यापासून आयुष्याच्या मशाली करण्याच्या आवाहनापर्यंतची झेप त्यांच्या प्रतिभेला सहजपणे घेता येते.''*** ◆

*सोसणाऱ्यांच्या भुकेला 'जात' कैसी? 'धर्म' कैसा?*
*हा कशाचा धर्म ज्याचा होतसे व्यापार मांडू?*

*ही महागाई अशी अन् ही कशी होळी कळेना*
*बोंबले हा देश सारा, बोंब तूही मार पांडू!*

वरील हझल ही भटांची तशी शेवटची हझल; पण त्याआधीही एक त्यांची हझल होती जी केवळ त्यांचे चिरंजीव 'चित्तरंजन' भट यांनी सुरू केलेल्या 'सुरेश भट डॉट इन' या साइटवर वगळता कुठेही प्रसिद्ध झाली नाही.

## उर्दू गझला

सुरेश भट हे केवळ मराठी भाषेतील गझलेपुरते मर्यादित राहिले नाहीत, तर त्यांनी हिंदी-उर्दूत किंवा ज्याला 'हिंदुस्तानी' म्हणतात अशा भाषेत अनेक कविता लिहिल्या. त्यांची एक हिंदी कविता-

*फूल भरे जोगिन के द्वार*
*हरी हरी अँजुरी में मर-मर के प्रीत नयी*
*रात करे चाँद की गुहार*
*केसर क्यारी से निकली हिरना साँवरी*
*ठुमुक-ठुमुक चल, कही रूके नही पाँव री*
*कहाँ तेरा हाट-बाट कौन तेरा गाँव री*
*बादल की चुनरी पसार*
*काँप-काँप अंग छबी बावरी अँजोरिया*
*ताल में निहारे बार-बार*
*पीपर की छाँव बसे छुई-मुई प्रीत रे*
*अधरों से झाँक रहे अध सँवरे गीत रे*

*अब जाने नाम लिखे सी पियों के मीत रे*
*रेत भरे तीर को बुहार*
*रोम-रोम से अधीर दर्द सब निचौड कौन*
*मंड रहा प्रिया को दुलार...*

भट यांनी 'नात' व 'हम्द' लिहिली. त्या त्यांच्या पुस्तकांमध्ये आहेतच. त्यांची 'नाते-शरीफ' 'इन्कलाब' रचना या उर्दू दैनिकातही प्रसिद्ध झाली होती (७ डिसेंबर १९८६). त्या गझला ऐकून 'धर्मवीर भारती' यांनी भटांना ''तुम्ही हिंदी लिहा. मराठीत काय ठेवले आहे? हिंदीत लिहिले तर जगात पोहचाल'' असे सांगितले. ही सूचनावजा विनंती भटांनी मात्र धुडकावून लावली. त्यांनी ती सूचना मानली नाही. कारण भटांचे आपल्या मातृभाषेवर मनापासून प्रेम होते.

भटांच्या लेखणीमुळे त्यांच्या शब्दांना धार आली. ते तसे जगले म्हणून लिहू शकले.

भटांच्या हिंदीतील तीन कतआही (चारोळी) पुढीलप्रमाणे -

*यहाँ से दूर बहुत दूर तक चले जाओ*
*पडाव टाल के सारे अथक चले जाओ*
*अवश्य सूर्य मिलेगा तुम्हे कहीं न कही*
*लिए हृदय में किरण की कसक (ठणका) चले जाओ*

*बदले दिन रात हम नही बदले*
*बदली कायनात हम नही बदले*
*जमाना बदल गया साथ साथ हमारे*
*जमाने के साथ हम नही बदले...*

सामान्य जनतेच्या हिंदुस्थानी भाषेत लिहिल्या गेलेल्या भटांच्या गझला पुढीलप्रमाणे-

:: ::

*बुझा गये याद के शोले सदियोंसे जलनेवाले*
*थम चुके कारवाँ दिल से बरसों से चलनेवाले*

◆ ***भटांच्या लेखणीमुळे त्यांच्या शब्दांना धार आली. ते तसे जगले म्हणून लिहू शकले.*** ◆

*क्यों उठा है मुद्दत से आशोब शहर में इतना*
*क्यों रोने लगे है फिरसे मेरी कत्ल पे हँसनेवाले*

*आबाद यहाँ की बस्ती शायदही कभी तो होगी*
*थे जिदाँ कब ये मुर्दे, बेकार सिसकनेवाले*

*ना समझा कोई अबतक दुनिया के अंधे रास्ते*
*बिन देखे दुनियादारी करते है करनेवाले*

*मासूम जवानी मेरी कर गयी मुखातिब उनको*
*सोचते रहे शिद्दतसे दानिशवर सुननेवाले...*

(आशोल-गोंधळ, मुखातिब-उद्देशून, दानिशवर-कठोरपणे, हुशार.)

✶ ✶ ✶

*इतना ही अपनी मौत पे बस माजरा हुआ*
*बोले वो मुस्कुराके... बहुत ही बुरा हुआ*
*मेरे लिये न चांद, न तारे, न चांदनी*
*अपना तो धूप ही में पसीना हरा हुआ*

*आया न मेरे हाथ कभी जिन्दगी का हाथ*
*वो था मेरा ही हाथ जो निकला धरा हुआ*
*अब तक पहचानता हूँ रंग मैं साकी शराब का*
*तेरा चषक है मेरे लहू से भरा हुआ...*

:: ::

*टूट कर चेहरे सभी बिखरे हुए है*
*आइने फिर क्यों सजे-संवरे हुए हैं*

*अब न बस्ती में रहा कोई बखेडा*

*चीखते थे जो वोही बहरे हुए है*

*हर दिशा दीवार बनती जा रही है*
*रास्ते मुंह फेर कर मुकर हुए है*

*जोखते हैं बार अब युग प्रश्न किस की?*
*उत्तरों के काफिले गुजरे हुए हैं*

*जिन्दगी आकर यहा ताने न देगी*
*हर समय के छोर पर ठहरे हुए हैं...*

✶ ✶ ✶

:: **नींद** ::

*जानता हूँ मेरा भला होगा*
*मेरा हर दोस्त दोगला होगा*

*फिर पड़ौसी ने दी मुझे गाली*
*आपसी यह भी मामला होगा*

*लो, अचानक वो हो गए गूँगे*
*उनको मेरा पता चला होगा*

*मैं न होता तो कुछ न वो कहते*
*मेरा होना उन्हें खला होगा...*

*क्या भला फैसला करेंगे आप*
*आप का भी तो फैसला होगा*

*आँसुओंसे हमारा बैर नही*
*सांत्वनासे मुकाबला होगा*

*अपनी मंजिल करीब है यारो*

◆ ***सुरेश भट हे केवळ मराठी भाषेतील गझलेपुरते मर्यादित राहिले नाहीत, तर त्यांनी हिंदी-उर्दूत किंवा ज्याला 'हिंदुस्तानी' म्हणतात अशा भाषेत अनेक कविता लिहिल्या.*** ◆

*यानी कुछ और फासला होगा*

*दूर सावन सहम खड़ा है मगर...*
*कोई बादल तो मनचला होगा...*

(दोगला-अकुलीन, ज़लज़ला-भूकंप.)

✶ ✶ ✶

:: ::

*कटे है सर बहुत फिर भी हमारा सर तो बाकी है*
*अगर उजडे है घर लाखो, हमारा घर तो बाकी है*

*भला दो चार लाशोसें कहीं इतिहास बदला है*
*हरावल कूच कर बैठा, मगर संगर तो बाकी है*

*चिताएँ बुझ गई सारी गुआँ उठता नही लेकिन*
*अभी जल्लाद के मन में हमारा डर तो बाकी है...*

(हरावल (ठगपुढारी), माटी - माती)

✶ ✶ ✶

:: ::

*प्यार के इशारों की बात हम नहीं करते*
*धूप में सितारों की बात हम नही करते*
*देखिए तो दरवाज़ा कौन खटखटाता है?*
*अजनबी बयारों की बात हम नहीं करते*

*यूँ तो वक्त के आँसू पोंछते है हम फिर भी*
*दर्द के इज़ारो की बात हम नही करते*

*आनेवाली दुनिया का हौसला स्वयं हम है*
*कागज़ी सहारों की बात हम नही करते*

*आप क्यों नही सुनते आसपास की चीखें!*
*दूर की पुकारों की बात हम नहीं करते*

*हम हैं चंद मुसकाने बदनसीब लोगों की*
*सिर्फ ग़म के मारों की बात हम नहीं करते...*
(बयारों-झुळूक, इज़ारो-ठेकेदार)

* * *

*जगत की रीत बदली है, मेरा अंतर नही बदला*
*समय का प्रश्न बदला है, मेरा उत्तर नही बदला।*

*भला क्या यूँ बदलकर मेरा जीवनग्रंथ बदलेगा?*
*कि जिस का आजतक तात्पर्य क्या, अक्षर नहीं बदला।*

*स्वयं बदले तो बदलो, क्यों मुझे, उपदेश देते हो?*
*कोई बाहर नहीं बदला - कोई भीतर नही बदला।*

*कभी चलते हुए चरणों ने पथ का रूप बदला है*
*मनुज की चाल बदली है, कभी ईश्वर नही बदला।*

*लहू में आग ऐसे है की दम लेने नही देती*
*मेरी तलवार बदली है - मेरा संगर नही बदला।...*

वरील सर्व भटांच्या उर्दू गझला आहेत.

**भटांच्या गाजलेल्या गाण्यांचे किस्से...**

सुरेश भट यांनी शृंगाररसालासुद्धा सुंदर पद्धतीने चितारले आहे. 'उषःकाल होता होता' लिहिणारे भट हेच का? असे वाटणे हे साहजिकच! त्यांची देहयष्टी पाहूनही अनेक जण म्हणत, हा कवी इतक्या हळुवारपणे कसे लिहितो? खरे तर, ही सर्व कमाल प्रतिभेचीच! भट

हे तत्त्वज्ञांना लाजवेल असे विचार मांडत आणि तरुणपिढींना लाजवेल अशी शृंगारगीतेदेखील लिहीत. भटांचे काही किस्से गाजले तसे काही शेर, काही कविताही गाजल्या. त्याविषयी थोडेसे -

● अनेक जण भटांचे चाहते होते. त्यातील एक मोठा 'फॅन' म्हणजे धनंजय थोरात. धनंजयकडे एकदा भट हे सांगलीच्या भीमराव या मित्रासोबत निघाले होते. तेव्हा धनंजयच्या शीतळादेवीजवळच्या घरासमोर येताच भटांनी रिक्षा सोडली. त्याच क्षणी गजरा माळलेल्या दोन सुंदर, गोड मुली त्यांच्या जवळून गेल्या. सकाळची प्रसन्न वेळ आणि त्यात गजरा माळलेल्या सुंदर मुली पाहून भट भीमरावांना म्हणाले, ''काही सुचते का?'' ते ''नाही'' म्हणताच भट म्हणाले, ''कसले रे कवी तुम्ही? तरुणपणातही काही सुचत नाही. घे ओळी लिहून-''

*कोण जाणे कोण हे जवळून गेले*
*चांदणे रक्तामध्ये मिसळून गेले!*

त्याच गझलेतील आणखी दोन शेर-

*सांत्वनासाठी कुणी आलेच नव्हते*
*लोक आलेले मला चघळून गेले!*
*या दुपारी मी कुणाला हाक मारू?*
*ओळखीचे चेहरे वितळून गेले.*

● पुण्याने भटांना खूप काही दिले. महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या जन्माची सोबतीण पुण्यानेच दिली, त्यांच्या गझलेला भरभक्कम साथही पुण्याने दिली. तसेच त्यांना अनेक शिष्यदेखील पुण्यामुळेच मिळाले. म्हणूनच की काय त्यांचे पुण्यावर खूप प्रेम होते. तसे पाहता पुण्यातीलच एका घटनेने त्यांना त्रासही दिला होता. भटांच्या एका नातेवाईकाने त्यांच्यावर पोलिस चौकीत जाण्याची चक्क वेळ आणली. त्या वेळेसदेखील भटांनी एक शेर सादर केला.

*सोयरा एकेक माझा थोर होता*
*हा लफंगा, तो दरोडेखोर होता*

◆ ***तरुणपण हे भटांमध्ये ठासलेले होते. ते मनाने तरुण होतेच, पण त्यांची लेखणीही कायम तारुण्यातच होती! याचे उत्तम उदाहरण म्हणजे त्यांची 'एल्गार' संग्रहातील 'बरे नाही' ही कविता!*** ◆

● तरुणपण हे भटांमध्ये ठासलेले होते. ते मनाने तरुण होतेच, पण त्यांची लेखणीही कायम तारुण्यातच होती! याचे उत्तम उदाहरण म्हणजे त्यांची 'एल्गार' संग्रहातील 'बरे नाही' ही कविता!

*हे तुझे अशा वेळी लाजणे बरे नाही*
*चेहरा गुलाबाने झाकणे बरे नाही*

*जे तुला दिले होते तेच ओठ दे तू...*
*(मागचे जुने देणे टाळणे बरे नाही)*

*ऐक तू जरा माझे... सोड मोह स्वप्नांचा*
*आजकाल स्वप्नांचे वागणे बरे नाही*
*जाहली न कोणाची आज राखरांगोळी?*
*आपुलीच रांगोळी काढणे बरे नाही!*

*आज मोकळे बोलू! आज मोकळे होऊ!*
*जीव एकमेकांचा जाळणे बरे नाही*

*कालचा तुझा माझा चंद्र वेगळा होता*
*हे उन्हात आलेले चांदणे बरे नाही...*

अशीच एक रंजक व रसिकप्रिय सुरेश भटांची 'पहाटे पहाटे' ही कविता. 'रंग माझा वेगळा' (पान क्र. ६२) या संग्रहातील. सी. रामचंद्र यांच्या आवाजात ती 'यू ट्यूब'वर हल्ली ऐकायला मिळते.

*पहाटे पहाटे मला जाग आली*
*तुझी रेशमाची मिठी सैल झाली*

◆ ***एक रंजक व रसिकप्रिय सुरेश भटांची 'पहाटे पहाटे' ही कविता. 'रंग माझा वेगळा' (पान क्र. ६२) या संग्रहातील. सी. रामचंद्र यांच्या आवाजात ती 'यू ट्यूब'वर हल्ली ऐकायला मिळते.*** ◆

*मला आठवेना, तुला आठवेना*
*कशी रात्र गेली कुणाला कळेना*
*तरीही नभाला पुरेशी न लाली*

*गडे हे बहाणे, निमित्ते कशाला?*
*असा राहू दे हात माझ्या उशाला*
*मऊ मोकळे केस सोड हे गाली...*

अर्थातच ही अंगातील ताकद तसेच कवितेची ताकद या दोन्हीही त्यांनी मोठ्या कष्टाने कमावल्या होत्या. त्यांच्या अंगी भिनलेली कविता म्हणजे 'मल्मली तारुण्य...' १९७० च्या 'घरकुल' या चित्रपटातील भटांची कविता ही हीच.

*मल्मली तारुण्य माझे तू पहाटे पांघरावे*
*मोकळ्या केसांत माझ्या तू जिवाला गुंतवावे!*

*लागुनी थंडी गुलाबी शिर्शिरी यावी अशी, की-*
*राजसा, माझ्यात अन् मी तुझ्यामाजी भिनावे!*

*गर्द राईतून यावा भारलेला गार वारा...*
*तू मुक्या ओठात माझ्या दंशताजे ऊन्ह प्यावे!*
*चांदण्याचा श्वास जाईच्या फुलांमाजी विरावा...*
*आपुल्या डोळ्यात साऱ्या तारकांनी विरघळावे!*

*तापल्या माझ्या तनूची तार झंकारून जावी*
*रेशमी संगीत स्पर्शाचे पुन्हा तू पेटवावे!*

*रे! तुला बाहूत माझ्या रूपगंधा जाग यावी*
*मी तुला जागे करावे! तू मला बिल्गून जावे*

● ज्ञानपीठ विजेते वि. स. खांडेकर यांच्या 'अमृतवेल' या कादंबरीवर सुप्रसिद्ध अभिनेत्री जयश्री गडकर आणि त्यांचे पती बाळ धुरी यांनी एक चित्रपट काढायचे ठरवले होते. हा किस्सा १९७२-७३ सालचा. संगीतकार हृदयनाथ मंगेशकर यांना संगीत द्यायला सांगितले. 'अमृतवेल'सारख्या प्रेममय कादंबरीवर चित्रपट म्हटल्यानंतर हृदयनाथ यांनी भट यांनाच गाणी लिहिण्याची विनंती केली. त्यासाठी भटांना खास नागपूरहून विमानाने बोलावून घेतले. पण भट यांनी चार दिवसांत गीताची साधी एक ओळही लिहिली नव्हती, शेवटी जयश्री गडकर भटांना म्हणाल्या, ''भटसाहेब, तुम्ही गाणी लिहिली असती तर मला खूप बरे वाटले असते; पण...'' भट म्हणाले, ''बरे, नाराज नका होऊ. आणा कागद.'' आणि भटांनी होटेलवाल्याकडूनच कागद घेऊन पत्र लिहावे इतक्या सहजपणे गाणे लिहिले. हे गाणे पंडितजींनी स्वरबद्धही केले. पण दुर्दैवाने तो चित्रपट आला नाही. ते गाणे शेवटी सहा वर्षांनी 'उंबरठा' या चित्रपटात घेतले गेले. हा किस्सा बऱ्याच जणांना माहीत असेल; पण या गाण्यासाठी त्यांनी मानधन घेतले नाही हे कुणालाही माहीत नसावे, त्यांच्या गाण्याचे बोल असे होते-

*सुन्या सुन्या मैफलीत माझ्या तुझेच मी गीत गात आहे*
*अजूनही वाटते मला की, अजूनही चांदरात आहे*

*उगीच स्वप्नात सावल्यांची कशास केलीस आर्जवे तू?*
*दिलेस का प्रेम तू कुणाला तुझ्याच जे अंतरात आहे*
*कळे न मी पाहते कुणाला? कळे न हा चेहरा कुणाचा?*
*पुन्हा पुन्हा भास होत आहे- तुझे हसू आरशात आहे!*

*उगाच देऊ नकोस हाका, कुणी इथे थांबणार नाही*
*गडे पुन्हा दूरचा प्रवासी कुठे तरी दूर जात आहे*

◆ *भट हे तत्त्वज्ञांना लाजवेल असे विचार मांडत आणि तरुणपिढींना लाजवेल अशी शृंगारगीतेदेखील लिहीत.* ◆

*सख्या तुला भेटतील माझे तुझ्या घरी सूर ओळखीचे*
*उभा तुझ्या अंगणी स्वरांचा अबोल हा पारिजात आहे!*

(सुन्या सुन्या मैफलीत, एल्गार, पान ८२) या गाण्याचे संगीत-हृदयनाथ मंगेशकर, गायिका-लता मंगेशकर, राग-पटदीप, चित्रपट- उंबरठा.

● 'उंबरठा' चित्रपटातील दोन सुप्रसिद्ध गाणी म्हणजे 'सुन्या सुन्या मैफलीत' तर दुसरे 'गंजल्या ओठांस माझ्या' ही आहेत. खरे पाहता ही एका प्रकारची प्रार्थनाच आहे, १२ एप्रिल १९६१ रोजी ती लिहिली गेली. भटांनी ही प्रार्थना गझलेच्या अंगाने लिहिली होती. भटांचा 'रूपगंधा' हा पहिला काव्यसंग्रह प्रसिद्ध झाल्यावर सुचलेले गीत म्हणजे ही प्रार्थना. त्यामुळे त्या संग्रहात ते समाविष्ट झाले नाही. नंतर 'रंग माझा वेगळा' या बारा वर्षांनी आलेल्या संग्रहात ते गीत आले. उंबरठ्यातील गाणी तर सर्वच गाजली; पण ही प्रार्थना जरा निराळी, जरा खासच! उंबरठ्यातील नायिका स्मिता पाटील यांच्या अभिनयाने तर त्या गाण्यात जान आणली. कुठेही न खटकणारे शब्द पण बंदिस्त असे कठीण आहेत! तरीही नायिकेचे आंतरसौंदर्य दाखवतानाच परिस्थितीला गुडघे टेकविण्यास भाग पाडणारा तिचा स्वभाव हे भटांच्या शब्दाशब्दांतून दिसून येतो. ती प्रार्थना अशी-

*गंजल्या ओठांस माझ्या धार वज्राची मिळू दे!*
*आंधळ्या आत्म्यात माझ्या सूर्य सत्याचा जळू दे!*
*पांगळा बंदिस्त माझा जन्म आकाशातून जावो*
*वादळी आवेग माझा चार भिंतींना कळू दे!*

*सारखे सौंदर्य माझ्या कोरड्या गात्री खळाळो*
*सारखे अस्तित्व माझे पेटताना दर्वळू दे!*

*लाभु दे लाचार छाया मोठमोठ्यांना परंतु*
*तापल्या मातीत माझा घाम मानाने गळू दे!*

*आणु दे गा वंचकांना क्रूस छद्माचा दयाळा,*
*रक्त येशूचे परी डोळ्यांत माझ्या साकळू दे!*
(प्रार्थना, 'रंग माझा वेगळा', पान ३९)

● 'सुरेश भट' हे प्रतिभावंत कवी आपणांस लाभले हे आपले भाग्यच समजावे. 'लाभले आम्हांस भाग्य' या कवितेत आणखी एक कडवे आहे. हे कडवे प्रथम प्रसिद्ध झाले ते 'मराठा'त १९५८-५९ मध्ये आचार्य अत्रे यांच्या दैनिक मराठा या वृत्तपत्राच्या पान एकवर. नंतर ती 'रूपगंधा' या भट यांच्या पहिल्यावहिल्या संग्रहात- 'मायबोलीची कविता' या शीर्षकाने आली. पण त्या संग्रहातील हे कडवे नव्हते. ते कडवे-

*पाहुणे जरी असंख्य पोसते मराठी*
*आपुल्या घरात हाल सोसते मराठी*
*हे असे कितीक खेळ पाहते मराठी*
*शेवटी मदांध तख्त फोडते मराठी!*

आज ऐकताना ही कविता ५७-५८ वर्षांपूर्वीची आहे असे अजिबात वाटत नाही. इतकी ती जिवंत, ताजी आहे.

लाभले आम्हांस भाग्य ही कविता ३५६ गायक व गायिका यांनी मिळून गायली आहे!

*लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी*
*लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी*
*जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी*
*धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी*
*धर्म, पंथ जात एक जाणतो मराठी*
*एवढ्या जगात माय मानतो मराठी*
*बोलतो मराठी, ऐकतो मराठी*
*जाणतो मराठी, मानतो मराठी*

*आमुच्या मनामनात दंगते मराठी*
*आमुच्या रगारगात रंगते मराठी*
*आमुच्या मनामनात दंगते मराठी*
*आमुच्या रगारगात रंगते मराठी*
*आमुच्या रगारगात रंगते मराठी*
*आमुच्या उराउरात स्पंदते मराठी*
*आमुच्या नसानसात नाचते मराठी*
*लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी*
*बोलतो मराठी, ऐकतो मराठी, जाणतो मराठी, मानतो मराठी*
*आमुच्या पिलापिलात जन्मते मराठी*
*आमच्या लहानग्यांत रांगते मराठी*
*आमच्या मुलामुलींत खेळते मराठी, आमच्या घराघरात वाढते मराठी*
*आमच्या कुलाकुलात नांदते मराठी*
*येथल्या फुलाफुलांत हासते मराठी*
*येथल्या दिशादिशांत दाटते मराठी*
*येथल्या नगानगात गर्जते मराठी*
*येथल्या दरीदरीत हिंडते मराठी*
*येथल्या वनावनांत गुंजते मराठी*
*येथल्या दरीदरीत हिंडते मराठी*
*येथल्या वनावनात गुंजते मराठी*
*येथल्या तरूलतात साजते मराठी*
*येथल्या कळीकळीत लाजते मराठी*
*बोलतो मराठी, ऐकतो मराठी*
*जाणतो मराठी, मानतो मराठी*
*येथल्या नभामधून वर्षते मराठी*
*येथल्या पिकांमधून डोलते मराठी*
*येथल्या नद्यांमधून वाहते मराठी*
*येथल्या चराचरात राहते मराठी*
*लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी!*

(मायबोली, ‘रूपगंधा’ पान ५८) संगीत - कौशल इनामदार!

● कालांतराने भट यांना अपंगत्व आले. त्यावेळेस त्यांना त्यांची कविता हीच सोबतीची वाटत होती. त्यामुळे या व्यथेवर कवितेच्या आधारे आपण मात केली पाहिजे असे भटांनी ठरवले. त्यांना कुणी ‘लंगडे पेशवे’ म्हणाले, तर एकाने ‘तैमूरलंग’ म्हणून हाक मारली. पण भट हे शांत न राहता वेळोवेळी हजरजबाबीपणे उत्तरे देत गेले. लंगडे पेशवे म्हणणाऱ्याला भट ‘भेकड छत्रपती’ असे म्हणाले, तर ‘तैमूरलंग’ म्हणणाऱ्याला ते म्हणाले की- ‘अरे वा, ही तर ऐतिहासिक भेट आहे, कारण तैमूरलंग हा तर अंधाला भेटला होता, भट हे कोणताही विषय असो की घटना, ते त्याला सडेतोडपणे सामोरे जात उत्तरे देत असत. भटांचा वाचनाच्या संदर्भातील एक किस्सा असा की- अमरावतीच्या ग्रंथालयात ते वाचायला गेले की, इतका वेळ वाचत बसायचे की, ग्रंथालयाची वेळ संपली तरी ग्रंथपालाला ते ग्रंथालयाला कुलूप लावून जाण्यास सांगायचे आणि स्वतः आत बसून पुस्तके वाचत बसत. तसेच त्यांच्या वाचनाचा आवाका खूप मोठा होता. ते वाचनामध्ये पूर्णपणे तल्लीन होत असत.

सुरेश भट यांनी त्यांच्या जीवनात दुःखाला अधिक जवळ केले आणि म्हणूनच ते म्हणू शकले -

*‘भोगले जे दुःख त्याला*
*सुख म्हणावे लागले’*

हे गीत आशाताईंनी गायले असल्यामुळे सर्वांना ते आशाताईंचेच वैयक्तिक जीवनानुभवाचे गीत आहे असे वाटू लागले. आशाताईही सर्वांना सांगतात, ‘‘माझ्या आयुष्याचे ते वर्णन आहे. नव्हे, ते माझ्यासाठीच जणू लिहिलेले आहे.’’

भटांनी दुःखाला अधिक जवळचे जरी केले असले तरी त्या दुःखाला कधी गोंजारत बसले नाहीत. म्हणून भट म्हणतात -

*समजावूनी व्यथेला समजावता न आले!*
*मज दोन आसवांना हुलकावता न आले!*

◆ ***भट रागात जरी असले तरी त्यांच्या मनातून कविता काही सुटली नाही. अर्थातच ही अंगातील ताकद तसेच कवितेची ताकद या दोन्हीही त्यांनी मोठ्या कष्टाने कमावल्या होत्या.*** ◆

*सर एक श्रावणाची आली... निघून गेली...*
*माझ्या मुक्या तृषेला पण बोलता न आले!*
*सुटला कधी न जो मी मज घातला उखाणा*
*माझ्याच उत्तराला मज शोधता न आले!*

*चुकवूनही कसा हा चुकला न शब्द माझा*
*देणे मलाच माझे नाकारता न आले!*

*लपवित गीत माझे पळ काढला तरीही*
*हृदयातल्या विजांना झिडकारता न आले!*

*केले जरी खुलासे मी ही नकोनकोसे,*
*जगणे अखेर माझे मज टाळता न आले!*

(समजावता न आले. 'रंग माझा वेगळा' पान ४८) संगीत - रवी दाते, गायक - सुरेश वाडकर.

● भट यांनी रचलेली एक गझल निर्मलादेवी यांच्या सुरात (निर्मलादेवी या सुप्रसिद्ध अभिनेता गोविंदा यांच्या आई.)

*मी एकटीच माझी असते कधीकधी*
*गर्दीत भोवतीच्या नसते कधीकधी*
*येथे न ओळखीचे कोणीच राहिले*
*होतात भास मजला नुसे कधीकधी*

*जपते मनात माझा एकेक हुंदका*
*लपवित असावे मी हसते कधीकधी*

*मागेच मी कधीची हरपून बैसले*
*गाता नकोनकोशी दिसते कधीकधी*

*जखमा बुजून गेल्या साऱ्या जुन्या तरी*
*उसवित जीवनाला बसते कधीकधी*
(एकटी, 'एल्गार' पान २२)
(संगीत - श्रीकांत ठाकरे, गायिका - निर्मला आहुजा)

● भट यांनी आपल्या अपंगत्वाबद्दल सांगताना असे लिहिले की, आपल्या पंगू पायाखाली पांडुरंग वीट झाले. त्यांनी पांडुरंगावर तर लिहिलेच, पण आवडत्या मुकुंदावर तसेच राधाभक्तीवरही लिहिले. इतक्यात ते थांबले नाहीत तर त्यांनी तुकारामाबद्दलही लिहिले. ते तुकारामाला म्हणतात. 'तुझे दुःख ते तुझे नाही, ते आमचे आहे.' तर भटांना 'महात्मा गांधींमध्ये येशू दिसतो.' मग ते त्यांच्या शब्दांत लिहितात-

*झुळझुळ शीतलवारा येशू*
*रिमझिम अमृतधारा येशू*
*येथे पोचत नाही वादळ*
*अमुचा शांत किनारा येशू*
*अवसेच्याही भीषण रात्री*
*चमचमणारा तारा येशू*
*दुनियेला झाली विषबाधा*
*देई प्रेम-उतारा येशू*
*हा अमुचा जन्माचा जीवलग*
*हा तर अमुचा प्यारा येशू*
*माणुसकीची चाले वणवण*
*उरला एक निवारा येशू*

ही एकच कविता त्यांनी लिहिली नाही, तर येशू ख्रिस्तावर त्यांनी आणखी एक कविता लिहिली आहे.

*दाराशी तुझ्या हा येशू फिरून आला!*
*तू पाहशी तरीही मागे-पुढे कशाला?*

*आली फिरून कानी आताच हाक त्याची...*
*येशूच हा, पहा ह्या हातातल्या खिळ्याला!*

*पुसले जरी न ह्याने अपुलेच रक्त ओले,*
*आला पुन्हा जगाचे डोळे पुसावयाला!*

*अजुनी कशी न वार्ता, कथिली तुला कुणीही?*
*येशू जिवंत झाला! येशू जिवंत झाला!*

जगाला शांततेचा संदेश देणाऱ्या गौतम बुद्धांना भट असे म्हणतात-
*तुझाच गौतमा पडे प्रकाश अंतरी*
*तुझेच धम्मचक्र हे फिरे जगावरी*

*कळ्या कळ्या, फुले फुले तुला पुकारती*
*पहा तुझीच चालली नभात आरती*
*तुला दिशा निहाळती यशोधरेपरी*
*तुझ्यामुळेच जाहला अखेर फैसला*
*दिलास धीर, तोडली आम्हीच शृंखला*
*आम्ही भविष्य आमुचे दिले तुझ्या करी*

*तुलाच दुःख आमुचे, तथागता कळे*
*तुझीच सांत्वना आम्हां क्षणोक्षणी मिळे*
*निनाद पंचशीलचा घुमे घरोघरी...*

● भारतरत्न, बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वंदन करताना भट म्हणतात-
*भीमराया, घे तुझ्या या लेकरांची वंदना!*
*आज घे ओथंबलेल्या अंतरांची वंदना!*
*दुमदुमे 'जयभीम'ची*

*गर्जना चोहीकडे*
*सारखा जावे तिथे*
*हा तुझा डंका झडे*
*घे, अता घे राहिलेल्या संगरांची वंदना!*
*कोणते आकाश हे?*
*तू आम्हा नेले कुठे?*
*तू दिलेले पंख हे...*
*पिंजरे गेले कुठे?*
*या भराऱ्या आमुच्या... ही पाखरांची वंदना!*
*कालचे सारे मुके*
*आज बोलू लागले*
*अन् तुझ्या सत्यासवे*
*शब्द तोलू लागले*
*हे वसंता, घे मनांच्या मोहरांची वंदना!*
*एक आम्ही जाणतो*
*आमुची तू माउली*
*एवढे आहे खरे*
*आमुची तू सावली*
*घे आम्ही त्यांना दिलेल्या उत्तरांची वंदना!*

भट यांनी या गीताला लागून चार ओळी ९ एप्रिल २००० मध्ये लिहिल्या. त्या पुढीलप्रमाणे-

*आजच्या सूर्योदयाचा रंग आहे वेगळा!*
*हा निराळा सूर्य, ज्याच्या पूर्ण चंद्राच्या कळा!*

*जो कधीही मावळेना सूर्य त्याचे पुण्य हे-*
*या पहाटे दुःखितांचा श्वास झाला मोकळा!*

६/१२/१९८६ च्या ‘लोकमत’च्या अंकात ‘दिनांक सहा डिसेंबर’ या शीर्षकाखाली भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पत्र लिहावे अशी एक गझल सुरेश भट यांनी सहजपणे लिहिली. ती अशी-

*कुठे गेलास तू? माया तुझी का आटली, बाबा?*
*कुठे गेलास तू? छाती जगाची फाटली, बाबा!*

*पुन्हा यंदा सभा झाल्या... पुन्हा नेते जमा झाले...*
*पुन्हा त्यांनी उधारीची मिठाई वाटली, बाबा!*

*तुझी ती गर्जना होती अरण्यातील सिंहाची!*
*तुझ्यामागून ही कुत्री कशी केकाटली, बाबा?*

*कसा आता सुरू झाला जमाना हा दलालांचा...*
*कशी आता पुढाऱ्यांची दुकाने थाटली, बाबा!*

*तुझा तो घास प्रेमाचा जगायाला पुरे होता,*
*तरीही का बरे खुर्ची तयांनी चाटली, बाबा?*

*तुला अन् गौतमालाही विकाया काढले त्यांनी*
*तुझ्या नावावरी त्यांनी कमाई लाटली, बाबा!*

*अशी श्रद्धांजली आम्ही कधीही पाहिली नाही...*
*निघाली टेबलाखाली रिकामी बाटली; बाबा!*

भट हे आपणांस गझलेच्या स्वरूपात सणासणांत, क्षणाक्षणांत, कणाकणांत, धर्माधर्मांत भेटत असतात. पहाटे भेटतात अन् रात्री थकल्यावरही भेटतात.

**रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा...**

कवितेची चरण कविता. अलिप्तता, कलात्मक तटस्थता, हे सर्व साधले तर कवितेला एक वेगळी आणि उच्च पातळी लाभते. अशा प्रकारची तटस्थता या कवीला म्हणजेच भटांना बऱ्याच कवितांमधून लाभली आहे, असे कवी वा. रा. कांत म्हणतात.

*रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा!*
*गुंतुनी गुंत्यात साऱ्या पाय माझा मोकळा!*

*कोण जाणे कोठुनी ह्या सावल्या आल्या पुढे;*
*मी असा की लागती ह्या सावल्यांच्याही झळा!*

*राहती माझ्यासवे ही आसवे गीतांपरी;*
*हे कशाचे दुःख ज्याला लागला माझा लळा?*

*कोणत्या काळी कळेना मी जगाया लागलो*
*अन् कुठे आयुष्य गेले कापुनी माझा गळा?*

*सांगती तात्पर्य माझे सारख्या खोट्या दिशाः*
*चालणारा पांगळा अन् पाहणारा आंधळा!*

*माणसांच्या मध्यरात्री हिंडणारा सूर्य मीः*
*माझियासाठी न माझा पेटण्याचा सोहळा!*

(रंग माझा वेगळा, 'रंग माझा वेगळा', पान ५२) (संगीत- सुधीर मोघे, गायिका - देवकी पंडित)

**त्या पैलतीरावर मिळेल मजला थारा :**

पुढील गीत कोल्हापूरच्या सुप्रसिद्ध शास्त्रीय गायिका भारती वैशंपायन यांनी म्हटले आहे. सर्व संगीत हायस्कूलमध्ये हे गीत शिकवले जाते. प्रदीप निफाडकर यांना त्यांची कन्या प्रांजली ही एसएनडीटीत संगीत शिक्षण घेत असताना हे गीत तिला ऐकायला मिळाले तेव्हा तिने विचारले, ''हे गीत कुणाचे आहे?'' तेव्हा निफाडकरांनी तिला त्याचे उत्तर दिले.

*त्या पैलतीरावर मिळेल मजला थारा*
*सुहृदयांची प्रेमळ सोबत आणि उबारा!*
*इकडच्या तटावर झाले ध्वस्त निवारे*
*जळतात पावलांखाली क्रुद्ध निखारे*
*मी तळमळताही निर्विकार जन सारे*
*पण तिथे वाहतो प्रसन्न शीतल वारा!*

***भट यांनी पांडुरंगावर तर लिहिलेच, पण आवडत्या मुकुंदावर तसेच राधाभक्तीवरही लिहिले. इतक्यात ते थांबले नाहीत तर त्यांनी तुकारामाबद्दलही लिहिले.***

*ऐकली न येथे आपुलकीची बोली*
*बहरली न आशा मनात अंकुरलेली*
*सारखी विफलता, व्यथा माझिया भाली*
*पलीकडे हासतो जीवन-श्रेय फुलोरा!*

*पलीकडे मनोमय स्वप्नांचा संसार!*
*पलीकडे सुगंधित गीतांचा झंकार!*
*संतप्त उरास्तव वत्सल अमृतधारा!*
*बहरला मळ्यांनी वैभवपूर्ण किनारा!* (किनारा, रूपगंधा, पान २७)
संगीत- नरेंद्र भिडे, गायक - हृषिकेश रानडे

**सामाजिक जाणीव**
*वृत्तपत्रांचे रकाने वायद्यांनी भरत होते*
*अन् किड्यामुंग्याप्रमाणे लोक साधे मरत होते*
*कोणत्या न्यायालयी मी न्याय मागायास जाऊ?*
*मी जिथे गेलो, तिथे ते रामशास्त्री चरत होते.*

भट असेही लिहीत आणि असेही लिहितात की-
*उगवला जर सूर्य तर मग हा असा अंधार का?*
*जर तुम्ही प्रभूराम तर हा रावणी दरबार का?*

पण कवीचा आशावाद भक्कम होता. ते म्हणत-
*रंग आकाशा तुझा का लाल नाही?*
*सूर्य येणारा तसा कंगाल नाही.*

पण भट यांना जेव्हा कळले आजचा सूर्य हा अंधारलेला आहे तेव्हा मात्र त्यांनी आशावादाने नवा सूर्य आणण्याची तयारी केली-
*सूर्य केव्हाच अंधारला यार हो*

*या, नवा सूर्य आणू चला यार हो*

*हे नवे फक्त आले पहारेकरी*
*कैदखाना नवा कोठला यार हो?*

*ते सुखासीन संताप गेले कुठे?*
*हाय, जो तो मुका बैसला यार हो*

*चालण्याची नको एवढी कौतुके*
*थांबणे ही अघोरी कला यार हो*

*जे न बोलायचे तेच मी बोलतो*
*मीच माणूस नाही भला यार हो*

*सोडली मी जरी स्वप्नभूमी तरी*
*जीवनाची टळेना बला यार हो...*

*आज घालू नका हार माझ्या गळा*
*मी कुणाचा गळा कापला यार हो?*
(यार हो!, एल्गार, पान ३१)

● सुप्रसिद्ध समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांना सुरेश भट यांच्या निधनानंतर त्यांच्या कवितांचे नव्याने आकलन झाले. तत्संबंधी प्रकाशित पुस्तकात ते म्हणतात, ''भट यांच्या राधागीतांवर जयदेव यांची छाप दिसते'', 'मी मज हरपून बसले ग' अशी गीते तुम्ही ऐकली आहेत; पण हे गीत पाहा–

*सजण दारी उभा, काय आता करू?*
*घर कधी आवरू? मज कधी सावरू?*

*मी न केली सखे, अजून वेणीफणी,*

***भट हे आपणांस गझलेच्या स्वरूपात सणासणांत, ◆ क्षणाक्षणांत, कणाकणांत, धर्माधर्मांत भेटत असतात. ◆ पहाटे भेटतात अन् रात्री थकल्यावरही भेटतात.***

*मी न पुरते मला निरखिले दर्पणी*
*अन् सडाही न मी टाकिला अंगणी;*
*राहिले नाहणे! कुठून काजळ भरू?*

*मी न दुबळी कुडी अजून शृंगारिली*
*मी न सगळीच ही आसवे माळिली,*
*प्राणपूजा न मी अजूनही बांधिली;*
*काय दारातुनी परत मागे फिरू?*

*बघ पुन्हा वाजली थाप दारावरी;*
*हीच मी ऐकिली जन्मजन्मांतरी;*
*तीच मी राधिका! तोच हा श्रीहरी!*
*हृदय माझे कसे मीच हृदयी धरू?*
(संगीत - यशवंत देव, गायिका - शोभा जोशी)

कित्येक जणांना या गीतातील कल्पना पटकन कळत नाही. उदा. 'कुठून काजळ भरू' ही ओळ वर वर पाहिली तर शृंगाराचे वर्णन वाटते. पण भट कसा सूक्ष्म विचार करतात ते पाहा-

कृष्ण हा काळा होता. दार उघडले की तो दिसणार आणि तो दिसला की राधा त्याला डोळ्यांत भरून घेणार. म्हणून ती म्हणते 'कुठून काजळ भरू'. कवितेत 'दुबळी कुडी' शब्द आहे म्हणजे दुर्बल देह. पण हा दुर्बल का? तर राधा विरहात होती. 'बघ पुन्हा वाजली थाप दारावरी' ही ओळ ऐकताना 'पुन्हा' शब्द भरतीचा वाटतो. जेव्हा पुढची ओळ ऐकतो तेव्हा 'पुन्हा' शब्दाची मजा कळते, युगानुयुगे ती गाजत आहे म्हणून 'पुन्हा', जन्मोजन्मी राधा-कृष्ण मीलन होतच आहे म्हणून 'पुन्हा'.

- भट हे एका पायाने अपंग बनले. पण त्यांनी अनेक अडचणींवरती

मात करून कवितेला आपले आधार बनवले पण बाकी जगण्याचा वनवासच होता. यांचे उत्तम उदाहरण म्हणजे पुढील गझल.

*ओझरता सहवास मिळाला!*
*पळभरचा मधुमास मिळाला!*

*आपुलकी होतीच अशी की,*
*मायेचा गळफास मिळाला!*

*या जखमांचा मी उतराई*
*मज माझा विश्वास मिळाला!*

*तुझी फुले अन् माझे काटे...*
*ज्याचा वाटा त्यास मिळाला!...*

*केवळ ही कवितेची सोबत*
*जगण्याचा वनवास मिळाला!...*
(वनवास, झंझावात, पान ८९)

**चंद्र, तारे, पहाट**

प्रत्येक कवीला चंद्र, तारे, सूर्य, पाऊस, आई असे विषय आवडतात. तसेच भट यांनाही चंद्र आवडायचा. वेगवेगळ्या अंगांनी त्यांनी चंद्र आणि त्याच्या चांदण्या या कवितेत मांडले आहे.

*चंद्र राहिला नाही भाबड्या चकोरांचा*
*चांदण्यावरही ताबा आजकाल चोरांचा*

असेही लिहिले आणि-

*कालचा तुझा-माझा चंद्र वेगळा होता*
*हे उन्हात आलेले चांदणे बरे नाही*

हेही लिहिले. ते चंद्राला प्रेयसीचे रूप देतात. म्हणून म्हणतात-

*चंद्र आला... निघूनही गेला*

***अलिप्तता, कलात्मक तटस्थता, हे सर्व साधले तर कवितेला एक वेगळी आणि उच्च पातळी लाभते. अशा प्रकारची तटस्थता या कवीला म्हणजेच भटांना बऱ्याच कवितांमधून लाभली आहे.***

*ऐनवेळी असे कसे झाले?*

चंद्रावरच नाही तर एकूणच रात्रीवर त्यांचे चांगलेच प्रेम होते. मग कधी 'तरुण आहे रात्र अजूनी' असे ते सांगत किंवा कधी-

*रात्र गेली निघून पाऱ्याची*
*हाक आली पहाटताऱ्याची*

असे म्हणतात, तर कधी-

*हा असा चंद्र, अशी रात फिरायासाठी*
*तूच नाहीस इथे हात धरायासाठी*

भट यांचे जेवढे प्रेम रात्रीवर होते तेवढेच प्रेम पहाटेवर होते. भट यांनी या कवितेत आपली खंत व्यक्त केलेली आहे.

चंद्र, रात्र आणि उजाडणे याविषयी भट यांना कोणत्या वेगवेगळ्या कल्पना सुचल्या आहेत. ते पुढील तीन कवितांमध्ये दिसते.

*चंद्र आता मावळाया लागला*
*प्राण माझाही ढळाया लागला*

*काय तो वेडा इथे हो बोलला?*
*हा शहाणाही चळाया लागला!*

*ओठ ओठांना सतावू लागले*
*श्वास गालाला छळाया लागला*
*हालते भिंतीवरी छाया तुझी*
*दीप हा कैसा जळाया लागला?*

*मी खरे बोलून जेव्हा पाहिले*
*हा टळाया... तो पळाया लागला*

*हाक दाराने मला जेव्हा दिली*
*उंबरा मागे वळाया लागला!*

*तोच मी होतो... गडे हा तोच मी*
*जो तुला आता कळाया लागला!*
(चंद्र आता, एल्गार, पान १०)
(संगीत- रवी दाते, गायक- सुरेश वाडकर)

✶ ✶ ✶

**मालवून टाक दीप**

*मालवून टाक दीप चेतवून अंग अंग!*
*राजसा, किती दिसांत लाभला निवांत संग!*

*त्या तिथे फुलाफुलांत, पेंगते अजून रात*
*हाय, तू करू नकोस एवढ्यात स्वप्नभंग!*

*गार गार या हवेत, घेऊनी मला कवेत*
*मोकळे करून टाक एकवार अंतरंग!*

*दूर दूर तारकात बैसली पहाट न्हात*
*सावकाश घे टिपून एक एक रूपरंग!*

*हे तुला कसे कळेल? कोण एकटे जळेल?*
*सांग, का कधी खरेच एकटा जळे पतंग?*

*काय हा तुझाच श्वास? दर्वळे इथे सुवास!*
*बोल रे हळू, उठेल चांदण्यावरी तरंग!*
(मालवून टाक दीप, 'रंग माझा वेगळा' पान ३७)
(संगीत - हृदयनाथ मंगेशकर, गायिका-लता मंगेशकर)

◆ *भट यांची सामाजिक जाणीव तीव्र होती.*
*आजूबाजूला दाटलेला अंधार*
*त्यांना अस्वस्थ करत होता.* ◆


❖❖❖

**प्रदीप निफाडकरांनी भटांची घेतलेली मुलाखत**

'ललित' मासिकाचे १९८८ रौप्यमहोत्सवी वर्ष होते. त्यासाठी संपादक अशोक केशवराव कोठावळे यांनी एक योजना आखली. प्रमुख मराठी कवींच्या मुलाखतीचा अंक प्रसिद्ध करावयाचे ठरवले. त्यासाठी त्यांनी कविवर्य शंकर वैद्य सरांकडे अतिथी संपादकाचे काम दिले. सरांनी त्यावर



खूप मेहनत घेतली आणि मुलाखतीसाठी तीस प्रश्न तयार केले. तसेच वैद्य सरांनी कोणीकोणी कुणाकुणाची मुलाखत घ्यावी ते ठरवले. स्वतःला हवे ते प्रश्न विचारा असे स्वातंत्र्यही दिले. प्रदीप निफाडकर यांना सुरेश भट यांच्या मुलाखतीची जबाबदारी दिली. तसेच अनेक कवींची मुलाखत घेण्यास एक-एक व्यक्ती निवडली. त्यांनी अनेक कवींच्या मुलाखती घेतल्या. प्रदीप निफाडकर हे भटांचे प्रिय शिष्य होते. भट हे सुप्रसिद्ध गझलकार, कवी असल्याने सहसा त्यांची भेट आणि त्यात मुलाखत यासाठी पुष्कळसा वेळेचा अभाव असतानाही प्रदीप निफाडकरांनी त्यातून मुलाखत पार पाडली. भटांनी 'माझी मुलाखत सविस्तर लिहून दाखव' म्हटल्याने प्रदीप निफाडकरांनी समोर बसून ती लिहून दाखवली...




**प्रश्न** - कविता म्हणजे काय? कवितेसंबंधी तुमची धारणा काय आहे? कविता कशासाठी? तिचे आपल्या जीवनाशी नाते कोणते? तिचे एकंदर जीवनाशी नाते कोणते? या संबंधातील आपली मते काय आहेत.

**भट** - कविता म्हणजे कमीत कमी शब्दांत जास्तीत जास्त आशय सांगणाऱ्या प्रत्ययकारी शब्दांचा सुसंगत समूह, असे माझे मत आहे. अर्थात, मी सौंदर्यशास्त्राचा अभ्यास केलेला नसल्यामुळे कविता म्हणजे काय हे मला नेमके सांगता येईलच असा माझा दावा नाही. कारण मी लिहिणारा माणूस आहे. शरीर म्हणजे काय, असे जर कोणत्याही जिवंत माणसाला विचारले, तर तो शरीराच्या प्रत्येक इंद्रियांचे, अस्थींचे, मज्जांचे तपशीलवार संख्येसकट वर्णन करू शकणार नाही. माणसाला आपल्या शरीराचे वर्णन शरीरशास्त्रीयदृष्ट्या अचूक करता येत नाही म्हणून तो आपले जिवंत शरीर घेऊन वावरत नसतो असे नव्हे. तसेच

◆ ***चोरपावलांनी पहाटवारा येणे, पहाटे चांदण्याला जाग येणे, कालिंदीच्या किनाऱ्याने मुकुंदाला बोलावणे, कुंजातल्या फुलांनी इशारा करणे आणि शेवटी वेड्या राधेने मुकुंदाला शोधायला निघणे, हे सर्व भट यांच्या कल्पनावैभवाचे नमुने इथे दिसतात.*** ◆

कवीचे. कवी कविता करतो म्हणजे त्याला कविता म्हणजे नेमके काय हे सांगता येईलच, असे कुणीही समजू नये!

माझ्या मते कविता म्हणजे 'संवाद' असतो आणि या संवादात कवी स्वतःचे प्रत्यय, स्वतःच्या संवेदना आणि चिंतन रसिकापर्यंत पोहचवत असतो आणि त्याच वेळी हे सर्व काही स्वतःलाही सांगत असतो. तर हे जे तो अनुभवतो. त्यात वाचणाऱ्याला किंवा ऐकणाऱ्याला बरोबरीने भागीदार करून घ्यायचे असते.

ज्या पातळीवरून कवी शब्दांच्या माध्यमातून आपले प्रत्यय प्रकट करत असतो, त्याच पातळीवर जेव्हा रसिक येऊन पोचतो आणि तेवढ्याच उत्कटतेने कवीचे प्रत्यय अनुभवतो; तेव्हाच कविता फसली नाही असे म्हणता येईल. अर्थात ही उत्कटता ज्याच्या त्याच्या सौंदर्यबोधावर अवलंबून असते आणि हा सौंदर्यबोध ज्याच्या त्याच्या जगण्यावर अवलंबून असतो.

**प्रश्न** - कवितेचे कोणकोणते प्रकार (forms) आपण हाताळले? काव्यकलादृष्ट्या कोणता काव्यप्रकार आपणास महत्त्वाचा वाटतो?

**भट** - मी काव्याचे 'हायकू' व 'पोवाडा' सोडून बहुतेक सर्व प्रकार हाताळले आहेत. मी नेहमीच्या कविताही लिहिल्या, 'मुक्त' कविताही लिहिल्या. गीते व लावण्याही लिहिल्या! परंतु १९५५-५६ पासून मी प्रामुख्याने मराठी गझलच लिहिली. मला काव्यकलादृष्ट्या कोणताही काव्यप्रकार इतर कोणत्याही काव्यप्रकारापेक्षा महत्त्वाचा वाटत नाही. मी प्रामुख्याने जरी गझल लेखन केले तरी ह्याचा अर्थ हा नाही की, मी इतर काव्यप्रकारांपेक्षा हा काव्यप्रकार जास्त महत्त्वाचा मानतो. मी गझलेच्या प्रेमात पडलो खरा; पण मनुष्य एखाद्या व्यक्तीच्या प्रेमात पडल्यावर त्याने ती व्यक्ती देशाहूनही जास्त महत्त्वाची मानायची काय?

तद्वतच मी जरी वर्षानुवर्षे गझलेच्या 'सक्रिय' प्रेमात पडलेला असलो तरी इतर काव्यप्रकारांना गझलेपेक्षा कमी मानत नाही.

जाताजाता एक माहिती देतो. इकडे 'हायकू' येण्यापूर्वी किती तरी आधीपासून उर्दूत 'तसलीस' हा तसाच काव्यप्रकार आहे. एकाच वृत्तातील तीन ओळी आणि पहिल्या व तिसऱ्या ओळीत यमक, असा ह्या तसलीसाचा आकृतिबंध आहे. या तसलीसमधील तीन ओळींत एक प्रत्यय, एक अनुभव, एक संवेदना किंवा एखादा निष्कर्ष प्रभावीपणे सामावला जातो. कोणत्याही विषयासाठी हा काव्यप्रकार हाताळता येतो!

**प्रश्न** - तुमचे कोणते काव्यलेखन तुम्हास आनंद देते? महत्त्वाचे वाटते?

**भट** - जेव्हा जे मला सांगायचे आहे किंवा जे मी माझ्या संवेदनाविश्वात अनुभवतो किंवा जेव्हा मी माझ्या 'पदरात पडलेले जगण्याचे प्रत्यय' अचूकपणे नेमक्या शब्दांत जसेच्या तसेच व्यक्त करू शकतो; तेव्हाच ते काव्यलेखन आनंद देते!

**प्रश्न** - आपली कविता विकसित व्हावी, समृद्ध व्हावी म्हणून काही अभ्यास, काही साधना आवश्यक वाटली का? आपण यासंबंधात काय केले?

**भट** - आधी आपण 'साधना' या शब्दाचा अर्थ समजून घेतला पाहिजे. जो 'साधना' करतो तो सिद्ध होतो. 'सिद्ध' म्हणजे येथे 'तयार' असा नसून जो साध्य करतो तो सिद्ध! कोणतीही गोष्ट एकदम साध्य होत नसते. ती साधावी लागते! आणि ती साधण्यासाठी तिच्यातच निरंतर बुडून जावे लागते. तर आपले साध्य साधण्यासाठी जी क्रिया सतत करावी लागते, जो अभ्यास (रियाझ) करावा लागतो; त्यालाच साधना म्हणतात. ह्याच क्रियेला तपश्चर्या असेही म्हणतात. तपश्चर्या ५/१० वर्षांत पूर्ण होत नसते. सर्वसाधारणपणे तपश्चर्या १२ वर्षांची असते, अशी एक समजूत आहे. मी गेली किमान ४० वर्षे सतत लिहीत आहे. तरीही माझी ही तपश्चर्या पूर्ण झालेली नाही. रोज सकाळी उगवणारा सूर्य मला माझ्या अपूर्णतेची जाणीव देत असतो.

मी ह्या साधनेसाठी काय केले? असा आपला प्रश्न आहे. मी आयुष्यात खऱ्या अर्थाने कवितेशिवाय लौकिक सिद्धीची चिंता केली नाही. मी आधी कवितेचा विचार केला. मी माझ्या आयुष्याचा कवितेएवढा विचार

◆ *भट यांचे जेवढे प्रेम रात्रीवर होते तेवढेच प्रेम पहाटेवर होते. भट यांनी या कवितेत आपली खंत व्यक्त केलेली आहे.* ◆

केला नाही आणि हेच ठरवले की, जरी मला आयुष्यात इतरांसारख्या इतर गोष्टी मिळवता आल्या नाहीत, तरी मी निदान कविता मिळवीन. जे आपल्या वाट्याला आले ते रसिकांच्या हवाली करण्यासाठी आधी आपण ज्या भाषेत लिहितो, ती सर्वार्थांनी आपली झाली पाहिजे. त्यासाठी कोणताही शब्द कमी लेखू नये. शब्दांना सार्थकी लावावे. मी काव्यलेखन करताना माझ्या मराठी मायबोलीचे स्तनपान करीत आहे, तिच्या दुधाचा एकेक थेंब पीत आहे! आणि अजूनही तिच्या स्तनांतील दूध संपलेले नाही- संपणार नाही. माझ्यासाठी मराठी मायबोलीने कधीही पान्हा चोरलेला नाही. कारण तिला ठाऊक आहे की, आपला हा लेक अमेरिकेतल्या मिल्क पावडरवर जगूच शकत नाही. आता या बाबतीत कुणी उर्दूकडे बोट दाखवील. मी एक एवढेच सांगतो, 'मी फक्त गझलेचे तंत्र घेतलेले आहे. मंत्र मराठीचाच आहे. शेजारच्या मावशीबाईंनी एक नवा खमंग पदार्थ केला. मी आईला म्हटले, ''आई, शेजारच्या मावशीनी केलेला पदार्थ तू बनवून मला खाऊ घालशील का?'' यावर माझी आई म्हणाली, ''बाळ, तुझ्यासाठी मी काय करणार नाही? तू फक्त असाच चांगल्या मुलासारखा वाग, रोज अभ्यास कर, मी आजच त्यांना विचारून उद्या तुला तो पदार्थ खाऊ घालीन.''

त्या पदार्थासाठी मी माझ्या आईचा पदर घट्ट धरून ठेवला आणि हट्ट सोडला नाही आणि शेवटी माझ्या आईने माझ्यासाठी तो नवा पदार्थ आमच्या घरी बनवला. तिने शेजारच्या मावशींकडून फक्त पाकक्रिया समजून घेतली व घरातलेच जिन्नस वापरून तो पदार्थ मला प्रेमाने खाऊ घातला. आता मला सांगा, 'तो पदार्थ आईनं बनवला की शेजारून आणला?'

ही आहे माझ्या मराठी गझललेखनाची जन्मकथा!

**प्रश्न** - पण काही प्रमाणात तुम्हांला उर्दूचा उपयोग झालाच असेल की!

**भट** - होय, बरोबर आहे. विशेषतः उर्दू गझलांच्या वाचनामुळे,

श्रवणामुळे गझलेचे शरीरशास्त्र समजले. पण एवढे होऊनही मी माझे मराठी खानदान कायम राखले. हे आपण विसरू नका की, मी जसे गालिब, जिगर, मीर, फैज, मजाज, फराज, कतील वाचले; तसेच मी ज्ञानेश्वर आणि तुकाराम वाचले. मी वर्षानुवर्षे निदान माझ्या आठवणीनुसार १९६९ पर्यंत रोज तुकारामांचा एक तरी अभंग वाचल्याशिवाय झोपत नसे. तो माझा नियम होता आणि तीच माझी 'संध्या' होती. माझ्या घरात ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, नामदेव आणि तुकारामांची गाथा आहे. ह्याशिवाय एकनाथही आहे. मी उगीच लिहिले नाही–

*माझिया गीतात वेडे*
*दुःख संतांचे भिनावे*
*वाळल्या वेलीस माझ्या*
*अमृताचे फुल यावे!*

*स्पंदने ज्ञानेश्वरांची*
*माझिया वक्षात व्हावी*
*इंद्रियावाचून मी ही*
*इंद्रिये भोगून घ्यावी*

*एकनाथाने मलाही*
*बैसवावे पंगतीला!*
*नामया हाती बनावे*
*हे जिणे गोपालकाला!*

*मी तुक्याच्या लोचनांनी*
*गांजल्यांसाठी रडावे*
*चोख वेव्हरात माझ्या*
*मी मला वाटून घ्यावे!*

तेव्हा मला उर्दूचा उपयोग फक्त तंत्रासाठी आणि शेर कसा उलगडावा हे समजून घेण्यासाठी झाला. मी या बाबतीत उर्दूचे ऋण मानतो; पण

◆ *माझ्या मते कविता म्हणजे ‘संवाद’ असतो आणि या संवादात कवी स्वतःचे प्रत्यय, स्वतःच्या संवेदना आणि चिंतन रसिकापर्यंत पोहचवत असतो* ◆

ह्यांचा अर्थ असा नव्हे की, मराठी गझल म्हणजे उर्दू गझलेचे प्रतिबिंब आहे.

**प्रश्न** - कवितेच्या सौंदर्यासंबंधी आपली दृष्टी काय आहे? कवितेत कोणत्या गोष्टी जमून आल्या की मनास समाधान वाटते?

**भट** - हा प्रश्न माझ्यासाठी जरा अवघडच आहे; तरी पण माझ्या कुवतीप्रमाणे येथे सांगण्याचा प्रयत्न करतो. सौंदर्याचा फक्त एकच अर्थ आहे काय? विद्यापीठात मराठी विभागात ‘सौंदर्यशास्त्र’ शिकवले जाते. त्याला इंग्रजीत Aesthetics म्हटले जाते. पदव्युत्तर परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिकवला जाणारा हा स्वतंत्र विषय आहे. Aesthetics ह्या शब्दाची व्याख्या ‘Science of Pereception by the Senses’ अशी होते. याची चक्क मराठी व्याख्या अशी होईल- ‘‘संवेदनांच्या माध्यमातून समजून घेण्याचे शास्त्र.’’ काव्यात शब्द हेच संवेदनांचे माध्यम असतात. तेव्हा सौंदर्य म्हणजे केवळ देखणेपण? की जे आहे तसे? की जे संवेदना निर्माण करते ते? मला वाटले की, जिवाच्या आकांताने आपल्या मृत मुलासाठी टाहो फोडण्यासाठी आईच्या दुःखाचे दृश्य पाहूनसुद्धा कवीच्या मनात संवेदना निर्माण होत असतात. मग त्या दृश्याचेच ‘‘सौंदर्य संवेदनांच्या माध्यमातून ग्रहण करून कवी लिहीत नाही काय? आपल्याला त्याच त्या उपयोगामुळे अनेकदा शब्दाचा एकच ठरावीक अर्थ ठाऊक असतो. जेव्हा संवेदनांची किंवा प्रत्ययांची उत्कटता जशीच्या तशी शब्दांनी टिपून घेण्यात यश मिळते. तेव्हा मला माझ्या काव्यलेखनाचे सार्थक झाल्याचे संपूर्ण समाधान मिळते.’’

**प्रश्न** - पण मला तरी तुमच्या ‘रूपगंधा’ व ‘रंग माझा वेगळा’तील कविता वाचताना आणि आता ‘एल्गार’ वाचताना तुमची सौंदर्यदृष्टी बदललेली जाणवते. हा form चा परिणाम की काय?

**भट** - मी निश्चितपणे शृंगारिक काव्यलेखन केलेले आहे. परंतु अगदी प्रथमपासून माझ्या काळजाच्या, उदाहरणार्थ मी १९५० साली माझ्या

मराठी भाषेवर ‘‘गीत तुझे मी आई गाईन’ लिहिले किंवा नंतर असेही लिहिले-

*जो तो गाणे आपुलेच गाई!*
*ज्याला त्याला आपुलीच घाई!*
*दीड वितीच्या ह्या खळगीमाजी!*
*सारी माणुसकी निजली राही!!*

मी १९५१ साली लिहिले होते - राबणारे हात आम्ही राबणारे हात!

तर ते जाऊ द्या. मी जेव्हा तारुण्याच्या उंबरठ्यावर उभा राहिलो तेव्हासुद्धा मला सामाजिक विषमता, अन्याय आणि अंतर्विरोध थोडेबहुत जाणवतच होते. कारण माझ्या वाट्याला आलेल्या विशिष्ट आयुष्याने मला जातीप्रमाणे वर्गही दाखवून दिले. ब्राह्मण जातीत जन्मलेला मुलगा जर ‘करिअर’ नसेल तर ‘अतिशूद्र’ असतो!

*सगेसोयरे माझे सारे कधीच मेले!*
*पिंडदानही त्यांचे मी आक्रंदत केले!*
*ते गेले अन् उपकारांचे ओझे गेले!!*

हे असे असले तरी वयानुसार मी निश्चितच ‘रोमँटिक’ होतो. जसजसे माझे आयुष्य उलगडत गेले तसतसा मी सभोवतीच्या जगास व मलाही समजून घेत गेलो. मी जन्मभर माझ्याच मस्तीत असल्यामुळे समजून घेण्याची ही गती फारच मंद होती (पण समजून घेत होतो-समजून घेत आहे).

माझ्या मनात, मी माणूस असल्यामुळे, कोमल भावनांसाठी सदैव ‘राखीव जागा’ होती व आहे. माझ्या व्यक्तिगत अनुभवांनी मला अपार कटुता दिली. पण जगणे म्हणजे नुसतीच कटुता नसून त्यातही ओलाव्याची अनेक ठिकाणे असतातच. सोसणारा मी एकटाच नव्हतो व नाही. तेव्हा ती जाणीव सतत बाळगून माझ्यावर माझाच सतत पहारा ठेवून जीवनाच्या साऱ्या चवी चाखतचाखत मी माझ्या यातनांचे सामाजिकीकरण करून लिहू लागलो. हाच माझ्या ‘सौंदर्यदृष्टी’तील सर्वात महत्त्वाचा बदल होय!

**प्रश्न** - लेखनास मराठीतील उपलब्ध भाषासामग्री अपुरी पडते आहे, असे तुम्हाला वाटते काय? तसे वाटून स्वतंत्र संस्कार करून भाषा

◆ *मी प्रामुख्याने जरी गझल लेखन केले तरी ह्याचा अर्थ हा नाही की, मी इतर काव्यप्रकारांपेक्षा हा काव्यप्रकार जास्त महत्त्वाचा मानतो.* ◆

आपणांस हवी तशी वळवून घेण्याचे आपण कधी प्रयत्न केले का?

**भट** - अभिव्यक्तीच्या संदर्भात आजची अधिकृत साहित्यसामग्री लिहिणाऱ्यांसाठी पुरेशी उपयुक्त नाही. कारण आपल्या ललित साहित्यात बोलीभाषेतील हजारो खणखणीत मराठी शब्द आढळून येत नाहीत. ते शब्दकोशातसुद्धा अंतर्भूत झालेले नाहीत. क्रियापदे, विशेषणे आणि क्रियाविशेषणांच्या बाबतीतसुद्धा मराठी साहित्यिक मातृभाषेचा उपयोग पूर्ण करून घेत नाहीत. ते घरात जेवण तयार असताना होटेलात जाऊन जेवतात. इंग्लंड, अमेरिका पाहणाऱ्या आमच्या साहित्यिकांनी संपूर्ण महाराष्ट्र तरी पाहिला आहे काय? काही अपवाद वगळता त्यांचा सामान्यांशी काहीही संबंध नाही. त्यामुळे त्यांची भाषा कितीही फुलवली तरी तिच्यात चैतन्य नाही, मराठी बाज नाही. बहुसंख्य साहित्यिकांना त्यांच्याच वर्तुळातले शब्द माहीत असतात. वास्तविक बोलीभाषेत असे हजारो शब्द आहेत की, जे अधिकृत मराठी ललित साहित्यात अभिव्यक्तीची संधी मागत आहेत. पण आपल्या आईने आपल्यासाठी कोणत्या फडताळात कोणता खाऊ ठेवला आहे, हेच या आंधळ्यांना ठाऊक नाही. अनेकदा शब्दांचे तपशीलसुद्धा ठाऊक नसतात. उदा. वऱ्हाडात बायकोच्या भावाला 'साला' म्हणतात. नुसता मेहुणा नव्हे, बहिणीच्या नवऱ्याला 'बहीण-जावई' म्हणतात. पश्चिम व दक्षिण महाराष्ट्रात 'पाहुणा' शब्दाचा अर्थ सर्वसामान्यतः 'नातलग', तर कोल्हापुरात 'नवरा' होतो. उदा.- ''काय गं, तुझा पाव्हणा घरी कधी येणार?''

जसा लोभी माणूस आपला बँक अकाउंट वाढवत नेतो, तशीच आपली अभिव्यक्ती जिवंत व चैतन्यमय ठेवण्यासाठी आपण तिच्यात बोली भाषेत सुसंगत समर्पक शब्दांची, वाक्प्रचारांची व म्हणींची सारखी भर घातली पाहिजे. हे करण्यात काहीही गैर नाही. इंग्रजीचे अधिकृत शब्दकोश पाहिल्यास हेच आढळून येते.

तेव्हा ज्याचे पाय मातीत रुजलेले आहेत, तोच लेखक वा कवी भाषा

हवी तशी वळवून घेतो. शब्द फुलवून 'अभिव्यक्ती' होत नसते; तर एकेक शब्द फुलासारखा टिपून त्याचे वजन गुंजामासांनी तोलून, संवेदनाच्या बोटांनी स्पर्श करीत, त्याचा पोत निरखून मगच तो लेखणीतून कागदावर उतरवायचा असतो. खरे तर बहुतेक सर्वजण शब्द आहेत म्हणून शब्द वापरतात. चाकोरीबद्ध जगणाऱ्यांजवळ भरपूर समर्थ शब्द नसतात! आपली मराठी भाषा दरिद्री नसून आम्हीच करंटे आहोत!

**प्रश्न** - प्रतिभाविलासाच्या अनुभवासंबंधी तसेच आपल्या लेखन-प्रक्रियेसंबंधी आपल्याजवळ काही खास सांगण्याजोगी बाब आहे काय?

**भट** - साहित्याच्या संदर्भात, माझ्या मते 'प्रतिभा' म्हणजे समजून घेण्याची आणि नंतर अभिव्यक्त करण्याची किंवा कार्यान्वित करण्याची असाधारण मानसिक शक्ती होय.

माझ्या तथाकथित प्रतिभाविलासासंबंधी माझे अनुभव सांगण्यास मी असमर्थ आहे. कारण मला प्रतिभा आहे किंवा नाही हे लोकांनी ठरवायचे आहे. शिवाय येथे जागाही अपुरी पडेल. मी लेखन प्रक्रियेविषयी मात्र थोडेबहुत सांगू शकतो. मी कधी झपाट्याने, तर कधी आधीच्या ओळी इतकी तोलामोलाची ओळ येईपर्यंत थांबून लिहितो. माझे काव्यलेखन म्हणजे निवांत वेळातील छंद वा करमणूक नाही. हृदयाच्या दाखल्याविना लिहिताना पुढे सरकणे माझ्यासाठी धोकादायक असते. कारण चांगले लिहिणे ही माझी नैतिक जबाबदारी आहेच; पण माझे लेखन माझे नसून ती मराठी माणसाची मालमत्ता आहे! आणि आपल्याच माणसांच्या मालमत्तेची अफरातफर करायची नसते!

**प्रश्न** - तुमच्या कवितेत 'जगण्याशी भांडत' असलेला निराशावादच का डोकावतो?

**भट** - तो 'निराशावाद' म्हणजे वास्तवाचा घेतलेला वेध आहे, तो जगण्याचा अंतिम निष्कर्ष खासच नाही!

*काल ह्या गल्लीत आयुष्यासवे*
*गीत माझे झुंजले अन् हारले!*
*नागवी अद्यापही माझी घृणा;*
*मी कुठे हत्यार खाली टाकले?*

मी माझ्या शब्दांत सर्वांना सामावून घेऊन, त्यांच्या सुखदुःखांबरोबर

◆ ***मी गेली किमान ४० वर्षे सतत लिहीत आहे.
तरीही माझी ही तपश्चर्या पूर्ण झालेली नाही.
रोज सकाळी उगवणारा सूर्य मला
माझ्या अपूर्णतेची जाणीव देत असतो.*** ◆

जगतो व लिहितो.

गमे-दुनिया को गमे-इश्क में शामिल कर लो, नशा बढता हैं शराबें जो शराबों में मिले! (तुमच्या जीवनासक्तीच्या दुःखात जगाचे दुःख मिसळून घ्या. कारण ते मद्यामध्ये मद्य मिसळले की, नशा खूपच छान चढते!) मी फक्त माझ्याच दुःखांना ओवाळीत बसलो असतो, तर मग मला 'निराशावादी' म्हणता आले असते.

**मराठी गझलेपुढील आव्हाने**

सुरेश भट यांच्यानंतर गझल संपली असे ज्येष्ठ गायक पंडित हृदयनाथ मंगेशकर यांनी म्हटले होते, तर सुरेश भटांच्या मृत्युनंतर 'गझलगायक' भीमराव पांचाळ यांनी भट साहेबांसाठी अमृतांजली वाहताना 'मराठी गझल पोरकी झाली' असे उद्गार काढले. (संदर्भ- सुरेश भट एक झंझावात पुस्तकाचे पान - ११५)...

प्रदीप निफाडकर-सुरेश भट यांनी मराठी गझलेच्या दालनाला समृद्ध केले. ते म्हणताना हे लक्षात घेतले पाहिजे की, त्यांनी मराठी कवितेलाच समृद्ध केले. आपल्या बोलण्याने चांदण्यारूपी तलावावर तरंग उठू शकतो हे नवप्रेमिकांना भट यांनी दाखवून दिले. हे त्यांचे मोठे योगदान आहे. याचा अर्थ त्यांनी दगडांच्या देशाला ठोकर दिली असे नाही. जेव्हा वेळ आली तेव्हा-

*तुझा मी हात प्रेमाने जरासा दाबला होता*
*खरे मी सांगतो माझा इरादा चांगला होता*

किंवा

*हे तुझे अशावेळी लाजणे बरे नाही*
*चेहरा गुलाबाने झाकणे बरे नाही*

## *मी आयुष्यात खऱ्या अर्थाने कवितेशिवाय लौकिक सिद्धीची चिंता केली नाही.*

असे म्हणणाऱ्या भटांनी वेळ येताच-

*ती कुणाची झुंज होती? तो कसा जोहार होता?*
*जो निखारा वेचला मी तो निखारा गार होता*

भट साहेबांना उर्दूतील गालिब, फैज जेवढे आवडत तेवढेच दुष्यंतकुमारही आवडत असत. दोघांनी आपल्या गझलेला ना शीर्षक दिले ना मक्ता लिहिला. दोघांच्या सुरुवातीच्या गझल लेखनात चुका होत्या. तिकडे जेव्हा दुष्यंतकुमार-

*चलो, अब यादगारों की अंधेरी कोठरी खोले*
*कम अज कम एक वो चेहरा तो पहचाना हुआ होगा*

असे लिहीत होते, तेव्हा भट इकडे -

*मनाच्या खोल अंधारी कुणाच्या ऐकतो हाका*
*मघाशी कोणते डोळे मला ओवाळूनी गेले*

असे लिहीत होते. तिकडे दुष्यंतकुमार 'सुख तो कपूर की टिकीयासा उड गया' म्हणत होते, तेव्हा भट- 'कसा कापूर जन्माचा उडाला आरती आधी। कशा या सांजवेळेला दिव्यांच्या कोरड्या वाती।।' असे दोन पावले प्रतिभेने पुढे जात होते.

भट आणि दुष्यंतकुमार यांच्या गझलेतील एकही शब्द इकडे तिकडे करता येत नाही. पण इतर कवी घेऊनही मराठी गझलेची तुलनात्मक समीक्षा करता येते. गझलेची समीक्षा करण्यासाठी समीक्षकाला गझलेचा भरपूर अभ्यास करावा लागतो.

सर्वात पहिली व महत्त्वाची गोष्ट म्हणजे मराठीमध्ये गझल लिहिणे खूप अवघड असते. वृत्तांत लिहिणे, दोन ओळींच्या शेरात पूर्ण विचार मांडणे, दोन यमकांचे बंधन सोप्यात सोप्या पद्धतीने लिहिणे, नावीन्यपूर्ण स्वतःचे लिहायचे, एवढी बंधने तर कोणत्याही भाषेत. गझल लिहिली आहे पण मराठी भाषेत अजूनही खूप काही बंधने आहेत.

प्रत्येक बारा कोसावर मराठी भाषा बदलते. उदाहरणार्थ - एका

## *मी फक्त गझलेचे तंत्र घेतलेले आहे. मंत्र मराठीचाच आहे.*

गझलेत ‘बाई’ हे यमक घेतले तर याचा ‘बाई’ या शब्दाचा अर्थ गावागणिक बदलतो. पश्चिम महाराष्ट्रात बाई म्हणजे - स्त्री असा अर्थ होतो. तर खानदेशात जिचे वागणे चांगले नाही अशा स्त्रीला बाई म्हणतात. मराठवाड्यात बाई म्हणजे ‘बाईमाणूस’ या अर्थाने शब्द वापरला जातो. मराठी भाषेतला फरक मराठीत लिहिताना अवघड ठरतो.

उर्दूत ‘ए’ हे अक्षर वापरण्याची सोय आहे. उदाहरणार्थ, राम, नाम, बदनाम असेल तर यमक ‘शाम-ए-गम’ असे करता येते. हा ‘ए’ मराठीत फक्त दोन ठिकाणांत येतो. किल्ले रायगड किंवा कसबे-सुकेणे इथे वापरतात. बाकी कुठेही मराठीत तो वापरात येत नाही. म्हणून उर्दूत ओळ ही कशीही ‘ए’ अक्षराने फिरवता येते पण मराठीत नाही. यांचा भाषाशास्त्रज्ञांनी विचार केला पाहिजे.

तिसरी गोष्ट मराठीत ‘चेहरा’ या शब्दाच्या दोन एक दोन अशाच मात्र मोजल्या जातात तर उर्दूमध्ये ‘चेरा’ या शब्दाच्या दोन अधिक दोन अशा चार मात्रा मोजता येतात. मराठीत गझलेला हाही भाग मोठा आव्हानात्मक आहे.

चौथी गोष्ट म्हणजे मराठी कोणत्याही शब्दाचे अनेकवचन झाले की, क्रियापद बदलते. उर्दूमध्ये सहजरीत्या रदीफ वापरता येते.

*(‘गझलसम्राट सुरेश भट आणि मी...’, प्रदीप निफाडकर, पान २८८-२९२)*

❖❖❖

# भट यांनी लिहिलेले प्रहसन ‘वधुपरीक्षा’

*नमन*

*आधी नमन गौरीनंदना, करीत वंदना, पूर्ण कामना आमुची व्हावी।*

*ही कथा सांगण्या आता आम्हा मती द्यावी, आम्हा मती द्यावी, आम्हा मती द्यावी।। हे लंबोदर गणराज जरा दे आज गावया स्फूर्ती। तव वक्रतुंड उदंड त्रिखंडी कीर्ती, त्रिखंडी कीर्ती।। हो जीऽऽ जीऽऽ हो जीऽऽ हो जीऽ जीऽ.*

*एक होतं शहर आटपाट, निराळाच थाट, वस्ती बहू दाट।*
*चौफेर लोक गुलजार, गर्दी अनिवार,*
*दिसेना वाट, दिसेना वाट, दिसेना वाट।।*
*श्रीमंताचा लेख एकला होता रघुनाथऽऽ।*
*आणि निघाला होता नुकता बाप पेन्शनीत।*
*करीतसे रघुनाथ नोकरी कुठे दीडशेचीऽऽ।।*
*तशी तयाला तोच लागली घाई लग्नाचीऽऽ, घाई लग्नाची।।*

*गणप्या :* *अरेच्या, सात वाजून गेले; पण हा रघुनाथ कसा आला नाही अजून!*

*रघुनाथ :* *(प्रवेश पाठीवर थाप मारून) का रे, दचकलास का एवढा? भूत समजलास की काय मला?*

*गणप्या :* *भूत नाहीतर काय? तुझ्यासारखा प्रत्येक वर म्हणजे वधूपित्याच्या छातीवर बसलेला समंधच नाही तर काय?*

*रघुनाथ :* *अस्सं होय! आपल्याच मित्राला असे टोमणे मारतोस होय?*

*गणप्या :* *टोणग्याला टोमणा मारून काय उपयोग?*

*रघुनाथ :* *बरं ते राहू दे रे. मला एक मुलगी सांगून आली आहे*

म्हणालास नं? चल, जाऊ या.

गणप्या : अरे हो, हो! इतका आतुर का होतोस? मी जोपर्यंत या विवाह मंडळाचा सेक्रेटरी आहे, तोपर्यंत तू आपल्या लग्नाविषयी खात्री बाळग. तुझ्याविषयी चौकशी करीत होते ते.

रघुनाथ : अरे, मग तू काय सांगितलंस?

गणप्या : मी म्हटलं-
दिसण्यात देखणा तरुण शोभते भला। फुलवंत तसा धनवंत बी.ए. जाहलाऽऽ जीऽऽऽ हे रामा राघोबा दाऽजी जी जी जाणतो कला संगीत बोलणे गोड कधी लगीन होईल विवंचनेने रोड उजीऽऽ हे रामा राघोबा दाऽऽ जी जी जी रं जी जी रं जी मर्दात मर्द फाकडा बोल रोकडा एक ऐकावा। एकदा तयाला समक्ष पाहूनी घ्यावा।। (३ वेळा) घ्यावा रंऽ जी रं राघोबा दाजीऽ

रघुनाथ : अरे, ही माझी तारीफ की चेष्टा?

गणप्या : चेष्टा कशाला, करू मी? अरे, लग्न लावायची कामच आमची. विवाह मंडळाचा सेक्रेटरी ना मी! आणि त्यातून तुझा दोस्त. तुझी तारीफ नको करू तर काय करू? पण काय रे, आजपर्यंत तू एवढ्या मुली का नाकारल्यास?

रघुनाथ : पुष्कळ कारणं आहेत त्याला. पण हुंडा नव्हे बरं का!
मुळी घेणार नाही मी हुंडा।
नाही देणार कुणाला गंडा।
हुंड्यासाठी मला नको दमडी, वीस हजाराची हवी गाडव।
कोण विलायतेला मज धाडी।
तिथं पिईन मी व्हिस्की नी सोडा रं।।
मुळी घेणार नाही मी हुंडा
शेट सावकारांची होई गर्दी दारी।
मुली पाहायाला बोलविती घरी।।

*गड्या एकीहूनी दुजी दिसे बरी।*
*वधूपित्यांनी खुशाल भांडा रं।।*
*मुळी घेणार नाही मी हुंडा*
*वधू हवी मला शिकलेली।*
*मॉडर्न पुरी बनलेली।।*
*लाडकी लेक एकली।*
*(आणि लवकरच) तिच्या बापाला करीन मी थंडा रं।।*
*मुळी घेणार नाही मी हुंडा।*

*रघुनाथ : I am a man of principles असा ध्येयवादी माणूस आहे मी! हुंड्याचा भुकेला नाही हा रघुनाथ! आतापर्यंत ज्या डझनभर मुली मी नाकारल्या, त्या दुसऱ्याच कारणाने बरं का?*

*गणप्या : दुसरी कोणती कारणं आहेत?*

*रघुनाथ : तिलोत्तमा पण डोळे चकणे,*
*कुणी भसाडे गाई गाणे।*
*रंग कोळशावाणी काळा।*
*जरड मुलींना वय सांगे सोळा।।*
*अशा मुलींना पाहुनी पाहुनी झालो बेजार।*
*सांग तुझ्याविण मला कुणाचा उरला आधार।।*
*हा जीर जीर जीर जीर जी*

*गणप्या : आणि तू तरी काय जणू मदनाचा पुतळाच लागून गेलास की नाही! ध्यान बघा जरा,*

*रघुनाथ : तर, तर-*
*माझा थाट न्याराऽऽऽ*
*बघा मला जराऽऽऽ*
*वधूपित्यांवर माझा दरारा, माझा दरारा, माझा दराराऽऽ*

*गणप्या : रघ्या, अरे, मुलीच्या नुसतं रूपाकडे बघायचं नसं रे काही गुणदेखील बघायचे असतात.*

*रघुनाथ : तशा पाहिल्या आहेत रे सात-आठ मुली. पण...*

*गणप्या : पण काय?*

रघुनाथ : *मी विचारलेल्या प्रश्नांना बरोबर उत्तरदेखील देता आली नाहीत त्यांना, केलं झालं नापसंत.*

गणप्या : *आणखी कोणत्या मुली पाहिल्यास?*

रघुनाथ : *आजकाल तर इतक्या पाहतोय की, नावंदेखील विसरून गेलो काहींची!*

गणप्या : *माझ्या चोपडीत आहेत तू पाहिलेल्या मुलींची नावं. उदा. दिनकरराव देशपांड्यांची मोठी कन्या, दमयंती, कोकिळाताई घोगरे...*

रघुनाथ : *नाव घेऊ नकोस त्या भवानीचे. एवढी इंटर झाली आहे; पण अजून गावंढळच्या गावंढळच राहिलीय.*

गणप्या : *झालं तरी काय असं गरम व्हायला?*

रघुनाथ : *आमची स्वारी तिच्या तीर्थरूपांकडे गेली. हात जोडून, मान वाकवून आपले नसलेले दात दाखवीत म्हणाले, यावं! खुर्चीऐवजी लोडाला टेकून बसलो. मग म्हाताऱ्याने आतल्या खोलीकडे तोंड करून हाक मारली, ''बाळ दमयंती, जरा बाहेर ये पाहू.'' नंतर आतून कंकणाचा मंजूळ ध्वनी आला. मी मनाशी विचार करू लागलो, कशी असेल बरं ती? असाच विचार करीत असता ती आली...*

*कुण कुलवंताची कोर, येई बाहेर वर्ण अतिगौर लोचने मोर*\
*हृदयास लागला ध्यास, हवी ती बालाः जीऽऽ जीऽऽ*\
*घसरता डोईचा पदर, धडकले उर, उतरला नूर, गुन्हा मंजूर.*\
*हा पुन्हा करावा गुन्हा, छंद लागला। जीऽऽ जीऽऽ*\
*जणू पूर्ण चंद्र हसरा, भासला खरा, तिचा चेहरा, पाहता जरा*\
*निरखिले एकदा तिला, जीव लोभला। जीऽऽ जीऽऽ*

गणप्या : *मग नाकारलेस का रे तिला?*

रघुनाथ : *मी कुठे नाकारले रे? तिनेच मला म्हटले की, माझ्या*

*वडिलांनी जबरदस्ती केली म्हणून, नाही तर मी तुमच्यासमोर उभी राहायलासुद्धा तयार झाले नसते. मला मुळी लग्नच करायचं नाहीय. कारण पुरुषजात ही सारी पाजी।*
*म्हणून स्त्रियांच्या बंडाची मी पुकारली ग्वाही।*
*ध्येय आमुच्या स्वातंत्र्याविण दुजे मला नाही।।*
*हो जीरं जीरंऽ जीरंऽ जीरं जी*

*गणप्या : काय रे रघ्या, मग घरी पोचलास की इस्पितळात?*

*रघुनाथ : काय राव चेष्टा करता? बरं, चल पाहू आता.*

*गणप्या : जाताना फर्स्ट एडचे सामान बरोबर घे.*

**प्रवेश २रा**

*राहत होती शहरामाजी युवती एक तरला।*
*वडील मंडळी सर्व बोलती झाली लग्नाला।।*
*वृद्ध तीर्थरूप तिचे वास्तव हिंडती घरीदारी।*
*तोच तया भेटली कशी रघुनाथाची स्वारी।।*
*वेळ मुकर्रर झाली अगदी वधूपरीक्षेची।*
*चहा, बिस्किटे, लाडू, करंज्या गर्दी चकल्यांची।।*
*नटून थटूनी बैसली वधू, ये वास अत्तराचा।*
*आणि अचानक प्रवेश झाला तिच्या मैत्रिणीचा।।*

*सुमन : तरला, अग ए तारा, चल लवकर. आम्ही तिकिटेदेखील काढून आलो. आणि हे ग काय? काय हा थाट। जसं काही कुणी तुला पाहयलाच येणार आहे.*

*तरला : अगं, खरंच पाहायला येणार आहेत मला! आता १-१।। तासात येतीलच ते.*

*सुमन : तरीच!*

*तरला : खरं सांगू सुमन, मला तर वीट आलाय अशा वधूपरीक्षांचा. अगं, तासादोनतासांत जन्माच्या बायकोची परीक्षा कसे करतात हे पुरुष देव जाणे!*

*सुमन : अगं, पण सध्याची आधुनिक भंपकबाजी तर त्याहूनही*

वाईट. काही जुन्या गोष्टी वाईट असतात, पण उघड-उघड आणि सरळ. सध्याच्या आधुनिक आडवळणाचे मार्ग तर आपल्यासारख्या उपवर मुलींना फारच त्रासदायक असतात बाई. आता माझेच उहाहरण बघ ना?

तरला : काय झालं सांग की!

सुमन : अगं, आत्तापर्यंत मला तीनदा नाकारलं, आणि त्याची कारणंही मोठी चमत्कारिक.

तरला : कोणती?

सुमन : एकदा, असेच एक नवरोजी आले. त्यांनी माझ्यापुढे 'भूगोल' विषयाची एक प्रश्नपत्रिका टाकली व म्हटलं पेपर सोडवा. वेळ १।। तास, मार्क ५०. फर्स्टमध्ये पास झाल्यास नक्की पसंत, सेकंड क्लास मिळाल्यास विचार करू आणि थर्ड क्लास मिळाल्यास नापसंत.

गाणे : आल्यावर फर्स्ट क्लास, नक्की हो म्हणू तुम्हांस।
सेकंड क्लास मिळे जर, बघू आपुला विचार।।
जर वर्ग ये तिसरा, परतुनी जाऊ या घरा।

तरला : अय्या!

सुमन : मी त्याला विचारले, समजा आपले लग्न झाले तर भूगोलाची पुस्तकं काय लाकडाऐवजी चुलीत घालायची आणि जेवण काय ताटाऐवजी नकाशावर वाढायची?

तरला : मग काय उत्तर दिलं त्याने?

सुमन : जिला जगाचं ज्ञान नाही ती संसार काय करणार?

तरला : मग तू काय म्हटलंस?

सुमन : पुरे आता नवरोजी! मला जगाचे ज्ञान नसले तरी जनावरांचे चांगले ज्ञान आहे. मला माणसाशी लग्न करायचे आहे.

तरला : मग त्यांनी तुझ्या बाबांना काय निर्णय कळविला?

सुमन : प्रथम त्याचे तीर्थरूप आले व त्यांनी माझ्या बाबांना सांगितले की, तुमची मुलगी फार काळी असल्यामुळे

मी तिला माझी सून करून घेऊ शकत नाही. नंतर राजश्री आले व म्हणतात काय? तुमची मुलगी फार गोरी असल्यामुळे मला पसंत नाही.

गाणे : फारच तुमची मुलगी काळी।
मला सून ही असली कसली?
नवरोजी मग आले मागून।
दिले तयांनी हासत सांगून।।
फिकट पांढरी कन्या तुमची।
पसंत आम्हा ना होण्याची।।
चिरंजीव बघ एक बोलले, दुजे तीर्थरूप।
कशी शोभते बाप-मुलांची जोडी ही खूप।।
हा जीरं जीऽरं जीऽरं जीऽरजी

तरला : आचरट मेले!

सुमन : अगं, हे तर काहीच नाही. एक जण असाच मला पाहायला आला होता. मला त्याने जरा निरखून पाहिले आणि आपल्या पोतडीतून एक स्केलपट्टी काढली आणि म्हणतो कसा मेला, जवळ या पाहू मला तुमच्या नाकाची लांबी मोजायची आहे. तुमचं नाक तीन पूर्णांक दोन पंचमांश इंच भरेल तरच मी तुम्हांला पसंत करीन.

तरला : काय हे भलतंच!

सुमन : अगं, पुढची तर गम्मत ऐक. मी त्याला म्हटलं माझं नाक मोजू द्यायला माझी काही हरकत नाही; पण आधी तुम्ही तुमच्या पाठीची रुंदी आणि आमच्या घरच्या केरसुणीची लांबी मोजा.

तरला : नाही तरी हे शिकलेले लोक जरा जास्तच असतात. हुंडा मागणार नाहीत; पण त्याऐवजी ह्या ना त्या कारणाने त्याच्या दीडपट पैसा उकळतील. भरमसाठ मुली पाहतात आणि ज्या मुलीकडून जास्त पैसा मिळेल, तिच्याशी लग्न करतात.

सुमन : अगं,

*पुरुष सारखे येथून तेथून।*
*लग्ने करिती पैसा पाहून।।*
*नकार देण्या देती कारण!*
*करील माझ्याशी ही भांडत।*
*म्हणती, फारच आखूड बोटे।*
*नाक दिसे मज फारच चपटे।।*
*कुणी म्हणतसे डोळे तिरळे।*
*केस हिचे अन् फारच कुरळे।।*
*एक बोलतो, पोक निघाले।*
*दुजा बोलतो ठुमकत चाले।।*
*वदे ए ही रोड दिसावी।*
*दुजा वसे ही लठ्ठ असावी।*
*कुणा हवी ती ठार निरक्षर।।*
*असे चोचले आम्ही तयांचे कितीक पुरवावे?*
*हे मंत्र्यांना वा स्वर्गातील देवांना ठावे।।*
*हो जीऽरं, जीऽरं जीऽऽ*

*सुमन : काय हा आबंटशौक आणि मनाचा कोतेपणा! तरला, तू अशा पुरुषांशी का लग्न करणार! यापेक्षा जन्मभर कुंवारीण राहून समाजसेवा, किंवा देशभक्ती केलेली काय वाईट? पण, देखरेखील पुरुषच म्हणा!*

*तरला : मी करीन तरं अशा-तशाशी नाही काही लग्न करणार! मला कसा नवरा हवाय सांगू? सुशिक्षित पण समंजस, सालस पण स्वाभिमानी, सरकारी नोकरी हवी पण मंत्री नको, देखणा पण संभावित. थोडक्यात-*
*मज पती हवा देखणा ।।धृ।।*
*देखणा, जाणितो गुणा, प्रीतीच्या खुणा, हवा देखणा।।१।।*
*चाहूल लागता भूल पडावी मनाऽऽ हवा देखणा।।२।।*
*नोकरी असावी बरी, नसो पाहुणा, हवा देखणा।।३।।*
*ना सुचे ना काही रुचे ज्यास मजविणा, हवा देखणा।।४।।*

*सुमन : अहाहा! काय पण वर्णन केले आहे पण असा*

*सर्वगुणसंपन्न नवरा मिळायला सारं जग धुंडाळावे लागेल. देव करो आणि आज तुला पहायला येणारे सद्गृहस्थ तुझ्या कल्पनेप्रमाणे निघोत. पण नाव कळेल का मला त्यांचे?*

तरला : *नाव न सांगायला काय झालं? एवढंच काय, तर तू देखील ते येतील तेव्हा हजर राहा. जर मला त्यांनी नापसंत केलं तर तुला चान्स देईन. झालं ना समाधान.*

सुमन : *पुरे पुरे, नाव सांग पाहू आधी*

तरला : *रघुनाथराव दीडमिशे*

सुमन : *आँ! पुन्हा सांग पाहू.*

तरला : *र-घु-ना-थ-रा-व दी-ड-मि-शे.*

सुमन : *अगं, तोच तो मेला स्केलपट्टीवाला! तोच माझं नाकं मोजणारा होता!*

तरला : *अस्सं!*

सुमन : *विश्वास ठेव माझ्यावर तरला.*

तरला : *बरं झालं बाई तू मला सांगितलंस ते!*

सुमन : *अगं, माझंच काय, १०-१२ मुलींची नाकं मोजणार होता. काहींची मोजलीदेखील! अगं, ती आपली सिंधू कुलकर्णी नाही का तिचे नाक ह्याने आणि ह्याच्या सेक्रेटरीने मोजले आणि अभिप्राय दिला की हिचे नाक वाजवीपेक्षा लहान आहे म्हणून मी हिला पसंत करीत नाही, तर सेक्रेटरी म्हणाला की, हिचे नाक आखूड आहे, म्हणून मला हिचे नाव विवाहमंडळात टाकता येत नाही.*

तरला : *त्या चोंबड्यांच्या मताप्रमाणे नाकाची लांबी काय असावी?*

सुमन : *१।। इंच.*

तरला : *माजलेत मेले अगदी. सुमन आणखी कोणाकोणाच्या नाकावर हा स्केलपट्टी लावणारा होता?*

सुमन : *काय कमी मुली आहेत? एक मी, आणि सुशीला देशमुख, चंद्रिका रानडे इ.*

तरला : पुरे पुरे! तू आताच्या आता जा आमची गाडी घेऊन आणि सर्वजणींना भेट. त्यांना म्हणावं, त्या दीडमिशेची चांगली फजिती करायची आहे तरी लवकरात लवकर या. तू त्यांना घेऊन बरोबर ७।। ला ये. चांगली जिरवू मेल्यांची. शू! शू! आई आली (आई येते)

आई : बाई तरला, कसल्या ग गप्पा चालल्या आहेत तुमच्या?

तरला : काही नाही आई, उगाच आपल्या.

आई : मला ठाऊक आहे, तुला काळजी वाटते की, ते पसंत करतील की नाही पण मी जोपर्यंत आहे, तोपर्यंत तू कसलीही काळजी करू नकोस.

तरला : का?

आई : अगं, मी स्वागत करायला दारात उभी राहते, म्हणजे ते तुला नक्की पसंत करतील.

तरला : हे ग काय आई भलतंच बरळतेस?

आई : अगं, भलतंबिलतं काही नाही. अगदी साधी गोष्ट आहे. मला पाहिल्यावर ते विचार करतील की, आई ह्या वयात इतकी सुंदर दिसते, तर तिची मुलगी किती सुरेख असेल. म्हणून तर मी म्हणते, तुला न पाहताच ते पसंत करतील.

तरला : अगं आई, हे नवे युग आहे.
आई युग नवे, आई युग नवे।।धृ।।
सारे काही निराळेच, मुले मुली वेगळ्याच,
दोघांनीच बोलायचे, मुलांना हेच हवे, हेच हवे आई युग नये।।१।।
जाऊ आम्ही सिनेमाला, टॅक्सीतून फिरायला, चर्चा खूप करायला,
जनांचे बघती थवे, बघती थवे, आई युग नवे।।२।।
आई-बाबा जा निघूनी, घेऊ सारे आटोपूनी, मोकळेपणी बोलूनी,
बोलणे आज नवे, आज नवे, आई युग नवे।।३।।

*आई : बरं बाई, तुम्ही आजकालची पोरं, जे कराल ते खरं. (जाते)*

*तरला : सुमे, जा पाहू लवकर. ते टोळभैरव यायच्या आत आपली जय्यत तयारी झाली पाहिजे. (सुमन जाते)*
*करुनी तयारी सारी जय्यत।*
*वाट तयांची बसते पाहत।।*
*येईल तुफान सेना अमुची।*
*छान खोडकी जिरेल त्यांची।।*
*दीडमिशे चोंबडे येऊ द्या आम्हांस ना पर्वा।*
*जोर आमुचा पाहुनी करतील देवांचा धावा।।*
*हो जीऽ रंऽ जीऽ रं*

***प्रवेश ३रा***

*(रघुनाथ व गणप्या प्रवेश करतात) तरला एकटीच समोर असते.*

*तरला : या*

*गणप्या : नमस्ते*

*तरला : बसा*

*गणप्या : नको, उभेच राहतो.*

*तरला : (रघुनाथकडे वळून गणप्याकडे बोट दाखवीत) हे कोण?*

*रघुनाथ : साथी जीवाचा लगीन मंडळाचा हा चिटणीस।*

*गणप्या : व्यर्थ काढता क्षुल्लक मुद्यासाठी का कीस. होऽ जी रं, जी रंऽऽ जी*

*तरला : समजा माझे लग्न झाले तर ते तुमच्याशी की यांच्याशी?*

*गणप्या : (ओवीच्या सुरात) जमलं तर त्यांच्याशी, नाही तर माझ्याशी।*

*तरला : म्हणजे याचा अर्थ?*

*रघुनाथ : (सुरात) परस्परां साहाय्य करु।*
*अवघे धरू सुपंथ।।*

*तरला : तुमच्या मित्राचे पूर्ण नाव कळेल का?*

*रघुनाथ : श्री. गणपतराव चोंबडे*

तरला : *वाटलंच मला. चोंबडे की कोंबडे! कोंबडे की चोंबडे! (गणप्या खजील होतो.)*

रघुनाथ : *काय म्हटले?*

तरला : *काही नाही चोंबडा व कोंबडा! छाम यमक साधतं नाही? मला कविता करायचा नाद आहे म्हणून विचारले.*

रघुनाथ : *म्हणजे तुम्ही काव्यलेखन करता? छान! छान!*

तरला : *बरं, मला बघणार कोण? आपण की हे चोंबडे?*

रघुनाथ : *मी.*

तरला : *करा सुरुवात.*

रघुनाथ : *गणप्या काढ रे. (स्केलपट्टी काढतो)*

तरला : *ही स्केलपट्टी कशाला? माझी भूमितीची परीक्षा तर घेत नाही ना तुम्ही?*

रघुनाथ : *तुमच्या नाकाची लांबी मोजणार आहे मी.*

तरला : *का बाई?*

रघुनाथ : *कारण प्रसिद्ध तत्त्ववेत्ता हिम्पोमेटस, ह्यांच्या सिद्धान्तानुसार स्त्रियांच्या नाकावर त्यांचे सौंदर्य, स्वभाव, बुद्धी अवलंबून असते.*

तरला : *अस्सं होय! सुमन ए सुमन! इकडे ये पाहू. (सुमन येते.)*

रघुनाथ : *(दचकून) ह्या कोण? मी ह्यांना कुठे तरी पाहिल्यासारखं वाटतंय.*

सुमन : *तुम्ही नसेल मला ओळखलं. पण मीच काय तर गावातल्या सगळ्या उपवर मुली तुम्हांला ओळखतात. (रघुनाथ ऐटीने कॉलर वर करतो.) कोणत्या नावाने ओळखतात सांगू?*

रघुनाथ : *सांगा पाहू*

सुमन : *रघुनाथराव स्केलपट्टीवाले. रागवू नका हं! जे इतर म्हणतात, तेच मी तुम्हांला सांगितलं. तसं मी तुम्हांला ओळखते. तुमचे आडनाव आहे दीडमासे!*

रघुनाथ : *दीडमासे नाही, दीडमिशे! तुम्हांलाही ओळखलं मी. तुमचं नाव सुमन जोशी.*

सुमन : तुम्ही मला सकाळी पाहायला आला होतात. नाव लक्षात ठेवल्याबद्दल धन्यवाद!

रघुनाथ : उपवर मुलींना बघणे, त्यांची परीक्षा घेणे, हा आम्हा पुरुषांचा हक्क आहे.
एक सकाळी दुजी दुपारी।
पाहत जाता आम्ही पोरी।।
तिसरी बघतो सायंकाळी।
चवथी रात्री ठरली पाळी।।
उपवर पोरी निरखूनी बघणे।
आणि परीक्षा त्यांची घेणे।
हक्क मुळी आम्हा पुरुषांचा।
सवाल अगदी हा तत्त्वाचा।।
अमुच्या हक्का तिळभर बाधा कोण आणणार
पुरुषांचे श्रेष्ठत्व आम्हाविण कोण सांगणार।।
होऽ जी रंऽ जी रंऽऽ
तुमच्याविषयी मागाहून पूर्ण विचार करू.
तूर्त तुमचे नाव लक्षात ठेवू.

गणप्या : (शहारल्यासारखे करून) केरसुणीसुद्धा.

तरला : असो, रघुनाथराव, आपले काम बाजूलाच राहिले.

रघुनाथ : अरेच्या! (स्केलपट्टी सरसावतो.)

तरला : जरा थांबा. सुमन काढ पाहू. (सुमन लाटणे काढून तिच्या हातात देते.)

रघुनाथ : हे काय?

तरला : कवटीची परीक्षा. प्रसिद्ध भारतीय शास्त्रज्ञ शांतिसागर यांच्या सिद्धान्तानुसार, माणसाची कवटी जितकी जाड तितके त्याचे सौंदर्य, बुद्धिमत्ता जास्त. ह्या सिद्धान्तांची कसोटी मी ह्या (हात पुढे करत) साधनाच्या साहाय्याने पाहणार आहे.

रघुनाथ : अरे बापरे!

गणप्या : विनय हे स्त्रियांचे भूषण आहे.

तरला : लेडीज फर्स्ट (लाटणे उगारते.)

रघुनाथ : राहू द्या. स्केलपट्टीची व त्या साधनाची काही जरुरी नाही. मी विचारेन त्या प्रश्नांची उत्तरे द्या. जर समाधानकारक उत्तरं मिळाली तर मग...

तरला : विचारा की.

रघुनाथ : माझा मित्रही माझ्या वतीने काही सवाल करेल.

तरला : थांबा जरा! आपल्या प्रश्नोत्तरांत जर हे चोंबडे येत असतील तर मीपण माझ्या मैत्रिणींना बोलवते. अगं ए, रजे, विजे, सिंधे, वीणे- (सर्व जणी येतात.)
१) हाच तो मेला स्केलपट्टीवाला.
२) हे तर रघुनाथराव.
३) आणि तो कोण गं?
४) बुडव्या, चोंबडा
अगं तारा, इथे कसे हे स्केलपट्टीवाले?

सुमन : मला तर हा सकाळी पाहून गेला. माझ्याकडे आले होते दुपारी! आणि माझ्याकडे संध्याकाळी!

तरला : स्स! स्स! शांत व्हा.

रघुनाथ : ह्या कशाला इथे?

तरला : जसे तुमचे मित्र आले, तशा माझ्या मैत्रिणी आल्या

रघुनाथ : ठीक, काही हरकत नाही, विचारा प्रश्न.

सुमन : आम्ही तयार आहोत. होऊ द्या सवाल.

**सवाल-जबाब**

गणप्या : लग्नानंतर भांडण तुम्ही त्यांच्यासंगे कराल का?

सुमन : काय भरोसा अहो उद्याचा लग्नानंतर उराल का?
जीऽ जी रं जी हे रामा, राघोबाऽ दाजीऽ

गणप्या : स्वयंपाक बनवून करांनी चला भोजना म्हणाल का?

सुमन : सोशलवर्क मी करीत असता पोरे माझी बघाल का?
जीऽ जीऽ

गणप्या : तीर्थरूपाची लेक एकली, दौलत मजला मिळेल का?

सुमन : दौलत राखावयाची तुम्हा अक्कल थोडी येईल का? जीऽऽ

*गणप्या : दिसता सुंदर लग्नानंतर अशाच तुम्ही दिसाल का?*
*सुमन : मुर्दाडासम सूरत असली तुमची तेव्हा खुलेल का? जीऽऽ*
*गणप्या : घरी सासरा-सासू यांची सेवा तुम्ही कराल का?*
*तरला : मी थकल्यावर काम कराया घरात तुम्ही राहाल का? जीऽऽ*
*गणप्या : जाडेभरडे वस्त्र नेसूनी आनंदाने राहाल का?*
*तरल : अन्नसमस्या देशामाजी, गव्हाऐवजी? खाल का? जीऽऽ*
*गणप्या : सुटता ऑफिस दारावरती वाट तयाची बघाल का?*
*तरला : परतुनी आल्यानंतर तुम्ही दळण आणण्या निघाल का? जीऽऽ*
*गणप्या : उरफाटा हा सवाल पुसता, कधी आम्हांला पटेल का?*
*तरला : खेटरपूजा केल्यावाचून लचांड तुमचे सुटेल का? जीऽऽ*
*(तरला लाटणे उगारते. इतर मुलीही तुटून पडतात, रघ्या व गणप्या पळून जातात) आई येते.*
*ही कथा दाविली आता गोड मानी।*
*रांगता हळू वेंगता पोर मानवी।।*
*बोबडे, शब्द तोकडे पडावा येथे।*
*घे कडे काव्य बापुडे मानुनी नाते।।*
*आपुला शब्द मी दिला, चाकरी केली।*
*आपला जीव हर्षला, म्लानता गेली।।*
*हो जीऽऽ होऽ जीऽ जी.*

❖❖❖

# भट ह्यांच्या रचनेतील विविध वृत्ते

## रुपगंधा

**व्योमगंगा**

मल्मली तारुण्य माझे तू पहाटे पांघरावे!
मोकळ्या केसात माझ्या तू जिवाला गुंतवावे!

**देवप्रिया**

मी कसा वेडा! तुला ठाऊक सारे जाहले!
माझियापाशी अता माझे न काही राहिले!

**व्योमगंगा**

स्वप्न माझ्या वेदनेच्या चांदण्याचे 'ये' म्हणाले!
अमृताच्या पावलांनी रूप भेटायास आले!

**व्योमगंगा**

माझिया गीतास द्वेषाचा जुना आधार आहे!
माझिया द्वेषास विश्वाच्या व्यथेची धार आहे!

**आनंदकंद**

साऱ्याच यातनांना का एकलाच साहू?
सोशीत घाव सारे का मी असाच राहू?

**वैशाखासारखे**

झाली सखे पहाट, जाग! रात संपली
ही सोड मुकी मोठी मधाळ आपुली!

**व्योमगंगा**

पूर्तता माझ्या व्यथेची माझिया मृत्यूत व्हावी!
जीवनापासून माझ्या ह्या मला मुक्ती मिळावी!

## रंग माझा वेगळा

**मोहिनी**

ताठ कॉलरींचा ताठ वाकणार आहे
वंचनाच ज्याची त्याला गाडणार आहे

**व्योमगंगा**

रूपकैफी प्रत्ययांचा गलबला प्राणात झाला
स्पर्शकल्लोळात माझा जन्म एकाकी बुडाला

**देवप्रिया**

लाजूनी झाले गुलाबी दुःख माझे देखणे
ही तुझी श्वासात आली लाघवी आमंत्रणे

**रमल मुसम्मन महजूफ मक्तूस (फार्सीवृत्त)**

हरविले आयुष्य माझे; राहिले हे भास
धगमगे शून्यात माझी आंधळी आरास

**हिरण्यकेशी**

जिवंत माझ्या कलेवराला अजून आयुष्य हाकमारी!
कशास एका भिकारड्याला पुकारतो हा दुजा भिकारी

**देवप्रिया**

एक साध प्रश्न माझा, लाख येती उत्तरे!
हे खरे की ते खरे की ते खरे की ते खरे?

**आनंदकंद**

माझी उदास गीते तू ऐकतोस का रे?
अन् आसवांत माझ्या तू नाहतोस का रे?

**देवप्रिया**

दिवस हे जाती कसे अन् ऋतू असे छळतात का?
विसरतो आहे तुला पण आसावे ढळतात का?

**व्योमगंगा**

गंजल्या ओठास माझ्या धार वज्राची मिळू दे!
आंधल्या आत्म्यात माझ्या सूर्य सत्याचा जळू दे!

**व्योमगंगा**

आज मी जे गीत गातो ते उद्या गातील सारे!
चालू दे वक्षात माझ्या वादळांचे येरझारे!

**व्योमगंगा**

जगत मी आलो असा की मी जसा जगलोच नाही
एकदा तुटलो असा की, मग पुन्हा जुळलोच नाही

**वैशाख**

गेलो निघून दूर पुन्हा आढळेन का?
माझा कराल शोध, परी सापडेन का?

**वियदगंगा**

स्मरायासारखा आता तसा मी राहिलो नाही
कहाणी संपली माझी-जरी मी बोललो नाही

**कालिंद-नंदिनी**

अजून आसवे किती पुसायचीच राहिली!
अजून अंतरे किती जळायची न थांबली!

**आनंदकंद**

समजावुनी व्यथेला समजावता न आले!
मज दोन आसवांना हुलकावता न आले!

**मंदाकिनी**

विसरून जा! विसरून जा! तुजलाच तू विसरून जा
तुझियाच आयुष्याचिया हाकांसवे हरवून जा

**मंदाकिनी**

साऱ्याच डोळ्यांची उभी डोळ्यात माझ्या आसवे
जे सोशिले सोसतो - तेही न आता जाणवे

**देवाप्रिया**

रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा
गुंतूनी गुंत्यात साऱ्या पाय माझा मोकळा

**वैशाख**

डोळे मिटून रूप तुझे मी निहाळले!
माझे शिवून ओठ कितीदा पुकारले!

**मंदाकिनी**

साऱ्याच शंकांची अशी मागू नको तू उत्तरे!
असतात शंकेखोर जे त्यांचे कधी झाले बरे

**मंदाकिनी**

आता मजेने बोलतो भेटेल त्या दुःखासवे!
सांभाळूनी घेती मला माझी इमानी आसवे!

**मंदाकिनी**

हे असे आहे तरी पण हे असे असणार नाही!
दिवस अमूचा येत आहे; तो घरी बसणार नाही!

**आनंदकंद**

सारेच हे उमाळे आधीच योजलेले
सारेच हे जिव्हाळे आधीच बेतलेले!

**व्योमगंगा**

तरुण आहे रात्र अजूनी राजसा निजलास कां रे?
एवढ्यातच त्या कुशीवर तू असा वळलास का रे?

**देवप्रिया**

भोगले जे दुःख त्याला सुख म्हणावे लागले!
एवढे मी भोगिले की मज हसावे लागले!

**वियदगंगा**

सुखाच्या सावल्या साऱ्या कशा वेडावूनी जाती
जसा मी फोडितो टाहो तशा त्या तोडती नाती

**देवप्रिया**

खाजगी दुःखास दैवी मानणारा वेगळा!
राहूनी माणूस अश्रू वाटणारा वेगळा!

**देवप्रिया**

आसवांनो, माझिया डोळ्यांतूनी वाहू नका!
अंतरीच्या वेदना साऱ्या जगा दावू नका!

**देवप्रिया**

उगिच मी इथल्या जगाला आजमावत राहिलो
ह्या प्रतिष्ठित उकिरड्यांवर जीव टाकत राहिलो!

**वैशाख**

आयुष्य बेचिराख तरीही मजेत मी!
आली व्यथा कवेत व्यथेच्या कवेत मी!

**मंदाकिनी**

विटले जगाचे रंग अन् प्राणासही गेले तडे
जेव्हा अचानक भेटतो... परकाच मी मज सापडे!

## एल्गार

**आनंदकंद**

अद्यापही सुऱ्याला माझा सराव नाही
अद्यापही पुरेसा हा खोल घाव नाही

**वियदगंगा**

जगाची झोकूनी दुःखे सुखाशी भांडतो आम्ही
स्वतःच्या झाकूनी भेगा मनुष्ये सांधतो आम्ही

**विधाता**

इतुकेच मला जाताना सरणावर कळले होते
मरणाने केली सुटका जगण्याने छळले होते

**मोहिनी**

आपुल्याच आयुष्याशी जाबसाल झाले
जे जबाब आले त्याचे ते सवाल झाले

**आनंदकंद**

हा ठोकरुन गेला, तो वापरुन गेला
जो भेटला मला तो वांधा करुन गेला

**रंगराग**

हे तुझे अशा वेळी लाजणे बरे नाही
चेहरा गुलाबाने झाकणे बरे नाही

**विधाता**

शेवटी वंदमंत्रानी अन्याय एवढा केला
मशहूर ज्ञानया झाला... गोठ्यातच जगला हेला

(शा.म.मु.) एन २६९--१० (११००--१-२०२४)

**रंगराग**

तू नभातले तारे माळलेस का तेव्हा?
माझियाच स्वप्नांना गाळलेस का तेव्हा?

**हिरण्यकेशी**

फूलावया लागलीस तेव्हा मला कुठे देहभान होते
वसंत आला निघून गेला... मला कुठे वर्तमान होते

**मेनका**

चंद्र आता मावळाया लागला
प्राण माझाही ढळाया लागला

**लज्जिता**

गीत आसावले तुझ्यासाठी
सूर खोळंबले तुझ्यासाठी

**लज्जिता**

ही न मंजूर वाटचाल मला
दे भविष्या तुझी मशाल मला

**सती+जलौघवेगा**

तुझ्या मनाला गडे किनारे अजून काही
तिथेच जाऊन वेच तारे अजून काही

**रमल मुसम्मन मखवून महझूफ (फार्सी वृत्त)**

हा असा चंद्र... अशी रात फिरायासाठी
तूच नाहीस इथे हात धरायासाठी

**राधा**

रोजचे आरोप येती माझिया दारी
बोलतो मी साफ, ही माझी गुन्हेगारी

**भुजंगप्रयास**

अता राहिलो मी जरासा जरासा
उरावा जसा मंद अंती उसासा

**आनंदकंद**

दिवसाच चोरट्यांनो जाळू नका मशाली
अजूनी न सूर्य केला तुमच्या कुणी हवाली

**विद्युलता**

मी एकटीच माझी असते कधी कधी
गर्दीत भोवतीच्या नसते कधी कधी

**मंजुघोषा**

वागणे माझे जरी साधेच होते...
दाबलेले हुंदके ताजेच होते

**श्रीलीला**

येणारा दिवस मला हेटाळत हसणारच
जाणारा दिवस मला जाताना उसणारच

**वैशाख**

आता उनाड शब्द वळायास लागले!
सारे लबाड अर्थ कळायास लागले!

**लज्जिता**

आसवांचे जरी हसे झाले
हे तुला पाहिजे तसे झाले

**मंजूघोषा**

मी खुलासेही कशासाठी करावे?
लोक पाठीमागूनी घेतात चावे!

**हिरण्यकेशी**

सख्या तुला भेटण्यास मी या भल्या पहाटे निघून आले
घरातूनी चोरपावलांनी लपून आले... जपून आले

**वियदगंगा**

मुका पाऊस एकांती मुक्याने बोलला होता
कुणाचा हुंदका माझ्या गळाशी दाटला होता

**मंजुघोषा**

या फूलांनी छेडिली रानात गाणी
का गडे आलीस तू ह्याही ठिकाणी?

**स्त्रग्विणी**

सूर्य केव्हाच अंधारला यार हो
या, नवा सूर्य आणू चला यार हो

**लज्जिता**

ही कहाणी तुझ्याच न्यायाची
तापलेल्या अधीर पाण्याची

**मंदाकिनी**

आता जगायचे असे माझे किती क्षण राहिले?
माझ्या धुळीचे शेवटी येथे किती कण राहिले?

**कामिनी**

एवढे तरी करून जा
हा वसंत आवरून जा

**मरीचिका**

कळे न काय कळे एवढे कळून मला
जगून मीच असा घेतसे छळून मला

**लज्जिता**

दूर तारे थरारले होते
(मी नको ते विचारले होते)

**सती जर्लो घवेगा**

दिलास तू शाप जीवनाच्या उनाडकीचा
विचारला मीच प्रश्न तेव्हा तुला चुकीचा

**आनंदकंद**

हेही असेच होते, तेही तसेच होते
आपापल्या ठिकाणी सारे ससेच होते

**वियदगंगा**

कशी ही बोलकी झाली घरे ओसाड गावाची
सुने रस्तेच हे गाती पुन्हा गीते उठावाची

**आनंदकंद**

येथे कुणीच नाही माझ्यापरी दिवाणे
मी गीत गात आहे येथे गुन्ह्याप्रमाणे

**मंजुघोषा**

मी असा त्या बासरीचा सूर होतो
नेहमी ओठांपूनी मी दूर होतो

**सती+जलौघवेगा**

पुन्हा पुन्हा चूक तीच ती मी करीत गेलो
तुझा खुनी हात जीवना मी धरीत गेलो

**वियदगंगा**

जरी ओठांवरी येती नभागे शब्द स्वच्छंदी
मला बोलायची बंदी, तुला ऐकायची बंदी

**सती + जलौघवेगा**

पुन्हा स्मशानी घडायचे ते घडून गेले
चितेवरी लोक जे नको ते रडून गेले

**मंजूघोषा**

आसवांना कोणता अधिकार होता?
घाव जो केलास तो सुकुमार होता!

**लज्जिता**

रात गेली निघून पाऱ्याची
हाक आली पहाट ताऱ्याची

**प्रभाव**

तुला हवा तसा धरु कुठून चेहरा?
उधार आणला न मी अजून चेहरा?

**लज्जिता**

कालची बातमी खरी नाही
हाय, स्वर्गात भाकरी नाही

**आनंदकंद**

नाही म्हणावयाला आता असे करु या
प्राणात चंद्र ठेवू-हाती उन्हे धरू या

**स्त्रग्विणी**

नाव माझे फुलांनी विचारू नये
नाव सांगेन तेव्हा शहारू नये

**आनंदकंद**

बांधू हवेत किल्ला बाकाबुलंद यंदा
त्या क्रांतिकारकांचा आवाज बंद यंदा

**आनंदकंद**

केव्हातरी पहाटे उलटून रात्र गेली
मिटले चुकून डोळे हरवून रात्र गेली

**मेनका**

माणसांना हाक मारू लागलो
बंद खोल्यांना पुकारू लागलो

भिंत खचली कशी? दार फुटले कसे?
हात बेड्यांतूनी आज सुटले कसे?

**वियदगंगा**

पुन्हा तेजाब दुःखाचे उरी फेसाळूनी गेले
पुन्हा ओठांवरी गाणे तुझे घोटाळूनी गेले

**लज्जिता**

राहिले रे अजून श्वास किती?
जीवना, ही तुझी मिजास किती?

**सारांक**

सोडून तुझा गेलो संसार तुझ्यासाठी
माझी न हवा झाली आधार तुझ्यासाठी

**देवप्रिया**

सोडताना प्राण त्यांना मी कुठे बोलावले?
खातरी झाली न त्यांची? ते घरी डोकावले

**विद्युल्लता**

आले रडू तरीही कोणी रडू नये
कोणीच आसवांच्या हाती पडू नये

**विद्युल्लता**

तेव्हा सदेह स्वर्गी गेला जरी तुका
येथील भाविकांना भंडावती भुका

**मृगाक्षी**

दिशा गातात गीते श्रावणाची
कुणाला याद तान्हेल्या तृणाची?

**वियदगंगा**

तशा माझ्या चुका झाल्या, तसे मीही गुन्हे केले
तसे कित्येकदा मीही मला न्यायालयी नेले!

**व्योमगंगा**

या नदीच्या पार तेथे एक माझे गाव होते
कोण जाणे हाय तेव्हा काय माझे नाव होते?

**मंदाकिनी**

जगलो असाच कसातरी ओठातल्या ओठात मी
आता कुठे बोलायला केली खरी सुरवात मी!

**सौदामिनी**

मला गाव जेव्हा दिसू लागले
लुळे पाय माझे रुसू लागले

**सती-जलौघवेगा**

हरेक आवाज आज अर्ध्यात छाटलेला
हरेक माणूस आज आतून फाटलेला

**आनंदकंद**

ही शूर काचपात्रे गाती जरी पवाडा
घेऊ नये बुडांचा कोणी कधीच झाडा

**भामिनी**

उंबऱ्याने 'नको रे!' म्हणावे
अंगणानेच का गुणगुणावे?

**मृगाक्षी**

जगाची काळजी संभावितांना
कण्हाया लागती दारु पितांना

**वीरलक्ष्मी**

आरशांचेच दावे खरे
चेहऱ्यांनाच गेले चरे

**मंदाकिनी**

जेव्हा लढाईचा खरा डंका झडाया लागला
आपापल्या तंबूमध्ये- जो तो दडाया लागला

**भामिनी**

झिंगतो मी कळेना कशाला
जीवनाचा रिकामाच प्याला!

**देवप्रिया**

फाटके संसार ज्यांचे... मोडकी ज्यांची घरे...
त्याच लोकांना उद्याची मागतो मी उत्तरे!

**स्त्रग्विणी**

उगिच बोलायचे, उगिच हासायचे
उगिच कैसेतरी दिवस काढायचे

**कलावती**

जिवंत कोण? कुणालाच बातमी नाही
दिसे हरेक तरी... सावली हमी नाही

**आनंदकंद**

सांगा कुणीतरी या आकाश काजव्यांना
मातीच मोक्ष देई कंगाल नागव्यांना

**व्योमगंगा**

हारण्याची खंत नाही, हारणे जिंकून जाई
आजची ही झुंज नाही - ही उद्याची हातघाई

**मंजुघोषा**

भाजुनी गेला मला तेव्हा उन्हाळा!
कोरडा आला आता हे पावसाळा!

**मंजुघोषा**

आसवांनी मी मला भिजवू कशाला?
एवढेसे दुःख मी सजवू कशाला?

**हिरण्यकेशी**

सुन्या सुन्या मैफलीत माझ्या तुझेच मी गीत गात आहे
अजूनही वाटते मला की, अजूनही चांदरात आहे

**मंजुघोषा**

एकमेकांना कसे हे चावती कुत्रे
हाडकांसाठी कसे हे भांडती कुत्रे

**वीरलक्ष्मी**

आसवांच्या सरी बोलती
मी न बोले, तरी बोलती

**व्योमगंगा**

राख सांभाळून ठेवा राख झालेल्या घराची
संपली नाही लढाई यार हो नामांतराची

**मंदाकिनी**

खोटे हसू, खोटे रडे, खोटीच ही संभाषणे
येथे जगावे लागते खोट्यांसवे खोटे जिणे

**आनंदकंद**

कुठलेच फूल आता मजला पसंत नाही
कळते मला अरे हा माझा वसंत नाही

**हिरण्यकेशी**

अताच कोठे मनात माझ्या तुझ्या रुपाची पहाट झाली
दवारले फूल काळजाचे, हळूच जन्मास जाग आली

**व्यामगंगा**

ती कुणाची झुंज होती? तो कसा जोहार होता?
जो निखारा वेचला मी तो निखारा गार होता

**मेनका**

मी कशी प्रीती कराया लागलो
सावलीसाठी झुराया लागलो

**आनंदकंद**

जितके जगावयाचे तितके जगून झाले
फिरते उगीच जाते... जगणे दळून झाले

**रंगराग**

संपला आता माझा श्वास घ्यायचा दावा
राहिला जगायाचा हा उदास देखावा

**आनंदकंद**

मेल्यावरी जगाचे आभार मानले मी
जाऊ दिले मला हे उपकार मानले मी

**रंगराग**

का म्हणून मी आता शब्द आवरू माझे?
या विराट सत्याशी बोलणे सुरु माझे

**मोहिनी**

तुम्ही काय म्हणता याचा मज विषाद नाही
मी जिवंत आहे-माझा हा प्रमाद नाही

**रंगराग**

चंद्र राहिला नाही भाबड्या चकोरांचा
चांदण्यावरी ताबा आजकाल चोरांचा

## झंझावात

**विधाता**

मधूनीच फुलारत होतो, मधूनीच सळाळत होतो
मधुनीच तुझ्या स्वप्नाला मी प्रश्न विचारत गेलो होतो

**सती+जलौघवेगा**

खरेच माझा जगावयाचा विचार होता
खरेच तो एक जीवघेणा जुगार होता!

आपापल्या सुखाशी केला करार त्यांनी...
मी बोचताच माझी केली शिकार त्यांनी!

**मृगाक्षी**

जगाशी फार सांभाळून बोला!
नको ते नेमके टाळून बोला!

**विद्युल्लता**

एकेक सोबती मी निरखून पाहिला
एकेक चेहरा मी उलटून पाहिला

**वियदगंगा**

तुझा मी हात प्रेमाने जरासा दाबला होता
जरा ऐकून घे, माझा इरादा चांगला होता

**मंजुघोषा**

पाहिली खोट्या जिव्हाळ्यांची हुशारी
भेटती आमंत्रणेही टाळणारी!

**विभावरी**

जगायचे नसेलही जगून जा!
इथून एकदा तरी हसून जा !

**हिरण्यकेशी**

जगून पाहिले इथे हा खरेच माझा कसूर होता
नजीकचा दाट ओळखीचा हरेक माणूस दूर होता

**राधा**

झोपला घाणीत माझा देश हा बापू!
मी कशासाठी फुलांचे गीत आलापू?

**वैशाख**

नाही जगू दिले अन् नाही मरु दिले
हे रक्त मात्र माझे त्यांनी झरु दिले

**कादंबरी + गा**

जीवनाशी बोलणी झाली
आसवांची मागणी जाली

**मंदाकिनी**

मी पाहिले होते तुला, हे ही न आता आठवे
वारा जिथे नेतो मला, जातो तिथे त्याच्यासवे

**मंजुघोषा**

जाणत्यांचा वेगळा अंदाज होता...
एकटा माझा खुला आवाज होता!

**आनंदकंद**

आताच अमृताची बरसून रात गेली
आताच अंग माझे विझवून रात गेली

**मंजुघोषा**

सर्व काही ठीक आहे! छान आहे
अन् तुझ्या हातात माझी मान आहे

**वियदगंगा**

तशी जागा निवाऱ्याला कुठे माझ्या घरी होती?
पथारी टेकण्यासाठी जगाची ओसरी होती!

**राधा**

दूर जायाचे कितीदा घाटले होते!
जीवनापासून आता वाचलो मी!

**मंजुघोषा**

एवढे बरे झाले की, वारलो मी
जीवनापासून आता वाचलो मी!

**आनंदकंद**

संपून राख गेली हाडे विकून झाली!
ते मागतात आतां आपापली दलाली!

**मंजुघोषा**

हाच माझा देश, ही माझीच माती!
येथले आकाशही माझ्याच हाती!

**वैखरी**

पटले न कोणाशी, तरी पटवून घे!
जगणे तुझे कैसेतरी उरकून घे!

**वियदगंगा**

कधी झालो तुझा मी, हे मला माहीतही नाही!
तशा मी वेगळ्या नोंद कधी ठेवीतही नाही!

**सती+जलौघवेगा**

जसा मला वाटला, तसा हा प्रवास नाही!
अजून कोणीच सोबती आसपास नाही!

**आनंदकंद**

झालो तसा कुठे मी बदनाम बोलवांनी?
झाला समुद्र केव्हा घायाळ तारवांनी?

**मंजुघोषा**

वागणे माझे जगाशी ठीक नाही
हे मला मंजूर मी सोशीक नाही!

**व्योमगंगा**

कालच्या त्या कत्तलीचा हा खरा अहवाल नाही!
कोणत्याही अक्षराचा रंग लालीलाल नाही!

**व्योमगंगा**

भंगलेल्या दैवतांना घालता माळा कशाला?
हाय, घोटाळ्यात आता 'ब्रह्मघोटाळा' कशाला?

**मंजुघोषा**

एवढी झाली, जगा रे, चूक माझी
मी तुझ्या दारात नेली भूक माझी!

**आनंदकंद**

पडतात रोज कानी बकवे तऱ्हेतऱ्हेचे!
निघतात बादशाही फतवे तऱ्हेतऱ्हेचे!

**वियदगंगा**

कधी मी भेटण्यासाठी तुला बोलावले होते?
मघाशी दार का माझ्या मनाचे वाजले होते?

**मातंगी**

तू माझ्या गीतांनी डवर दूर!
ने माझा घमघमता बहर दूर!

**मंजुघोषा**

कोण जाणे, कोण हे जवळून गेले!
चांदणे रक्तामध्ये मिसळून गेले!

**व्योमगंगा**

काय जे होणार आहे ते मला माहीत आहे!
मी तुझ्यासाठी तरीही जिन्दगी जाळीत आहे!

**व्योमगंगा**

वृत्तपत्रांचे रकाने वायद्यांनी भरत होते
अन् किड्यामुंग्यांप्रमाणे लोक साधे मरत होते!

**रंगराग**

घोटघोट दुःखाचा पीतपीत मी गेलो!
जिंदगी अशी माझी संपवीत मी गेलो!

**हिरण्यकेशी**

मनाप्रमाणे जगावयाचे किती किती छान बेत होते!
कुठेतरी मी उभाच होतो... कुठेतरी दैव नेत होते!

**मंजुघोष**

भेटलेली माणसे घनदाट होती!
थेट पोचायास कोठे वाट होती?

**मेनका**

जोडती नाती कशी बिलगून ते!
तोडती संबंधही ठरवून ते!

**कलिंदनंदिनी**

पुन्हा बिऱ्हाड थाटतो बिऱ्हाड मोडल्यावरी!
तुटून चालली घरे, सुटे न ही कलंदरी!

**विधाता**

तारुण्य तुझ्या हृदयाचे हे असेच बहरत राहो
वार्धक्य तुझ्या जगण्याला हे असेच विसरत राहो!

**मंजुघोषा**

तो जरी वेडावणारा भास होता,
तू पुन्हा येशील हा विश्वास होता!

**मंजुघोषा**

मी कशाला जन्मले? चुकलेच माझे!
ह्या जगाशी भांडलो! चुकलेच माझे!

**मंजुघोष**

माणसे नाहीत ह्या देशात आता!
सांगतो जो तो स्वतःची जात आता!

**विधाता**

थांबली अखेरी माझ्या जगण्याची तडफड आता!
राहिली न ती तेव्हाची हृदयाची धडधड आता!

**मृगाक्षी**

तुझा मी शोधला तारा कितीदा!
तुझा मी बांधला वारा कितीदा!

❖❖❖



## सुरेश भट यांना मिळालेले पुरस्कार -

१) २७ वा राज्य चित्रपट महोत्सव - १९८९-९० उत्कृष्ट गीतासाठी ग. दि. माडगूळकर पुरस्कार.
२) विदर्भ साहित्य संघाचा जीवनव्रती पुरस्कार.
३) सोलापूरचा भैरू रतन दमाणी पुरस्कार.
४) नगर जिल्हा परिषदेतर्फे सृजनशील कलावंत पुरस्कार.
५) 'रंग माझा वेगळा' काव्यसंग्रहासाठी लता मंगेशकर पुरस्कार.

## -: सौजन्य आणि आभार :-


१) संक्षिप्त मराठी वाङ्मयकोश (१९२० ते २००३), संपादक - प्रभा गणोरकर, उषा टाकळकर, वसंत आबाजी डहाके, जया दडकर, सदानंद भटकळ, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

२) गझलसम्राट सुरेश भट आणि प्रदीप निफाडकर, नंदिनी पब्लिशिंग हाऊस, पुणे.

३) काव्यसमीक्षा - गझल - रंग आणि गंध : राजशेखर हिरेमठ, मेहेता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

४) सुरेश भट यांची निवडक कविता : संपादक - शिरीष पै.

५) काफला, संपादक - सुरेश भट, साहाय्य - डॉ. अविनाश सागोलेकर.

६) पत्रे सुरेश भटांची : संपादन - श्रीराम पचिन्द्रे


❖❖❖